
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२०७०
१९२६
REFBK-0003051

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२७७

# कृष्ण गोखले

(चरित्र, कामगिरी व ध्येयें यांचें विवेचन)

१२७७



कि. १२ आणे. द. ग. येरवडेकर.

म. प्रं. सं. डाटो.

प्र. ३९.

वा. पं.
३१८

क्र. सं. 3049

# नामदार गोपाळ कृष्ण गोखले.

( चरित्र, कामगिरी व ध्येयें यांचें विवेचन. )

लेखक:

दत्तात्रेय गणेश येरवडेकर,

एम्. ए. ( पूर्वमीमांसा. )

नारायण महादेव परमानंद प्राईझमन,

सर लॉरेन्स जेन्किन्स स्कॉलर,

मुंबई युनिव्हर्सिटी.

REFBK-0003051

बारा

किमत [redacted] आणे

हें पुस्तक पुणें येथें “ महिलाविजय ” छापखान्यांत कंपोज करून “ आर्यभूषण ” छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना.

गोपाळ कृष्ण गोखले परलोकवासी झाल्यास आज सुमारें एक तप होत आलें तरी त्यांच्या कामगिरीबद्दल लोकांस अजून कौतुक व अभिमान वाटत असून त्या भावना उत्तरोत्तर दृढच होत आहेत. ते हयात असतांना ज्या क्षुल्लक व व्यक्तिविषयक बाबींविषयीं वाद माजत असे त्या बहुतेक सर्व ध्यानांतून गेल्या असून त्यांच्यासारखा दूरदृष्टीचा विधायक राष्ट्रधुरंधर गृहस्थ हल्लींच्या कठिण परिस्थितींत आमच्या देशांत राहिला नाहीं अशा तऱ्हेचे उद्गार त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या तोंडांतूनही कित्येक वेळां ऐकूं येतात. असहकारितेच्या काळांत गोखल्यांनीं कोणचा मार्ग स्वीकारिला असता, किंबहुना ते हयात असते तर महात्मा गांधीनीं त्यांच्या गुरूंच्या मताविरुद्ध त्या मार्गाचा स्वीकार केला असता किंवा काय, पूर्वीच्याप्रमाणें ते हिंदुस्थानचे सर्वमान्य वकील असते तर मॉंटेग्यु चेल्म्सफर्ड सुधारणांत कोणचे फेरफार झाले असते, त्यांनीं दिवाणगिरीचा किंवा हिंदुस्थानसरकारच्या फडनिशीचा स्वीकार केला असता कीं काय वगैरे प्रश्न पुष्कळदां विचारण्यांत येतात. त्यांचें समर्पक उत्तर देणें त्यांच्या पश्चात् अशक्यच आहे, परंतु त्यांच्या चरित्राचा अभ्यास करून साधारण अनुमान काढणें कठिण नाहीं. हिंदुस्थानची सर्वांगीण सुधारणा घडवून आणून हिंदी लोकांची कर्तबगारी वाढण्यास काय काय केलें पाहिजे याविषयीं त्यांच्या मनांत नेहमीं विचार चालू असत. राष्ट्राची उन्नति व्हावयाची ती जादूनें न होतां उत्क्रांति तत्त्वाला धरूनच होणार व ती तशी झाली तरच ती टिकाऊही होणार हें त्यांचें ठाम मत असे म्हणूनच त्यांनीं आपलें आयुष्य डेक्कन एज्युकेशन सोसायटी व सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी यांस वाहून घेतलें होतें.

वक्तृत्वामध्यें त्यांचा हात धरणारा जरी कोणी नसला तरी त्यांची टीका मुद्देसूद व इतिहास आणि आंकडे शास्त्रावर रचलेली असल्यामुळें त्यांच्या बोलण्याकडे कानाडोळा करणें सरकारास शक्य नव्हतें. अशा तऱ्हेचे मुत्सद्दी हल्लींच्या काळांत नाहींतच म्हटलें तरी चालेल. बोलण्यापूर्वी सर्व बाजूंचा सांगोपांग विचार करून बोलणें, लोकप्रियता हेंच ध्येय न मानणें; आपल्या राष्ट्रोन्नतीचा पाया खऱ्या नीति तत्त्वांवर रचणें वगैरे गोष्टी अजूनही पुष्कळांना त्यांच्यापासून शिकण्यासारख्या आहेत. त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या भाषणांचीं पारायणें करणें एका प्रकारचें राजकीय शिक्षण आहे. त्यांच्या चरित्रापासून हल्लींच्या राजकीय स्थितींत पुष्कळ धडे घेण्यासारखे आहेत. त्यांचें विस्तृत चरित्र अजून कोणीं लिहिलें नसल्यामुळें आमच्या राजकीय वाङ्मयांत एक फार मोठी उणीव राहिली आहे. ती केव्हां भरून येईल ती खरी. परंतु विस्तृत चरित्र नसलें तरी रा० येरवडेकर यांनीं पुष्कळ परिश्रम करून लिहिलेलें व मुंबई युनिव्हर्सिटीनें बक्षिस दिलेलें हें लहानसें पुस्तक बरेच लोकांस उपयुक्त होईल, यांत संशय नाहीं.

पुणें, ता० १८-११-२६. **रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे.**

# लेखकाचें हद्गत.

मुंबई युनिव्हर्सिटीनें सन १९२४ च्या नारायण महादेव परमानंद प्राईझ-साठीं नामदार गोखल्यांच्या चरित्रावर निबंध मागविले होते. आपणही प्रयत्न करून पहावा अशा बुद्धीनें आम्ही १९२४ च्या जूनच्या शेवटच्या आठवड्यांत, आमची बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर, हा निबंध लिहिण्यास सुरुवात केली व तो त्याच वर्षाच्या आगस्टच्या दुसऱ्या आठ-वड्यांत लिहून पूर्ण करून योग्य मुदतींत रजिस्ट्रारकडे पाठविला.

सुमारें सात महिन्यांनंतर ता० ९ एप्रिल १९२५ रोजीं नंबर ११९३ सन १९२५ चें पत्र लिहून रजिस्ट्रारसाहेबांनीं आम्हांस अर्धें बक्षीस मिळा-ल्याचें कळविलें. अधिक चौकशी केल्यावर असें कळलें कीं, या बक्षिसा-साठीं एकंदर चार निबंध आले होते व त्यांपैकीं दोन निबंध परीक्षकांना सारख्या योग्यतेचे वाटल्यावरून या दोघां निबंधलेखकांना निम्में निम्में बक्षीस देण्यांत आलें.

परमानंद प्राईझ आर्थिकदृष्ट्या विशेष मोठें नाहीं, व त्यांतूनही तें अर्धेंच मिळालेलें, यामुळें हा निबंध प्रकाशित कसा होतो ही अडचण उपस्थित झाली. कोणत्याही गोष्टीची वेळ यावी लागते असें ह्मणतात तेंच खरें. सन १९२५ सालीं प्रयत्न केला तरी हा योग जुळून आला नाहीं. आज ज्या आर्यभूषण छापखान्याकडून हा निबंध प्रकाशित होत आहे, त्याच छापखान्याकडे गतवर्षीं धांव घेतली असतां ती फुकट गेली. पण यंदां वेळ येतांच मुद्दाम आठवण ठेवून आर्यभूषण छापखान्याच्या व्यवस्थापकांनीं या निबंधाच्या प्रकाशनाची आर्थिक जबाबदारी अंगावर घेतली या त्यांच्या उपकारामुळेंच, आम्ही बी. ए. झाल्यानंतर याच दिवसांत लिहिलेला हा निबंध आज आम्ही एम्. ए. झाल्यानंतर याच दिवसांत प्रकाशित होण्याचा सुयोग येत आहे.

निबंध छापण्यास सुरुवात होते न होते तोंच आर्यभूषण छापखान्याला भयंकर आग लागली. पण भारतीय युद्धांत अठरा अक्षौहिणी सैन्य मृत्यु-

मुखीं पडलें असतां हत्तीच्या गळ्यांतील घंटेखालीं एक चिमणीचें पोर सुखानें कालक्रमणा करीत होतें, अशी आख्यायिका सांगतात तसाच अनुभव नेमका या निबंधाच्या बाबतींत येऊन निबंधाचा एक अपमृत्यु टळला. कच्चाखर्डा, पक्का मसुदा असले प्रकार आमच्या लेखनांत केव्हांच नसल्यामुळें हा निबंध जर अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडला असता, तर तो कायमचाच नष्ट झाला असता. पण सुदैवानें ' प्राणावर बेतलेलें शेपटावरच निभावून ' मूळ हस्तलिखित निबंधाचीं नं० १२, १६, १७, १९ व २० अशीं पांचच पृष्ठें आगीच्या गडबडींत गहाळ झालीं.

अशा प्रकारचा इतिहास असलेला, व अशा रीतीनें अपघातांतून बचावल्यामुळें दीर्घायु होऊं घातलेला हा निबंध महाराष्ट्र–वाचकांच्या हातीं देतांना आम्हांस अत्यंत आनंद होत आहे. युनिव्हर्सिटी प्राईझसाठीं लिहिलेला निबंध युनिव्हर्सिटीच्या अटींप्रमाणें असणार हें उघड आहे. युनिव्हर्सिटी प्राईझसाठीं लिहावयाचा निबंध शंभर फुल्सकॅप कागदांपेक्षां केव्हांहि अधिक नसावा, त्यांतील प्रत्येक महत्त्वाच्या विधानाचा आधार स्पष्टपणें जेथल्या तेथेंच सांगण्यांत यावा, व निबंधाच्या विषयाची तयारी व लेखन हीं सर्वस्वी लेखकाचींच असावीं– इतरांची मदत त्यानें घेऊं नये, या तीन महत्त्वाच्या अटींचें यत्किंचितहि उल्लंघन आम्हीं केलें नाहीं असेंच वाचकांस दिसून येईल.

मूळ हस्तलिखितांतील वर सांगितलेलीं पांच पृष्ठें पुनः लिहिणें, दोन तीन ठिकाणीं नवीन मिळालेली माहिती अधिक घालणें व मुळांत असलेलें 'उपसंहार' हें त्रोटक व मामुली प्रकरण गाळून टाकणें हे महत्त्वाचे फेरफार या पुस्तकांत केले आहेत.

नामदार गोखल्यांना दिवंगत झाल्यास एक तप होत आलें, तरी त्यांचें विश्वसनीय, विस्तृत व साधार असें चरित्र मराठींत झालेलें नाहीं ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय. परमानंद प्राईझला हा विषय आल्यामुळें एकंदर पांच लेखकांनीं पांच वेगवेगळीं गोखल्यांचीं चरित्रें लिहिलीं. त्यांपैकीं एक गतवर्षीं प्रसिद्ध झालें व प्रस्तुत दुसरें चरित्र यंदां प्रसिद्ध होत आहे. पण

हीं दोन प्रसिद्ध व तीन अप्रसिद्ध मिळून पांचहि जमेस धरलीं तरी त्यांनीं एका विस्तृत व सर्वांगसंपन्न चरित्राची तहान भागणें शक्य नाहीं. अशा प्रकारचें एक चरित्र 'येणार, येणार' म्हणून इतके दिवस गाजत आहे कीं, या घोषणेवर यापुढें विश्वासहि ठेवावासा वाटत नाहीं. शिवाय गोखल्यांच्या चरित्राचीं जुळविलेलीं साधनें परवांच्या आगींत नष्ट झालीं असेंहि वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. तेव्हां हें आज बारा वर्षें न झालेलें महत्त्वाचें कार्य आपण हातीं घ्यावें अशी आमची उत्कट इच्छा आहे, व घेतल्यास तें यशस्वी करून दाखविण्याची आम्हांस उमेद आहे. या पुस्तकाचे रूपानें दिलेला 'विसार' पटवून घेऊन 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' चे चालक हें मोठें काम आमच्याकडून करवून घेतील अशी आशा व्यक्त करण्यापलीकडे आह्मी सध्यां तरी दुसरें काय करणार ?

हा निबंध लिहितांना परिशिष्टांत नमूद केलेले बहुतेक सर्व ग्रंथ आमच्या अनेक स्नेह्यांकडून मिळवावे लागले याबद्दल, विस्तारभयास्तव पृथक् नामनिर्देश न करतां त्या सर्वांचे एकदमच मनःपूर्वक आभार मानतों. लेखनाच्या बाबतींत इतर कोणत्याहि प्रकारची मदत इतरांकडून घेणें निषिद्ध होतें, नाहींतर आणखीहि मदत या स्नेह्यांनीं केलीच असती. प्रकाशनाच्या बाबतींत मात्र आमचे स्नेही व उपकारकर्ते श्रीमंत सरदार गंगाधरराव नारायणराव ऊर्फ आबासाहेब मुजुमदार, एम्. एल्. सी. यांची अतिशयच मदत झाली याबद्दल त्यांचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. तसेंच, कौन्सिलनिवडणुकीच्या व इतर व्यवसायांत व्यापृत असतांनाही डॉ० रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांनीं या पुस्तकास प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचेही आम्ही अत्यंत ऋणी आहों. या पुस्तकाच्या प्रकाशनाची आर्थिक जबाबदारी अंगावर घेऊन जरी श्री० अनंत विनायक पटवर्धन यांनीं आपल्या गुरूचें एक वाङ्मयस्मारक प्रसिद्ध करण्याचें कर्तव्यच केलें आहे; तरी त्यांचे मनःपूर्वक आभार मानणें हें आमचेंहि कर्तव्यच आहे; तें बजावून ही प्रस्तावना संपवितों.

**नोव्हेंबर १९२६, पुणें शहर.** **द० ग० येरवडेकर, एम्. ए.**

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | | पृष्ठें. |
|---|---|---|
| १ लें— | कुलवृत्तांत आणि चरित्राची रूपरेषा ... | १– १६ |
| २ रें— | डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील कामगिरी. | १७– २६ |
| ३ रें— | राष्ट्रीय सभेंतील कामगिरी ... ... | २६– ४६ |
| ४ थें— | परदेशांतील कामगिरी ... ... ... | ४६– ६१ |
| ५ वें— | प्रांतिक व वरिष्ठ कायदे-कौन्सिलांतील कामगिरी ... ... ... ... | ६२– ७४ |
| ६ वें— | ना० गोखले यांनीं स्थापिलेल्या संस्था ... | ७५– ८१ |
| ७ वें— | इतर किरकोळ कामगिऱ्या ... ... | ८१– ८७ |
| ८ वें— | स्वभाव, मतें, ध्येयें, वगैरे ... ... | ८८– ९७ |
| ९ वें— | कामगिरीचें स्वरूप व महत्त्व ... ... | ९७–१०१ |
| १० वें— | ना० गोखले व इतर पुढारी ... ... | १०१–११७ |
| | परिशिष्ट... ... ... ... ... | ११७–१२० |



ना० गोपाळ कृष्ण गोखले.

# नामदार गोपाळ कृष्ण गोखले.

( चरित्र, कामगिरी आणि ध्येयें यांचें विवेचन. )

## प्रकरण १ लें.

## कुलवृत्तांत आणि चरित्राची रूपरेषा.

कर्तबगार मनुष्याला आपल्या कुलाकडे बोट दाखवावेंच लागतें असें नाहीं; पण कर्तबगारीच्या रत्नाला कुलाचें कोन्दण फारच शोभतें हें कोणासही पटेल. वाईट कुलांत जसे चांगले पुरुष जन्मतात, तसेंच चांगल्या कुलांत वाईट पुरुषही जन्मलेले आपण पहातों. ‘ दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं तु पौरुषम् ’ ही दर्पोक्ति पराक्रमी पुरुषाला शोभून दिसावी हें तर स्वाभाविकच आहे; पण प्रसिद्ध कुलांत जन्म, आणि त्या कुलाच्या लौकिकाला साजणारी कर्तबगारी या दोनही गोष्टी ज्यांच्या वांट्याला येतात, ते अत्यंत भाग्यवान् होत. नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे अशा विभूतींपैकीं एक प्रमुख होत.

गोखले– घराणें महाराष्ट्राच्या इतिहासांत अत्यंत प्रसिद्ध आहे. या घराण्याचा आजतागायतचा इतिहास श्री० गोविंद विनायक आपटे यांनीं सन १९२२ सालीं लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यांत या घराण्याविषयीं बरीच नवीन माहिती मिळते. गोखल्यांचे रास्ते बनविण्याचें श्रेय शाहूमहाराजांना देण्यांत येतें; पण वस्तुतः आदिलशाही कारकीर्दींतच गोखल्यांना ‘ रास्त ’ ही पदवी परधर्मीय व परकी बादशहाकडून मिळाली होती. ( गोखले-रास्ते

घराण्याचा इतिहास, पृ. २) गोखल्यांचें मूळ गांव वेळणेश्वर. या गांवीं त्यांची वस्ती आज सातशें वर्षें आहे. घराण्याची सांपत्तिक स्थिति सुधारल्यावर व वंशाची वाढ होऊं लागल्यावर गोखले मंडळींत पांगापांग सुरू झाली. रास्ते-घराण्यांतील कांहीं मंडळी सातारा येथें सावकारी करूं लागली. शाहूमहाराजांच्या कृपेमुळें रास्ते व पेशवे हे व्याहीव्याही झाले. नानासाहेब पेशव्यांची सुप्रसिद्ध पत्नी गोपिकाबाई ही रास्त्यांची मुलगी होय. पेशव्यांशीं शरीरसंबंध झाल्यामुळें रास्ते सरदार झाले. पेशवाईच्या इतिहासांत प्रमुखपणें वावरणारे रास्ते हे खरेखुरे गोखले होत, हेंच दर्शविण्याचा उद्देश असल्यामुळें रास्त्यांच्याबद्दल आणखी लिहिण्याची जरूर नाहीं.

परकी सरकाराशीं इमानी राहून पदवी मिळविणारे पुरुष जसे गोखले घराण्यांत निपजले, तसेच स्वराज्याशीं पडत्या काळांतसुद्धां इमानी राहून अजरामर झालेले पुरुष या घराण्यांत सांपडतात. दुसऱ्या बाजीरावासाठीं आपल्या शौर्याची व स्वामिभक्तीची पराकाष्ठा करणारे बापू गोखले याच घराण्यांतले होत. जुन्या अमदानींत पराक्रम करून व कारस्थानें लढवून रास्ते व बापू गोखले यांनीं आपल्या घराण्यासाठीं जी मान्यता संपादन केली, तितकीच मान्यता या नव्या अमदानींत एकट्या गोपाळराव गोखल्यांनींच संपादन केली.

रत्नागिरी जिल्ह्याच्या चिपळूण तालुक्यांतील वेळणेश्वर हें जरी गोखल्यांचें मूळ गांव असलें, तरी याच गांवांत सर्व गोखल्यांचा कायमचा समावेश होणें शक्य नव्हतें. कारणपरत्वें निरनिराळ्या वेळीं, निरनिराळ्या जागीं, निरनिराळ्या शाखा पसरल्या. गोपाळरावांची शाखा ताम्हनमळ्याची. हा गांव चिपळुणापासून सुमारें दहा मैलांवर आहे. वेळणेश्वराहून ताम्हनमळा येथें बाळाजी महादेव गोखले हे सन १७७२।७३च्या सुमारास आले; (गोखले-रास्ते घ० इ०, पृ० ३४) हे गोपाळरावांचे निपणजे. यांच्या नांवाची चौगुलेपणाच्या वतनाची सनद आपटे यांनीं आपल्या पुस्तकांत दिली आहे. (पृ० ३३) ताम्हनमळा या नांवाच्या एकदोन व्युत्पत्त्याही तेथें पहावयास सांपडतात. बाळाजी महादेवांना चार पुत्र. त्यांपैकीं तिसरे भास्कर बाळाजी

हे गोपाळरावांचे पणजे. यांना पुत्र पांच; त्यांपैकीं एक नारायण हा वारल्या-नंतर इतर चार भावांत सन १८६० सालीं वांटणी झाली. (पृ० ३६). गोपाळरावांचे आजे श्रीधर भास्कर गोखले यांना प्रथम कुटुंबापासून अंताजीपंत व कृष्णराव, व द्वितीय संबंधापासून जयरामपंत व माधवराव असे चार मुलगे झाले. ( मनोरंजन-वसंत अंक १९१५; पृ० ३०६ ) यांपैकीं कृष्णराव हे गोपाळरावांचे वडील. अंताजीपंत व कृष्णराव हे ताम्हनमळा येथेंच शेती करून एकत्र रहात होते. कृष्णराव हे लहानपणीं आपल्या घरचीं गुरें राखीत असत. शिक्षणासाठीं कृष्णराव ताम्हनमळ्याहून कोल्हापुरास गेले. कर्मधर्मसंयोग असा कीं, कृष्णराव गोखले व माधवराव रानडे हे कोल्हापुरास एकाच शाळेंत शिकले ! ( वसंत अंक १९१५; पृ. ३०७ ) सांपत्तिक स्थिति अनुकूल नसल्यामुळें तामसी, धाडसी व हूड कृष्णरावांना कागलांत कारकुनी करावी लागली. कामाच्या चोखपणामुळें व बाणेदार स्वभावामुळें कृष्णराव पुढें कागलचे फौजदार झाले. या हुद्याचा उपभोग घेत असतांनाच मधुमेहाच्या विकारानें कृष्णराव १८७९ सालीं वारले. त्यांचे वडील श्रीधरपंत हे १८८९ सालीं वारले.

गोपाळ कृष्ण गोखले हे कृष्णरावांचे दुसरे पुत्र. यांचा जन्म ता० ९ मे सन १८६६ रोजीं चिपळूणनजीक मौजे कोतळुक या गांवीं आजोळीं जाहला. गोपाळरावांचे आजे भास्करपंत ओक हे कोतळुक गांवचे खोत यांची मुलगी वालुबाई ही कृष्णरावांची पत्नी व गोपाळरावांची आई. हिचें सासरचें नांव सत्यभामाबाई. गोपाळरावांची आई फार सत्त्वशील, पापभीरू व देवभोळी होती. “ कृष्णराव वारल्यावर या साध्वीनें त्यांचें एक नेसण्याचें धोतर आपण मरेपर्यंत जवळ बाळगिलें होतें. गोपाळरावांनींही आईनें पूज्यभावानें बाळगिलेलें आपल्या वडिलांचें तें धोतर तितक्याच भक्तिभावानें जपून ठेविलें होतें. ” ( मनोरंजन वसंत–अंक १९१५; पृ० ३०९. )

एवंगुणविशिष्ट आईबापांच्या पोटीं जन्मास आलेल्या गोपाळरावांचा प्राथमिक शिक्षणक्रम कागल येथेंच झाला. वयाचीं पहिलीं दहा वर्षें गोपाळ-रावांना कागल येथें घालवावीं लागलीं. मराठी अभ्यास पुरा झाल्यावर

'गोविंद गोपाळ हे दोघे बंधू' इंग्रजी शिक्षणासाठीं कागलोहून कोल्हापुरास गेले. परंतु पुढें दोनतीन वर्षांतच दुर्दैवानें कृष्णराव वारले; (सन १८७९) आणि या गरीब कुटुंबावर मोठाच प्रसंग ओढवला. कृष्णरावांना दोन मुलगे व चार मुली; आणि पैशाच्या बाबतींत कमतरताच. गोपाळरावांचे चुलते व कृष्णरावांचे वडील बंधु अंताजीपंत ताम्हनमळ्यास शेती करून रहात असत तेही गरीबच. गांवच्या खोतींत त्यांचा सारा एक पैशाचा हिस्सा होता. तेव्हां गोपाळरावांच्या शिक्षणाचा भार गोविंदरावांवरच पडला. धाकट्या भावाच्या शिक्षणासाठीं स्वतःचें शिक्षण सोडून, त्या वेळचे कागल संस्थानचे कारभारी रावसाहेब विष्णु परशराम वैद्य यांच्या ओळखीनें गोविंदरावांनीं कागलांत १५ रुपयांची कारकुनीची नोकरी मिळविली. या पंधरा रुपयांत गोविंदराव कुटुंबपोषण आणि गोपाळरावांचें शिक्षण करीत असत! थोडा पगार व मोठा प्रपंच अशा परिस्थितींत गोविंदरावांनीं घस सोसून गोपाळरावांच्या शिक्षणास मदत केली. त्यांचे हे उपकार गोपाळराव कधींही विसरले नाहींत. गोविंदरावजींस ते पितृतुल्य मानीत. गोविंदरावांच्या पश्चात् त्यांच्या कुटुंबाचा योग्य तो परामर्श घेऊन गोपाळरावांनींही आपलें कर्तव्य बजावलें.

अशा रीतीनें कृष्णरावांच्या मृत्यूनें त्यांच्या कुटुंबीयांवर जो दुर्दैवाचा घाला पडला, त्यांतून गोपाळराव तर वांचले! त्यांना शिक्षणासाठीं अत्यंत हालअपेष्टा सोसाव्या लागल्याच—पण त्या सोसूनही शिक्षणाला मुकण्याचा प्रसंग त्यांजवर ओढवणार होता, तो वडील बंधूंच्या कृपेमुळें ओढवला नाहीं, हें सुदैवच म्हटलें पाहिजे! आणि हें एकट्या गोपाळरावांचें सुदैव नव्हतें, तर तें सर्व हिंदुस्थानाचें सुदैव होतें. वडिलांच्या मृत्यूनंतर वडीलपणा सहजच अंताजीपंतांकडे आला, व त्यांनीं गोपाळरावांचें लग्न उरकून टाकलें.

कै० प्रो० वासुदेव बळवंत पटवर्धन यांनीं मनोरंजनांत लिहिलेल्या गोखल्यांच्या चरित्रांतील प्रस्तुत भागाबद्दल येथें थोडेंसें लिहिलें पाहिजे. गोखल्यांचे चुलते अंताजीपंत हे त्यावेळीं हयात असल्यामुळें त्यांनीं मनोरंज-

नाला पत्र पाठवून या विवाहप्रकरणांतली खरी हकीकत कळविली आहे. हें पत्र मनोरंजनाच्या जुलै १९१५च्या अंकांत प्रसिद्ध झालें असून गोखल्यांच्या चरित्राच्या अस्सल साधनांत त्याला फारच महत्त्वाचें स्थान आहे. सदर पत्रांत अंताजीपंतांनीं गोपाळरावांच्या विवाहासंबंधीं जी माहिती सांगितली आहे तिचा सारांश येणेंप्रमाणें— गोपाळरावांचें लग्न प्रो० पटवर्धन लिहितात त्याप्रमाणें १८८० सालीं न करतां, अंताजीपंतांनीं १८८१ सालीं केलें. याच सालीं गोपाळराव मॅट्रिक झाले. अंताजीपंतांच्या या कृत्याला गोपाळरावांनीं आपली नाखुषी दर्शविली नव्हती. प्रो० पटवर्धन लिहितात त्याप्रमाणें गोपाळरावांना या बायकोचा तिटकारा मुळींच नव्हता. गोपाळरावांनीं तिला आपल्याबरोबर कोल्हापुरास नेऊन तिच्या शिक्षणाचीही तजवीज केली होती; व ती तेथें आजारी पडतांच तिच्या बरेपणाकरितां पराकाष्ठा केली होती. कोल्हापुरास गुण येईना, म्हणून अंताजीपंतांनीं सावित्रीबाईंना (गोपाळरावांच्या पहिल्या पत्नीचें नांव) कोंकणांत नेलें. गोपाळराव मर्यादशील असल्यामुळें खुद्द अंताजीपंतांना पत्नीच्या प्रकृतीविषयीं विचारीत नसत; परंतु अंताजीपंतांच्या मुलाला पत्नीच्या प्रकृतीविषयीं त्यांचीं अनेक पत्रें येत असत; सावित्रीबाई दुखण्यांतून उठत नाहींत असें डॉक्टरांनीं सांगितल्यावरून सर्व मंडळींनीं दुसऱ्या लग्नाविषयीं गोपाळरावांना अत्यंत आग्रह केला; व केवळ त्यांना दुखवूं नये म्हणून मोठ्या नाखुषीनें गोपाळरावांनीं १८८७ च्या मे महिन्यांत दुसरें लग्न केलें; प्रो० पटवर्धन म्हणतात त्याप्रमाणें मुलगी लहान नसून तिला चवदावें वर्ष लागलें होतें. हें दुसरें लग्न झाल्यावर सावित्रीबाई तीनचार वर्षेंच हयात होत्या. त्या १८९१ सालीं वारल्या. गोपाळराव त्यांची प्रकृति पहाण्यासाठीं लागोपाठ दोनतीन वर्षें कोंकणांत जात असत. पहिली पत्नी हयात असतां आपण दुसरें लग्न केलें, याचें गोपाळरावांना पुढें पुढें फार वाईट वाटत असे. सावित्रीबाईंचा त्यांनीं अखेरपर्यंत कधींही तिटकारा केला नाहीं. उलट त्यांच्या स्थितीबद्दल त्यांना जास्तच कळवळा उत्पन्न होई.

वर सांगितल्याप्रमाणें गोपाळराव १८८१च्या अखेरीस प्रवेशपरीक्षा पास होऊन १८८२ च्या जानेवारींत कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांत दाखल झाले. हल्लींच्या मानानें त्या वेळीं शिक्षणाचा प्रसार कांहींच नसल्यानें, कोल्हापुरासारख्या ठिकाणीं पी. ई. च्या वर्गात थोडींच मुलें असत. गोपाळराव जरी विशेष हुशार ह्मणून प्रसिद्ध नसले, तरी मेहनती व भोळे ह्मणून सर्वांना माहीत असत, व त्यांची थट्टा करण्यांत सर्वांना मौज वाटे. पी. ई. ला त्यांना जीं पुस्तकें होतीं त्यांत सर वॉल्टर स्कॉटचें 'रोकबी' नामक काव्य हें एक पुस्तक होतें. गोपाळरावांची पाठ करण्याची शक्ति विलक्षण असल्यामुळें त्यांना हें काव्य सहजच पाठ म्हणतां येई. त्यांच्या भोळ्या व चिडखोर स्वभावाचा फायदा घेऊन वर्गातील मुलें या बाबतींत त्यांची कशी थट्टा करीत हें प्रो० पटवर्धनांनीं बहारीनें वर्णिलें आहे. (पृ. ३२१-२२) प्रो० विष्णु गोविंद विजापूरकर, गणपतराव पटवर्धन, कुळकर्णी, करमरकर वगैरे गृहस्थ त्यावेळीं गोपाळराव गोखल्यांचे सहाध्यायी होते. गोखले ज्या वर्षी कॉलेजांत आले त्याच वर्षी कोल्हापूर-प्रकरणाबद्दल टिळक-आगरकरांवर खटला झाला. टिळक-आगरकरांवर खटला झाला कोल्हापूर संस्थानावरील त्यांच्या प्रेमामुळें, तेव्हां कोल्हापूरच्या तरुण विद्यार्थ्यांना त्यांच्याविषयीं सहानुभूति वाटणें हें नुसतें स्वाभाविक नसून अपरिहार्यही होतें. महाराष्ट्रांत टिळक-आगरकरांच्या मदतीसाठीं जी सार्वजनिक वर्गणी जमा करण्यांत येत होती, तिला हातभार लावण्याच्या उद्देशानें राजाराम कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं शेक्सपीयरच्या 'भ्रांतिकृत् चमत्कार' या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर करून त्याचें उत्पन्न या वर्गणीला दिलें. या नाटकांत गोपाळरावांनीं गोसाविणीची भूमिका घेतली होती, व ती त्यांनीं चांगल्या प्रकारें पार पाडली असें सांगतात. अभ्यास बरा कीं आपण बरे अशा एकमार्गी धोरणाचे गोखले टिळक-आगरकरांच्या मदतीसाठीं नाटकांत वेष घेण्यास तयार झाले ही खरोखरच अपूर्व गोष्ट होय!

याच सालीं गोपाळराव पी. ई. च्या परीक्षेंत पास झाले. त्यावेळीं राजाराम कॉलेजांत पुढील शिक्षणाची सोय नसल्यामुळें १८८३ च्या आरंभीं

फर्स्ट बी. ए. साठीं त्यांना पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत यावें लागलें. परंतु दुसऱ्या सहामाहीला सुरुवात होण्यापूर्वींच ही गैरसोय दूर झाली, व सहा महिने पुण्यास राहून ते पुनः कोल्हापुरास परत आले, व तेथेंच १८८३ च्या डिसेंबरांत फर्स्ट बी ए. झाले. बी. ए. साठीं त्यांनीं गणित हा ऐच्छिक विषय घेतला व तेवढ्यासाठीं ते कोल्हापुराहून मुंबईस आले. प्रो० हॅथॉर्नथ्वेट हे गणिताचे प्रसिद्ध अध्यापक त्यावेळीं एल्फिन्स्टन कॉलेजांत शिकवीत असत. गोपाळराव हे त्यांच्या आवडत्या विद्यार्थ्यांपैकीं एक असत. प्रसिद्ध समाजसुधारक व स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते प्रो० धोंडो केशव कर्वे हे एल्फिन्स्टन कॉलेजांत प्रो० गोपाळराव गोखल्यांचे सहाध्यायी होते. १८८४ च्या शेवटीं गोपाळराव बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास झाले. याच वर्गांत असतांना त्यांना एकदां एक वीस रुपयांची शिष्यवृत्ति मिळाली होती, व आजपर्यंत त्यांना कोणत्याही परीक्षेंत दुसरा वर्ग मिळाला नव्हता.

मामुली शिक्षणक्रम पुरा केल्यावर गोखल्यांना मुंबई व कोल्हापूर सोडून पुण्यास यावें लागलें. १८८५ च्या आरंभीं एल. सी. ई. होण्याच्या उद्देशानें ते एंजिनियरिंग कॉलेजांत जाऊन बसूं लागले, पण याच वेळीं डेक्कन कॉलेजांत 'जूरिस्प्रूडन्स' चा वर्ग सुरू होऊन येथल्या येथेंच पहिली एल एल. बी. पास होण्याची सोय झाल्यामुळें, त्यांनीं न्यू-इंग्लिश स्कुलांत रु० ३५ ची नोकरी धरून वकिलीच्या टर्म्स भरण्यास सुरुवात केली. याशिवाय त्यांनीं व पुणें हायस्कुलांतील शिक्षक देशपांडे यांनीं एक पब्लिक सर्व्हिस एक्झामिनेशनचा वर्ग काढला होता व त्यांत ते आळीपाळीनें शिकवीत असत. या वर्गाच्या मिळकतींतले गोपाळरावांच्या वांटणीला सुमारें पसतीस चाळीस रुपये येत असत. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेसाठीं विलायतेला जाण्याचा विचारही या सुमारास गोपाळरावांच्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. पण नुसत्या विचाराला विचारतो कोण ? 'उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः' अशी त्याची गत झाली !

सन १८८५च्या अखेरीला फर्स्ट एलएल. बी. ची परीक्षा पास होऊन पुढील सालीं सेकंड एलएल. बी. च्या टर्म्स पुणें येथें राहून व नेमक्या दिवशीं मुंबईला जाऊन भरण्याचा उपक्रम सुरू झाला. याच दोन वर्षांत इंग्रजी भाषेचा गोपाळरावांनीं कसून अभ्यास केला. मिल्टनचें पॅरडाईज लॉस्ट, ग्लॅडस्टन, जॉन ब्राईट वगैरेंचीं भाषणें आणि बर्कसारख्यांचे प्रमुख ग्रंथ त्यांनीं मुखोद्गत केले. 'ततः किम्' हा प्रश्न अद्याप त्यांना सोडवितां आलाच नव्हता. घरच्या सांपत्तिक दुःस्थितीमुळें पैसे मिळविण्याकडे त्यांचें लक्ष्य आरंभीं सहजच लागलें होतें. पण ज्या शाळेंत ते शिक्षक होते, त्या शाळेच्या चालकांच्या मूर्ति त्यांच्यापुढें प्रत्यहीं असल्यानें, व त्यांपैकीं दोघांकरितां विद्यार्थी असतांना सुद्धां गोपाळरावांनीं नाटकांत भूमिका घेतली असल्यामुळें, त्यांच्यासारखें होण्याची इच्छा अगदींच न होणें हें जवळ जवळ अशक्य होतें. एल. सी. ई. व आय. सी. एस. हे दोन मार्ग, कोणत्याही कारणानें कां होईनात, पण आतां त्यांच्यापुरते कायमचे बंद झालेच होते. वकिलीच्या मार्गाचा मात्र पहिला अर्धा भाग त्यांनीं पूर्ण यशस्वी रीतीनें आक्रमिला होता; व उरलेला भागही चालून जाणें त्यांना मुळींच अशक्य नव्हतें. पण या बाबतींत त्यांच्यापुढें एका 'एलएल. बी. मास्तराचें' ढळढळीत उदाहरण होतेंच. अशा रीतीनें कांहीं अंशानें दुसऱ्यांपासून मिळालेल्या स्फूर्तीमुळें, आणि कांहीं अंशानें स्फूर्तिदात्या इसमांनीं केलेल्या आग्रहामुळें गोपाळरावांनीं स्वतःपुरता आपला विचार कायम ठरविला; पण आपण आपल्या वडील बंधूंचे उपकार फेडले पाहिजेत ही गोष्टही त्यांच्या मनांत जागृत असल्यानें 'अण्णां'च्या इच्छेविरुद्ध गोपाळरावांना पाऊल टाकवेना! त्यांची ही नाजूक मनःस्थिति जाणून कोल्हापुरांतील कांहीं वजनदार व प्रतिष्ठित लोकांकडून गोविंदराव गोखल्यांचें मन वळविण्याचें काम मंडळींनीं केलें. या खटपटीचा इष्ट तो परिणाम होऊन गोपाळरावांना वडील बंधूंकडून 'पडत्या फळाची आज्ञा' मिळाली; आणि १८८६ च्या अखेरीला गोपाळ कृष्ण गोखले हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे 'लाईफ-मेम्बर' झाले!!

येथून गोपाळरावांच्या ‘ सार्वजनिक आयुष्यक्रमा ’ ला सुरुवात झाली. प्रतिवर्षीं गोपाळरावांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमाच्या नदीला नवीन नवीन ओढे येऊन मिळूं लागले, व प्रतिवर्षीं ती ‘ सागरोपमा ’ होऊं लागली. त्यांच्या कामाचा व्याप ‘ प्रतिपच्चन्द्ररेखेव ’ वाढूं लागला व त्या मानानें त्यांची जबाबदारीही वाढत चालली. पुढील प्रकरणांतून याच बहुविध कामगिरीचा यथाशक्ति परामर्ष घेण्याचा आमचा संकल्प आहे. पण या नदीचें मूळ १८८६ सालांत आहे, ही गोष्ट गोपाळराव गोखले या ‘व्यक्ती’च्या खासगी आयुष्यक्रमाची रूपरेषा देतांना त्यांच्या चरित्रलेखकाला मुद्दाम सांगावीशी वाटली, तर त्यांत अस्वाभाविक असें कांहींही नाहीं.

प्रथम गोखले १८८५ सालीं पगारी नोकर म्हणून न्यू-इंग्लिश स्कुलांत मास्तर होऊन आले व १८८६ च्या शेवटीं त्यांनीं सोसायटीच्या ‘ लाईफ मेंबरशिप ’ ची दीक्षा घेतली. दोन वर्षें ‘ प्रोबेशन ’ वर काम केल्या-नंतर १८८७ सालीं त्यांना पी. ई. चें इंग्रजी देण्यांत आलें. पुढें पुढें त्यांनीं इंग्रजी, गणित, इतिहास आणि अर्थशास्त्र इतके विषय फर्ग्युसन कॉलेजांत शिकविले. १८८५ च्या जानेवारीपासून १९०४ च्या डिसेंबर-पर्यंत ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे ‘ लाईफ-मेंबर ’ होते. आरंभींचीं दोन वर्षें ज्याप्रमाणें ‘ प्रोबेशन ’ चीं म्हणून गेलीं, त्याचप्रमाणें शेवटचीं दोन वर्षें ‘ फर्लो ’ चीं गेलीं. गोखल्यांनीं १८८७ च्या जानेवारींत फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर म्हणून प्रवेश केला, आणि १९ सप्टेंबर १९०२ रोजीं फर्ग्युसन कॉलेज खरेंखुरें सोडलें. डेक्कन एज्युकेशन सोसायटींतल्या त्यांच्या या सोळा वर्षांच्या कामगिरीचें विवेचन पुढील एका प्रकरणांत स्वतंत्रपणें केलें आहे.

सन १८८७ हें साल गोपाळरावांच्या आयुष्यांत आणखी एक-दोन गोष्टींमुळें महत्त्वाचें आहे. मागें सांगितल्याप्रमाणें घरांतील सर्व मंडळींच्या आग्रहास्तव त्यांनीं दुसरा विवाह केला, तो याच वर्षीं. या वेळेपर्यंत त्यांना वैवाहिक सुख मुळींच मिळालें नव्हतें, तें यापुढें मिळूं लागलें; पण या फायद्याबरोबरच एक पत्नी जिवंत असतां दुसरी केल्याच्या मनस्तापाचा

तोटाही त्यांना यापुढें कायमचा सोसावा लागला. याच वर्षी घडून आलेला दुसरा महत्त्वाचा प्रसंग म्हणजे गोखले आणि माधवराव रानडे यांच्या परिचयाचा होय. वास्तविक गोखले प्रथम पुण्यास आले, त्याच वर्षी त्यानीं रानड्यांना पाहिलें होतें. (Speeches of G. K. Gokhale (1920); pp. 780-81). पण सहजच त्यांचा परिचय त्या वेळीं नव्हता. पुढें दोन वर्षांनीं कै० आगरकरांच्या सांगण्यावरून खुद्द रानड्यांनीं शिवराम हरि साठे यांना गोखल्यांची गांठ घेण्यास सांगितलें; आणि मग साठ्यांनीं गोखले आणि रानडे यांची ओळख करून दिली. या दिवसापासून गोखले रानडे यांचे शिष्य म्हणून प्रत्यक्ष राजकारणांत पडले.

पुढच्याच वर्षी रानडे यांच्या ताब्यांत असलेल्या सार्वजनिक सभेच्या दुय्यम सेक्रेटरीशिपची माळ गोखले यांच्या गळ्यांत पडली. पुढें थोड्याच दिवसांत क्राफर्ड प्रकरणामुळें सार्वजनिक सभेचे त्यावेळचे मुख्य चिटणीस सीतारामपंत चिपळूणकर यांना राजीनामा देणें भाग पडलें; व ती रिकामी झालेली जागा रानड्यांनीं गोखल्यांना दिली. याच सुमारास गोखल्यांकडे सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचें, व सुधारकाच्या इंग्रजी भागाचें संपादकत्व आलें होतें. पुढें सुमारें चार वर्षांनीं इतर कामाचा व्याप वाढल्यानें गोखल्यांनीं सुधारक सोडला, आणि १८९६ सालीं डेक्कनसभेची स्थापना झाल्यामुळें सार्वजनिक सभेचा व गोखल्यांचा संबंध उरला नाहीं. १८८९ सालीं गोखले काँग्रेसमध्यें प्रथम बोलले, व तेव्हांपासून ते काँग्रेसच्या कामांत महत्त्वाचा भाग घेऊं लागले. १८९५ च्या पुण्याच्या काँग्रेसचे ते चिटणीस होते, आणि त्याच्या आधीं कांहीं वर्षे ते मुंबईच्या प्रांतिकसभेचे चिटणीस होते. १८९७ सालीं गोपाळरावांना वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्यासाठीं विलायतेला जावें लागलें. १८९५ सालीं ते मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो झाले व १८९९ सालीं मुंबईच्या प्रांतिक कायदे-कौन्सिलांत त्यांची निवडणूक झाली. १९०१ सालीं मुंबई कौन्सिलांतून कलकत्त्याच्या कौन्सिलांत त्यांची निवडणूक झाली. १९१५ सालापर्यंत गोपाळराव फेलो व नामदार होते. त्यांच्या या कामगिरीचें विवेचन योग्य स्थळीं केलेलें आहेच.

गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आयुष्यांत १९०५ हें वर्ष अत्यंत महत्त्वाचें आहे. गोपाळरावांच्या कामगिरीची, अवतारकृत्याची परिणति या वर्षांत झाली. ता० १२ जून १९०५ रोजीं ' सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी " स्थापून गोपाळरावांनीं आपल्यापुरती आपल्या कामगिरीची कड पोंचविली; आणि पुढें सहाच महिन्यांनीं त्यांना बनारसच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष-स्थान देऊन त्यांच्या देशबांधवांनीं त्यांच्याविषयींच्या आपल्या प्रेमाची व आदराची पराकाष्ठा करून दाखविली. याच सालीं त्यांना पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष निवडण्यांत आलें होतें. इंग्लंडांतील कामगिरी-बद्दल पुण्याच्या नागरिकांनीं त्यांचें जाहीर अभिनंदन केलें, तें या वर्षींच. १९०४ सालींच लॉर्ड कर्झन साहेबांनीं त्यांना सी. आय. ई. हा किताब अर्पण केला होता.

काँग्रेसच्या कार्याचा प्रसार करण्यासाठीं व हिंदुस्थानाला नव्या राजकीय सुधारणा मिळविण्यासाठीं गोखल्यांना पुढें अनेक वेळां विलायतेला जावें लागलें. महात्मा गांधी यांनीं दक्षिण आफ्रिकेंत सुरू केलेला सत्याग्रहाचा सामना तडजोडीनें मिटविण्यासाठीं त्यांना दक्षिण आफ्रिकेंतही जावें लागलें. सरकारानें त्यांची पब्लिक सर्व्हिस कमिशनवर नेमणूक केल्यामुळें त्या कमिशनच्या कामासाठींही त्यांना इंग्लंडच्या एकदोन खेपा कराव्या लागल्या. गांधींच्या सत्याग्रहाला हिंदुस्थानांतून पैशाची मदत करण्यासाठीं त्यांना फारच श्रम करावे लागले. १९०७ पासून पुढचीं सर्व वर्षें त्यांना अत्यंत काळजीचीं व दगदगीचीं अशीं गेलीं. सुरतेला काँग्रेसचें तारूं दुहीच्या खडकावर आपटलें, व पुढें देशांत अत्याचारी लोकांनीं आपलें डोकें वर काढलें; आणि सरकारनेंही आपलीं दडपशाहीचीं हत्यारें पाजळलीं. लोकांना योग्य तो उपदेश करून सरकारला समजुतीच्या चार गोष्टी सांगण्याचें बिकट काम गोपाळरावांना करावें लागलें. दरम्यान अधिकारविभागणी कमिशनपुढें त्यांची महत्त्वाची साक्ष झाली. १९०७ सालीं त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत एक व्याख्यानमाला सुरू केली होती. १९१० सालीं त्यांनीं रानड्यांचें स्मारक सिद्ध केलें, अशा बहुविध कामाच्या दगदगीनें आधींच

खालावलेल्या त्यांच्या प्रकृतीला कॉंग्रेसच्या तडजोडीचें निमित्त मिळून, पब्लिक सर्व्हिस कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध होण्यापूर्वींच, तारीख १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं, त्यांना इहलोकची यात्रा संपवावी लागली.

वस्तुतः हें प्रकरण येथेंच संपलें. गोखल्यांच्या चरित्राची रूपरेषा य.त दिली आहे. सार्वजनिक कार्यांत मनुष्य पडूं लागला, व त्यांत त्यानें नांव मिळविलें म्हणजे त्याच्या खासगी चरित्राकडे सहजच दुर्लक्ष होतें. पण थोड्याशा विचारानें असें कळून येईल कीं, सार्वजनिक आयुष्यक्रम खासगी आयुष्यक्रमाच्या अनुरोधानेंच बनत जातो. खासगी आयुष्यक्रमांत व्यक्तीवर आलेले प्रसंग, थोडे तरी त्याच्या सार्वजनिक आयुष्यक्रमावर परिणाम करितात. या दृष्टीनें, आणि पुढील प्रकरणांतून गोखल्यांविषयींची जी माहिती देणें युक्त होणार नाहीं, पण वस्तुतः जी त्यांच्या चारित्रलेखकानें द्यावयास पाहिजे, अशी माहिती देण्याच्या हेतूनें, पुढील विस्तार केला आहे.

गोखले कोंकणांत जन्मले व कोल्हापुरास वाढले हें जरी खरें असलें, तरी पुढें त्यांचें कायमचें वास्तव्य पुण्यासच झालें. बाहेर गोखल्यांना कोणी ओळखीत ते पुण्याचे गोखले म्हणू च ओळखीत; आणि गोखल्यांनींही कायदे-कौन्सिलांत प्रसंग आला असतां ‘ मी पुण्याचा ’ असेंच सांगितलें आहे. ‘ सर्व्हंट्स ऑफ इंडिया ’ काय किंवा ‘ रानडे इंन्स्टिटयूट ’ काय, या दोनही संस्था त्यांनीं पुण्यासच स्थापन केल्या. गोखले १८८५ सालीं पुण्यास आले व १९१५ सालीं पुण्यासच वारले आरंभीं ते व आगरकर शनिवार पेठेंतील तांब्यांच्या वाड्यांत राहत असत. पुढें ते सहकुटुंब भाट-वडेकरांच्या वाड्यांत राहूं लागले. सन १८९१ साल हें त्यांच्या खासगी आयुष्याक्रमांत बरेंच महत्त्वाचें आहे. या सालीं कोंकणांत त्यांची पहिली बायको वारली, त्यांना पहिला मुलगा झाला व पंधरा दिवसांतच वारला, आणि याच सुमाराला त्यांच्या जवळ असलेली त्यांची आई वारली. पुढें दोनच वर्षांनीं, म्हणजे १८९३ सालीं सप्टेंबर महिन्यांत त्यांच्या थोरल्या मुलीचा— काशीबाईचा— जन्म झाला. काशीबाई मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी. ए. असून त्यांचा विवाह १९१८ सालीं श्री० शंकरराव ढवळे, आय. सी.

एस. यांच्याशीं झाला. त्यांचें सासरचें नांव सौ० आनंदीबाई ढवळे हें असून त्यांना दोन मुलगे झाले आहेत. ( महाराष्ट्राचे पंचप्राण; पृ. ११४ ) पुणें येथें होऊं घातलेल्या आपल्या वडिलांच्या स्मारकाला त्यांनीं नुकतीच एक मोठी देणगी दिली आहे. गोपाळरावांची दुसरी मुलगी गोदूबाई हीं नेहमीं आजारी असे, व ती वडिलांच्या मृत्यूनंतर फार दिवस जगली नाहीं. त्यांची दुसरी बायको सन १९०० सालीं वारली, व त्यानंतर गोपाळरावांनीं पुनः विवाह केला नाहीं.

डे. ए. सोसायटींत आल्यावर त्यांची सांपत्तिक स्थिति पूर्वींपेक्षां सुधारली, तरी ते श्रीमंत असे कधींच झाले नाहींत. १८८७ सालीं त्यांनीं आपलें सर्व-प्रसिद्ध 'अंकगणित' लिहिलें, व तें पुढें 'मॅक्मिलन कंपनी' नें घेतल्यावर त्यांना चांगला पैसा मिळाला. कौन्सिलाच्या कामांतून जो पैसा मिळे तो त्यांतच खर्च होई. स्वार्थत्यागाचा मार्ग एकदां पटल्यावर, गोपाळरावांनीं त्यांत पराकाष्ठा केली. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचें काम त्यांनीं बिन-पगारी केलें. प्रपंच चालवून जी शिल्लक उरे, ती गोपाळराव कागलास पाठवीत. गोपाळरावांच्या शिक्षणासाठीं गोविंदरावांच्या पत्नीनें मोडलेले दागिने तिला सव्याज परत मिळावे, हा गोपाळरावांचा हेतु.

आयुष्याच्या पूर्वार्धांत गोपाळरावांची शरीरप्रकृति चांगल्यापैकीं होती. क्रिकेट, टेनिस वगैरे खेळ या वयांत गोखले पुष्कळ खेळले. १८८७-८९ सालांत त्यांना क्रिकेटचा बराच नाद असे. पुढें दिसेल त्या गोष्टीचा छंद घेऊन तिच्यांतच रमून जावयाचें, ही जी लहान मुलांची प्रवृत्ति, ती गोपाळरावांचीही असे, असें वाटतें. बिलियर्डनेंही एकदां ते क्रिकेटसारखे वेडावून गेले होते. दररोज त्यांचे किती तरी तास या खेळापायीं खर्च होत. पुढें त्यांच्या डाव्या आंगठ्याला इजा झाल्यामुळें त्यांचा हा खेळ आपो-आपच सुटला. त्याची जागा भरून काढण्यास किती तरी उमेदवार हजर होते. बुद्धिबळें, पत्ते, गंजिफा आणि सोंगट्या हे खेळ ते हौसेनें खेळत. एकदां तर ते चोवीस तासांपैकीं चौदा तास पत्ते खेळले असें डॉ० र० पु० परांजपे हे सांगतात. परंतु कामाचा व्याप जसजसा वाढत चालला, तस-

तसें शरीराकडे दुर्लक्ष्य होत गेलें, आणि त्याचा परिणाम लवकरच दिसून येऊं लागला. आधींच त्यांना मधुमेहाची व्यथा होती; तशांतच १८९७ सालीं विलायतेला जातांना आगबोटीवर केबिनच्या दाराचा त्यांच्या हृदयाला धक्का बसला. तसेंच १९०५ सालीं विलायतेहून परत येतांना त्यांच्या घशाचें ऑपरेशन आगबोटीवरच करावें लागलें. ( मनोरंजन– वसंत अंक १९१५; पृ. ४७६ ) सन १९१४ च्या ऑक्टोबराच्या आधींच इंग्लंडांतील डॉक्टरांनीं त्यांच्या प्रकृतीबद्दल भीति प्रदर्शित केली होती. शेवटीं शेवटीं, आपली स्मरणशक्ति कमी होत असल्याचें त्यांना आढळून आलें होतें. अशा परिस्थितींत कांहीं अनिष्ट प्रकारांची भर पडल्यामुळें त्यांचा आजार बळावून, त्यांतच त्यांचा अंत झाला.

गोखल्यांनीं पहिलें जाहीर भाषण केव्हां केलें, हा प्रश्न थोडासा वादाचा असल्यानें त्याचा येथें विचार करूं. मनोरंजनाच्या आगरकर अंकांत श्री० मा० दा० आळतेकर यांनीं आगरकरांचें चरित्र लिहिलें आहे. त्यांत ते म्हणतात:— “ तुरुंगांतून सुटल्यावर या दोघां तरुणांचा मोठा सन्मान झाला. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं आगरकर व टिळक यांना मुंबई येथें पानसुपारी दिली, व त्याच वेळीं प० वा० गोपाळराव गोखले यांनीं जाहीरसभेंत आपलें पहिलें भाषण केलें. ” ( मनोरंजन– आगरकर अंक, जुलई १९१६; पृ. ११ ) उलट कै० वा० ब० पटवर्धन स्पष्टपणें म्हणतात:— “ गोखल्यांचें जाहीरसभेंतील पहिलें भाषण मामलेदारकमिशनासंबंधानें १८८८ सालीं पुण्याला एक सभा भरली होती तींत झालें. ” (मनोरंजन– वसंत अंक १९१५; पृ. ३४०) या दोन विधानांपैकीं पटवर्धनांचें विधानच खरें असावेसें वाटतें. न० चिं० केळकरकृत टिळक-चरित्रांत याबद्दल जी हकीकत आहे, तिच्यांत राजाराम कॉलेजच्या सत्काराचा उल्लेख नाहीं. पण पृ. १४६ वर डेक्कन कॉलेजाच्या सत्काराचा उल्लेख आहे. यावरून राजाराम कॉलेजाच्या विद्यार्थ्यांनीं मुद्दाम मुंबईला जाऊन सत्कार केला ही गोष्ट बरीचशी संशयास्पद ठरते. परंतु उल्लेखाभाव हें लंगडें प्रमाण म्हणून सोडून दिलें, आणि राजाराम कॉलेजच्या

विद्यार्थ्यांची पानसुपारी वादाकरितां क्षणभर गृहीत धरली, तरीही गोखले तेथें हजर होते, ही गोष्ट खरी वाटत नाहीं. खाणावळीचा दर स्वतःच आठ आण्यांनीं वाढवून घेतल्यामुळें, सुट्टीच्या दिवशीं उपाशी राहणारे गोखले ( वसंत अंक १९१५; पृ. ३१५ ) कोल्हापुराहून मुंबईला जाऊन वयाच्या सोळाव्या वर्षीं जाहीरसभेंत भाषण करतील हें संभवतच नाहीं. या गोष्टीच्या महत्त्वाच्या मानानें झाला हा विस्तार पुरेसा झाला.

गोखल्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मारकाच्या चळवळी सहजच सुरू झाल्या. कांहीं ठिकाणच्या चळवळी अद्याप अपूर्ण असून स्मारकें सिद्ध झालीं नाहींत. पण सुदैवानें गोपाळरावांचें मूळ गांव जें ताम्हनमळा, तेथें त्यांचें स्मारक त्यांच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनीं झालें. याबद्दल श्री० आपटे लिहितात:—" ताम्हनमळा येथून चिपळुणास जाण्याकरितां, ताम्हनमळा येथील गोखले मंडळींनीं साधारण रस्ता तयार केला. ' गणेशखिंड ताम्हनमळा ' असें नांव देऊन तो तालुकाबोर्डानें साधारणपणें तयार केला. पुढें कै० नामदार गोखले मरण पावल्यावर सन १९१६ सालीं तालुकाबोर्डानें त्यांचें स्मारक ह्मणून त्याला " गोखले रोड " असें नांव देऊन, त्याच सालीं गणेशखिंडींत जेथून या रस्त्याला आरंभ होतो त्यालगत गोखल्यांचे नांवाचा स्तंभ उभारून पक्का रस्ता करण्याला सुरुवात केली... या ( गणेश ) खिंडीपासून हा ' गोखले रोड ' गोखल्यांचे घरापर्यंत १० मैल, २ फर्लांग आहे. " ( गोखले-रास्ते घ० चा इ०; पृ. ४१ ). हें जन्मभूमीलगतचें स्मारक सोडल्यास गोखल्यांच्या स्मारकांच्या बाबतींत मुंबई इलाखा बराच मागें आहे असें म्हणावें लागतें. मद्राससारख्या दूरच्या ठिकाणीं ' गोखले हॉल ' होऊन कितीतरी वर्षें झालीं; पण पुण्यांतील ' गोखले हॉल ' अद्याप तयार झाला नाहीं. गतवर्षीं डॉ० सप्रू यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें जी अखिल भारतीय प्रागतिक परिषद झाली, ती ना० गोखले यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ बांधल्या जाणाऱ्या सभामंदिराच्या जागींच भरविण्यांत आली होती. या परिषदेपासून ना० गोखले यांच्या स्थानिक स्मारकाची विशेष जोरानें व नेटानें उचल झाल्यासारखी दिसूं

लागली. प्रत्यक्ष इमारतीचें बांधकाम जरी अझून जोरांत सुरू झालें नसलें, तरी या ' हॉल ' च्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ ता० १० सप्टेंबर सन १९२५ रोजीं त्या वेळचे मुंबई सरकारच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद नामदार लल्लुभाई सामळदास सी. आय. ई. यांच्या हस्तें मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. मुंबई येथें ' गोखले एज्युकेशन सोसायटी ' या नांवाचें ना० गोखले यांचें एक सुंदर शिक्षण-विषयक स्मारक झालें असून या स्मारकसंस्थेनें थोड्याच अवधींत स्वतःचें एक आर्टस् कॉलेजही नाशिक येथें चालविलें आहे.

गोखल्यांच्या चरित्राची रूपरेषा वर्णन करणारें हें प्रकरण श्री० नटेसन यांचा एक उतारा देऊन पूर्ण करूं.

" A graduate at eighteen, Professor at twenty, Editor of a journal like the Quarterly of the Poona Sarvajanic Sabha at twenty-one, Secretary of the Provincial Conference at twenty-five, Secretary of the Nationol Congress at twenty-nine, leading witness before a most important Royal Commission at thirty-one, Provincial Legislator at thirty-four, Imperial Legislator at thirty-six, President of the National Congress at thirty-nine, National Envoy to the Imperial Government and founder of institutions at forty—what a truly marvellous and brilliant career has it been and how mournful it is to think that a life of such singular gloriousness had been so soon cut-short ! " ( Speeches of Gokhale p. xxxi ).

## प्रकरण २ रें.

# डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील कामगिरी.

योगायोग ह्मणा, किंवा दुसरें कांहीं ह्मणा, हिंदुस्थानांत पुढारी ह्मणून प्रसिद्धीस आलेले बहुतेक थोर लोक आरंभीं शिक्षक होते! न्यायमूर्ति रानडे, टिळक, चिपळूणकर, आगरकर वगैरे महाराष्ट्रीय पुढारी सोडले, तरी आनंदमोहन बोस, अरविंद घोष अशांसारखे परप्रांतीय पुढारीही सार्वजनिक आयुष्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षकच होते. सर सुरेन्द्रनाथ बानर्जी सिव्हिल सर्वंट होते; पण त्यांच्यावर सरकारी अवकृपा झाल्यावर त्यांनींही रिपन कॉलेज काढून शिक्षकाचाच धंदा केला! राजकीय पुढाऱ्याला लागणारें भांडवल एका अर्थानें शिक्षकाला मुबलक मिळतें, तर दुसऱ्या अर्थानें मुळींच मिळत नाहीं. तरुण पिढीला योग्य तें वळण देऊन तरुणांचीं मनें राजकीय उन्नतीसाठीं तयार करणें हें शिक्षकाला साधतें, आणि अशा रीतीनें तयार केलेल्या अनुयायांचा तो पुढारी बनतो. अनुयायी हेंच पुढाऱ्यांचें भांडवल या दृष्टीनें शिक्षकाला हवें तितकें व हवें तसें भांडवल पैदा करतां येतें हें खरें; पण स्वतःची तयारी हा जर भांडवल या शब्दाचा अर्थ घेतला, तर शिक्षकाच्या धंद्यांत या अर्थाला पोषक असें फारसें कांहीं नाहीं. द्रव्य, कायद्याचें ज्ञान आणि देशांतील बहुजनसमाजाशीं विशेष परिचय हें राजकीय पुढाऱ्याचें खरें भांडवल आणि हें भांडवल शिक्षकाला मिळणें सहसा कठीण. देशासाठीं कांहीं तरी करण्याची उत्कट तळमळ राजकीय पुढाऱ्याला अवश्य असावी लागते, आणि या तळमळीचा प्रवाह इतका जोरदार असतो कीं, कोणत्याही धंद्याच्या खडकाला वळसा घालून, किंवा शक्य तर भेदून तो प्रवाह राजकीय चळवळीकडे वळतो.

टिळक-आगरकरांसारख्यांच्या मनांत ही तळमळ जशी स्वयंस्फूर्तीनें उत्पन्न झाली, तशी गोखल्यांच्या मनांत झाली नाहीं. कॉलेजांतील शिक्षणक्रम संपविल्यावर टिळक-आगरकरांपुढें ' ततः किम् ' हा प्रश्न आलाच; पण तो ' कसें करूं ' या अर्थानें आला, ' काय करूं ' या अर्थानें आला नाहीं. काय करावयाचें हें त्यांनीं आधींच पक्कें ठरविलें होतें, तें कशा रीतीनें करावयाचें हाच प्रश्न त्यांच्यापुढें मुख्यतः आला, व तो विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या साहाय्यानें ताबडतोब सुटलाही. पण गोखल्यांचें असें नव्हतें. बी. ए. झाल्यावर ' कोणत्या दिशेनें जाऊं, या कीं त्या ' अशी दिङ्मूढता त्यांना प्राप्त झाली होती. " देशभक्ति किंवा देशाभिमान वगैरेंचा उदय अजून फारसा झालेला नव्हता," ( वसंत अंक १९१५; पृष्ठ ३२६ ) हीच गोष्ट खरी. वकिलीच्या वर्गांत जाऊन कांहीं पोटाची सोय साधतां आली तर पहावी, याच हेतूनें त्यांनीं न्यू-इंग्लिश स्कुलांत शिक्षकाची नोकरी धरली. दुसरीकडे त्यांना नोकरी मिळाली असती, तर तीही त्यांनीं पत्करली असती, असें म्हणण्यांत फारशी चूक होईल असें वाटत नाहीं. न्यू-इंग्लिश स्कुलांत नोकरी धरल्यावर मात्र तेथील उच्च वातावरणानें त्यांना मोहून टाकिलें यांत शंका नाहीं. पी. ई. च्या वर्गांत असतांना ज्या अस्फुट भावनेनें त्यांनीं नाटकांत काम केलें, ती भावना या वातावरणांत चांगलीच बळावली. टिळक-आगरकरांनीं कारागृहवासासारख्या आपत्ति सोसून जें यश संपादन केलें, त्याचा परिणाम गोखल्यांवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. टिळक-आगरकरांपैकीं कोणाच्याबद्दल गोखल्यांना प्रथम विशेष आदर होता, असा एक प्रश्न उद्भवतो, व सुदैवानें या प्रश्नावर सर्व मतांच्या लोकांचें एकमत आहे. " गोखले सोसायटींत आले ते टिळक-भक्तीनेंच आले. " ( टिळक-जीवनरहस्य; पृष्ठ ६८ ) हेंच तें एकमत होय. टिळकांच्या प्रतिपक्षीयांच्या अग्रेसरांनीं हें विधान केलें असल्यामुळें त्यावर खरेपणाचा शिक्का मारण्यास कांहींच हरकत नाहीं.

प्रो० पटवर्धनांच्या मताप्रमाणें १८८५ सालीं टिळकांविषयीं गोखल्यांना फार आदर होता; पण पुढच्याच वर्षीं टिळकांच्या जागीं आगरकर आले.

आगरकर व गोखले हे याच सुमारास एका घरांत राहूं लागले; आणि एका गोपाळरावांचा स्वभाव दुसऱ्या गोपाळरावांशीं जुळूं लागला. आगरकर व टिळक यांच्यामध्यें मतभेद पूर्वींपासूनच होता. पण दोघांनाहि प्रिय असणारें शिक्षणप्रसाराचें कार्य करूं लागल्यास हे मतभेद असून नसल्यासारखे होतील, असा जो त्यांचा विचार, तो मात्र दुर्दैवानें खरा ठरला नाहीं. मतभेद बाजूला सारण्याच्या निश्चयानें १८८० सालीं न्यू-इंग्लिश स्कूल स्थापन केलें; पण पुढच्या सालीं मतप्रसाराचें साधन म्हणून 'केसरी' वर्तमानपत्र काढलें! हा प्रकार ह्मणजे एक प्रकारचा विसंगतपणाच होय. एका हातानें मतभेद गाडला; आणि दुसऱ्या हातानें तो उकरून काढला! वर्तमानपत्रामुळें कामाचा व्याप व जबाबदारी वाढत गेली; आणि भांडणें अपरिहार्य झालीं. केवळ एकाच उद्योगाला चिकटून राहातां आलें असतें, तर टिळक-आगरकरांचे मतभेद कदाचित् उजेडांतही आले नसते.

पण टिळक-आगरकरांच्या मतभेदाचा प्रश्न येथें गौण होय. गोखल्यांचा या वादांत जेवढा भाग येतो, तेवढ्याचाच थोडक्यांत विचार करूं. १८८५ त गोखले शिक्षक म्हणून आले, व ते १८८६ च्या शेवटीं लाईफ मेंबर झाले हें मागें सांगितलेंच आहे. ( प्रकरण १ लें ) अर्थातच या दोन वर्षांत गोखल्यांचा टिळक-आगरकरांच्या वादाशीं कांहींच संबंध प्रत्यक्षपणें आला नव्हता. या अवधींत अप्रत्यक्षपणें त्यांच्या मनांतून टिळक उतरले असतील, किंवा टिळकांच्या मनांतून ते उतरले असतील. १८८७ च्या जानेवारीपासून गोखले लाईफ मेंबरांच्या बोर्डाचे सभासद झाले; आणि टिळक-आगरकरांमधील वाद त्यांना ऐकावयाला मिळूं लागला. तरी पण खुद्द गोखले आणि खुद्द टिळक यांचा सामना प्रथम १८८८ सालीं सार्वजनिक सभेचें काम गोखले करूं लागले, त्यावेळीं झाला. तरीही, प्रो० पटवर्धनांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे, गोखले हे 'नवथर' मंडळींतच मोडत; 'वडील' मंडळींत त्यांचा समावेश सहजच झाला नव्हता. या सामन्यांत टिळकांचा अगदीं उघड उघड पराभव झाला; कारण टिळकांचें सोसायटींतील वर्चस्व मागेंच नष्ट झालें होतें. गोखल्यांच्या विरुद्ध केलेल्या

सामन्यांत पराजय झाल्यानंतर पुढें थोडयाच दिवसांत टिळकांनीं १८८९ मध्यें सहा महिन्यांची रजा घेतली; आणि परत आल्यानंतर थोड्या दिवसांनीं राजीनामा दिला. येथें गोखले आणि टिळक यांचा सोसायटीच्या बाबतींतला संबंध तुटला.

टिळक-नामजोशी सोसायटी सोडून गेल्यानंतर १८९१ सालापासून गोखल्यांच्या सोसायटींतलि कर्तबगारीला खरी सुरुवात झाली. सोसायटीसाठीं वर्गणी जमविण्याचें महत्त्वाचें काम नामजोशी करीत, आणि टिळक गणित शिकवीत. हीं दोनही कामें आतां एकट्या गोखल्यांवर पडलीं. कॉंग्रेसमध्यें गोखले यापूर्वींच चमकूं लागले होते, यामुळें बाहेरील लोकांना ते परिचित असत. याशिवाय उत्साह आणि वक्तृत्व हे गुण त्यांच्याजवळ असल्यामुळें १८९२-९४ पर्यंत सोसायटीसाठीं पैसे त्यांनाच मिळवावे लागले. गणिताला प्रोफेसर पाहिजे होता, तो मिळेपर्यंत स्वतःच्या विषयांखेरीज गणितही त्यांना शिकवावें लागलें. १८९१ च्या नवंबरपर्यंत पी. ई. व फर्स्ट बी. ए. हे दोनच वर्ग फर्ग्युसन कॉलेजांत होते, पुढें सेकंड बी. ए. चा वर्ग काढण्याची परवानगी मिळाली. तेव्हां गोखल्यांनीं आपले जुने सहाध्यायी धोंडो केशव कर्वे यांना बोलावून आणून दोन वर्षांच्या प्रोबेशनवर त्यांना गणिताचे प्रोफेसर नेमलें. प्रो० कर्व्यांनीं ता० १५ नवंबर १८९१ रोजीं आपल्या कामाचा चार्ज घेतला. (आत्मवृत्त, पृ. १७३ ) प्रोबेशनची मुदत भरण्याची वाट न पहातां प्रो० कर्व्यांना १८९२ च्या एप्रिलांत लाईफ मेंबर करून घेण्यांत आलें. ( आत्मवृत्त, पृष्ठ १७५. )

ज्या वर्षीं प्रो० कर्वे लाईफ-मेंबर झाले, त्याच वर्षीं प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे वारले. यामुळेंही कॉलेजचे हाल झाले. प्रो० आगरकर प्रिन्सिपाल आगरकर झाले, आणि काम पुढें चालूं झालें. पण दैवाला गोपाळरावांचा अंतच पहावयाचा होता असें दिसतें. एकदोन वर्षें जातात न जातात तोंच १८९५ त प्रो० वासुदेवराव केळकर वारले, आणि लगेच महिन्या दीड महिन्यांत आगरकर वारले!! यावेळीं गोपाळरावांची स्थिति जितकी अनुकंपनीय तितकीच अभिनंदनीय होती. सोसायटींतील सर्व कर्ते-

पण आतां त्यांच्याकडे पूर्णपणें आलें. त्यांच्याहून वडील असे माधवराव गोळे आतां प्रिन्सिपाल झाले, आणि गोपाळरावांनीं रिकाम्या झालेल्या अध्यापकांच्या ‘ खुर्च्या ’ भरून काढण्यासाठीं खटपट चालविली. आगरकरांची जागा लवकर भरून काढतां आली. सेल्बी साहेबांचे पट्टशिष्य गोविंद चिमणाजी भाटे हे गोखल्यांच्या वक्तृत्वानें मोहित झाले होते. त्यांनीं लाइफ मेंबर होण्याचें तेव्हांच कबूल केलें. प्रो० भाटे हे आज विलिंग्डन कॉलेजचे प्रिन्सिपाल आहेत. प्रो० केळकरांच्या मृत्यूनें सोसायटीची अपरिमित हानि झाली होती. इंग्रजीचे अध्यापक या नात्यानें त्यांचा फारच मोठा लौकिक होता. त्यांच्या इंग्रजी शिकविण्याच्या शैलीची सर्वच जण अत्यंत प्रशंसा करतात. ते स्वतः मोठे मार्मिक रसिक व अभिनयपटु असल्यामुळें त्यांचें ‘ त्राटिका ’ नाटक आजही अत्यंत लोकप्रिय असलेलें आपण पहातों. डेक्कन कॉलेज आपल्या ताब्यांत घेऊन त्याच्यावर आपल्यांतलाच कोणीतरी प्रिन्सिपाल नेमावयाचा, व सर्व शिक्षणक्रम युरोपियन प्रोफेसराचें लोढणें गळ्यांत अडकविल्याशिवाय पार पाडावयाचा अशी महत्त्वाकांक्षा डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या तरुण चालकांनीं जी मनांत वागविली होती, ती केळकरांसारखे निष्णात प्रोफेसर त्यांच्यजवळ होते म्हणूनच. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आरंभींचे बहुतेक सर्वच लोक आपापल्या विषयांत अत्यंत प्रवीण असेच होते, व त्यांच्यापैकीं टिळक हे सोसायटी सोडून गेलेले; व आपटे, आगरकर व केळकर हे एकामागून एक मृत्युमुखीं पडलेले—अशा बिकट परिस्थितींत कर्वे, भाटे व राजवाडे अशांसारखीं माणसें मिळवावयाचीं, व तीं मिळेपर्यंत त्यांचे विषय स्वतःच शिकवावयाचे असें दुहेरी काम वर उल्लेखिल्याप्रमाणें गोखल्यांना करावें लागलें.

योग्य मनुष्याची निवड करणें हें किती कठिण आहे हें निराळें सांगावयास नकोच. त्यांतून योग्य मनुष्याला स्वार्थत्यागाची दीक्षा देणें हें काम तर अधिक कठिण. पण डेक्कन एज्युकेशन सोसायटीसाठीं गोखल्यांना हीं कामें अनेक वर्षें करावीं लागलीं. याच प्रकरणांत पुढें उल्लेखिलेल्या शेवटच्या मानपत्रप्रसंगीं उत्तर देतांना गोखल्यांनीं जें सुंदर व मननीय भाषण

केलें त्यांत त्यांनीं डॉ० र० पु० परांजपे व प्रो० वै० का० राजवाडे यांच्या स्वार्थत्यागाबद्दल अत्यंत गौरवपूर्ण उद्गार काढले आहेत. 'गुणी गुणं वेत्ति' या न्यायानें हे उद्गार सार्थ आहेतच, पण स्वार्थत्याग स्वतः गोखल्यांनीं केला असल्यामुळें 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे' या दृष्टीनें त्या उद्गारांत विशेष स्वारस्य आहे.

नामजोशी यांच्याकडे असणारें, व ते सोसायटी सोडून गेल्यामुळें तहकूब राहिलेलें सोसायटीसाठीं वर्गणी जमविण्याचें कामही गोखल्यांनाच करावें लागलें हें वर सांगितलेंच आहे. गोखल्यांनीं हें कामही आस्थेवाईकपणानें केलें. फर्ग्यूसन कॉलेज व वसतिगृहें या इमारती बांधून पूर्ण झाल्या तेव्हां त्या कर्जमुक्त स्थितींत होत्या. हें केवळ गोखल्यांच्या श्रमाचें फळ. अनेक भानगडीच्या प्रश्नांत सोसायटीची बाजू स्वाभिमानानें व स्पष्टपणानें सरकारपुढें मांडण्याचें नाजुक पण जोखमीचें काम गोखल्यांनाच करावें लागे. सोसायटीच्या घटनेच्या फेरफाराची जबाबदारीही गोखल्यांनाच संभाळावी लागे.

माधवराव गोळे यांच्यानंतर व डॉ० र० पु० परांजपे हे सीनियर रँग्लर होऊन विलायतेहून परत येईपर्यंत गोखल्यांना प्रिन्सिपालचें कामही करावें लागलें. प्रिन्सिपाल ही मानाची जागा तर खरीच, पण त्यापेक्षांही ती जिकीरीचीच अधिक. गोखल्यांनीं मानाकडे सरास दुर्लक्ष्य करून जिकिरीची कामगिरी अत्यंत चोखपणें बजावली व प्रिन्सिपालची जागा डॉ० परांजपे परत आल्यावर त्यांच्या हवालीं करून गोखले मोकळे झाले. डॉ० परांजपे यांच्या अमदानींत फर्ग्युसन कॉलेजची सर्वतोपरी अभूतपूर्व भरभराट झाली, पण तिचें बरेचसें श्रेय गोखल्यांच्या पूर्वींच्या प्रत्यक्ष कामगिरीला व पुढच्या सल्लामसलतीलाच दिलें पाहिजे.

शिक्षक या नात्यानें गोखले हे अत्यंत कष्टाळू व आस्थेवाईक होते. त्यांचा इंग्रजीचा व्यासंग व पाठांतरशक्ति हीं दोनहि विलक्षण असल्यामुळें सामान्य विद्यार्थ्यांना ते जास्त पसंत पडत. परिस्थितीमुळें त्यांना एकाच विषयाला केव्हांच चिकटून राहातां आलें नाहीं. थट्टेनें त्यांना Professor to order म्हणजे हरकाम्या किंवा 'सब-जानतेवाला' प्रोफेसर असें

म्हणत असत असें परांजपे यांनीं नमूद करून ठेवलें आहे. (पृष्ठ १०). परांजपे यांना इंग्रजी शिकविण्याचें काम गोखले यांनीं केलें होतें. Scott's Bride of Lammermoor, De Quincey's Opium-eater व Bacon's Advancement of Learning हीं पुस्तकें परांजपे गोखल्यांपासून शिकले. बुद्धिमान् विद्यार्थ्याला घरीं बोलावून गोखले अधिक शिकवीत व सांगत असत. त्यांची व प्रो० वासुदेवराव केळकरांची तुलना मनोरंजक ठरेल. वासुदेवराव केळकर हे इंग्रजीचे नामांकित अध्यापक होते. प्रो० पटवर्धनांनीं म्हटल्याप्रमाणें केळकरांची सहृदयता आणि मार्मिकता गोखल्यांच्या शिकविण्यांत पहिलीं पांचचार वर्षें तरी नव्हती. केळकर एखाद्या शब्दानें किंवा वाक्यानें जी मौज करीत, ती गोपाळरावांच्या दहा मिनिटांच्या विस्तारानेंही होत नसे, असें म्हणतात. पण परीक्षेच्या दृष्टीनें अभ्यास करणाऱ्या सामान्य विद्यार्थ्याला केळकरांपेक्षां गोखलेच अधिक पसंत असत, हें जें डॉ० परांजपे यांनीं लिहून ठेविलें आहे, ( पृष्ठ १२-१३ ) तेंच गोखल्यांच्या इंग्रजी शिकविण्यासंबंधानें खरें धरून चालण्यास कोणतीही हरकत नाहीं.

गोखले शाळेंत व कॉलेजांत गणितही शिकवीत. ते स्वतः गणिताचेच बी. ए. होते; आणि अंकगणितावरील त्यांचें पुस्तक आज सर्वमान्य आहे. पण १८९१ च्या सुमारास गणितावरील त्यांचें प्रेम नष्ट झालें होतें असें परांजपे सांगतात (पृष्ठ १०). टिळक जाऊन कर्वे येईपर्यंत त्यांनीं मुख्यतः गणित शिकविलें; आणि टिळकांच्या शिकविण्याविषयीं ज्या गोष्टी ऐकूं येतात, त्यांवरून पाहिलें तर सामान्य विद्यार्थ्यांना टिळकांपेक्षां गोखलेच आवडत असले पाहिजेत.

पण गोखल्यांचा खरा आवडीचा विषय म्हणजे अर्थशास्त्र हा होय. पुढें कायदेकौन्सिलांत त्यांनीं सरकारला आणि जनतेला अर्थशास्त्राचे जे धडे शिकविले, त्यांचें मूळ कॉलेजांतील अर्थशास्त्राच्या वर्गांत सांपडूं शकेल. न्यायमूर्ति रानडे यांनीं गोखल्यांना अर्थशास्त्र शिकविलें आणि तेंच गोखल्यांनीं कॉलेजांत शिकविलें. इंग्लंडचा इतिहास हा सुद्धां त्यांना फार

आवडे. " या दोन्ही विषयांवरील त्यांचीं व्याख्यानें फार हृद्यंगम असत. इंग्रजी इतिहास शिकवितांना इंग्लंडांतील शासनसंस्था, त्यांचा विकास, प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा विस्तार, अनियंत्रित राज्यसत्तेचें होत गेलेलें नियंत्रण, आयर्लंडांतील स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न, या व अशा अनेक विषयांची व्यवस्थित रीतीनें चर्चा करून हिंदुस्थानच्या परिस्थितीशीं तुलना करून इंग्लंडच्या इतिहासाचें रहस्य विद्यार्थ्यांच्या मनावर ते ठसवीत असत. त्यांचीं अर्थशास्त्रांवरील व्याख्यानें फार मार्मिक असून त्यांनीं विद्यार्थी तल्लीन होत असत. प्रचलित असलेल्या अर्थशास्त्राच्या प्रश्नांचा आपल्या व्याख्यानांत ते ऊहापोह करीत असत. जमीनमहसूल, त्याचा बोजा व त्याचें स्वरूप, शेतकऱ्यांची स्थिति, कर व त्यांचें प्रमाण, चलनी पद्धति, अप्रतिबद्ध व्यापार व त्याचे हिंदुस्थानावरील परिणाम, या सर्व प्रश्नांचा त्यांनीं वर्गांत केलेला खल व शिकविलेल्या कल्पना पुष्कळ विद्यार्थ्यांस त्यांच्या पुढील आयुष्यांत अर्थशास्त्राचे बिकट प्रश्न आकलन करण्यास फार उपयोगी पडल्या आहेत. " ( ग. र. अभ्यंकर यांचें गोखल्यांचें चरित्र पृ. ९-१० )

गोखल्यांनीं विद्यार्थ्यांसाठीं काय केलें हें सांगितल्यानंतर विद्यार्थ्यांनीं गोखल्यांसाठीं काय केलें हें सांगणें ओघानेंच येतें. ता० १९ सप्टेंबर सन १९०२ रोजीं फर्ग्युसन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं गोखल्यांना एक मानपत्र अर्पण केलें. हें मानपत्र त्या वेळचे फेलो प्रो० विश्वनाथ बळवंत नाईक यांनीं लिहिलें होतें व प्रो० राजवाडे यानीं पसंत केलें होतें. या मानपत्राला गोखले यांनीं जें उत्तर दिलें तें गोखल्यांच्या तसेंच डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आयुष्यांत अत्यंत संस्मरणीय असें आहे. उत्तर देतांना गोखले यांचा कंठ दाटून आला, व अनेक कष्टदायक प्रसंग, आगरकर, आपटे, वगैरेसारख्यांच्या मृत्यूंचे प्रसंग त्यांच्या मनश्चक्षूंपुढें उभे राहिले व आपण केलेल्या कृतींचा स्वाभिमानपूर्वक प्रत्यय त्यांच्या मनाला आला. हें सर्वच भाषण अत्यंत वक्तृत्वपूर्ण व स्फूर्तिदायक आहे. मृत्यु व मतभेद या कारणांनीं सोसायटीच्या उत्पादकांपैकीं एकालाही सोसायटीची वीस वर्षें सेवा करतां आली नाहीं. गोखले यांना तें भाग्य मिळालें म्हणून त्यांनीं

Thank God, I was permitted to fulfil my pledge असे धन्योद्गार काढले ! या व्याख्यानांत पुढें Nowhere throughout the country is there an institution like this College of ours असे अभिमानाचे उद्गार काढून शेवटीं गोखले म्हणतात:—

" In leaving you, also I am doing, I feel I am leaving the best work of my life behind me. I trust I may meet some of you hereafter as co-workers in other fields, that we may also occasionally meet within the walls of this College. God bless this College and bless you all ! "

ज्या कॉलेजाविषयीं गोखल्यांना इतकें प्रेम व इतका अभिमान वाटत होता, त्या कॉलेजच्या जोडीला दुसरें कॉलेज आलेलें पहाण्यास व डॉ० परांजपे हे शिक्षणमंत्री व प्रो० काळे हे टॅरिफ बोर्डाचे सभासद झालेले पहाण्यास गोखले हे आज आपणांत नाहींत याचें अत्यंत वाईट वाटतें.

खुद्द डेक्कन एज्युकेशन सोसायटीला गोखल्यांच्या मृत्यूनें काय वाटलें हें त्यांच्याच शब्दांत दर्शवून हें प्रकरण पूर्ण करूं. सोसायटीचें कौन्सिल आपल्या सन १९१४–१९१५ च्या अहवालांत म्हणतें:—

The end of the year was saddened by the death of the Hon'ble Professor G. K. Gokhale, B. A., C. I. E. Words fail to give expression to the deep feelings of sorrow caused by his death. During the last ten years of his Life membership there was not a single measure of the Society in which he had not taken an active and a prominent part. Especially his work in collecting funds for the Fergusson College Buildings was invaluable and was publicly acknowledged by Dr. Selby, the Chairman of the Council, at the time of the opening ceremony of those buildings by Lord Sandhurst, the then Governor of Bombay. They are perhaps the best memorial of the services he has rendered to the Deccan Education Society. Even after his retirement in 1905, in the midst

of the troubles and worries of a strenuous political life, he never forgot his first love. His advice and guidance were always eagerly sought by the Life-members of the Society and were as readily given by him. In him the Society has lost a steadfast friend and adviser, and India one of her noblest son. ( Reports of the D. E. Society for 1914–1915 pp. i–ii. )

---

## प्रकरण ३ रें.

# राष्ट्रीय सभेंतील कामगिरी.

गोखले हे हिंदुस्थानचे एक मुख्य राजकीय पुढारी असल्यानें, हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय सभेचा व त्यांचा संबंध आल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. राष्ट्रिय सभेशीं संबंध न ठेवतां राजकीय काम करण्याचे ते दिवस खचित नव्हते. आज राजकीय काम वाढल्यामुळें ह्मणा, किंवा राष्ट्रीय सभेनेंच राजकारण सोडल्यामुळें म्हणा, राजकीय काम काँग्रेसशीं संबंध न ठेवतां करतां येऊं लागलें आहे. आज जसे देशांतील कांहीं पक्ष काँग्रेसपासून अलग राहून राजकारण करीत आहेत, तसें त्यावेळीं होणें शक्य नव्हतें. राष्ट्रिय सभा स्थापन होऊन कित्येक वर्षें लोटल्यावर मतभेदांना तोंड फुटून पक्षभेद झाले; आणि आज एका पक्षाचें काँग्रेसमध्यें वर्चस्व, तर उद्यां दुसऱ्या पक्षाचें वर्चस्व असा जो प्रकार सध्यां कांहीं वर्षें दिसत आहे तो त्यावेळीं मुळींच नव्हता. पक्षभेद झाल्यावर प्रत्येक पक्षाला काँग्रेस आपल्या बाजूची असावी असें वाटे, आणि ती आपल्या बाजूची व्हावी अशा हेतूनें प्रत्येक पक्षानें खटपटही केली आहे. या खटपटींचा परिणाम सहजच पक्षभेद बळावण्यांत झाला, आणि आज स्थिति अशी आली आहे कीं, यांपैकीं कांहीं पक्षांना काँग्रेसला कायमचा रामराम ठोकावा लागला आहे किंवा लागत आहे.

यावरून एक गोष्ट ठळकपणें दिसून येते ती ही कीं, भिन्न पक्षीयांमध्येंही राष्ट्रीय सभेच्या महत्त्वासंबंधानें एकमत आहे ! ज्यांना राष्ट्रीय सभा सोडावी लागली किंवा लागत आहे त्यांनीं ती सक्तीनें— नाइलाजानें— सोडली. राजकीय चळवळ करणारी हिंदुस्थानांत जर एकच श्रेष्ठ संस्था असेल तर ती राष्ट्रीय सभाच होय, याविषयीं कोणालाही शंका नाहीं. राष्ट्रीय सभेचा इतिहास ह्मणजेच हिंदी राष्ट्राच्या राजकीय प्रगतीचा इतिहास होय. एका वाक्यांत असें ह्मणतां येईल कीं, राष्ट्रीय सभेनें हिंदी लोकांच्या आकांक्षांना जन्म दिला, त्यांना बोलावयास लाविलें, आणि झगडावयास शिकविलें. राष्ट्रीय सभेचा हा स्फूर्तिकारक इतिहास संक्षेपानें येथें सांगितल्याशिवाय गोखल्यांच्या चरित्राला नीट उठाव मिळणार नाहीं.

थोडीशी मौजेची गोष्ट अशी कीं, गोखले ज्या वर्षीं न्यू इंग्लिश स्कुलांत मास्तर होऊन आले, त्याच वर्षीं राष्ट्रीय सभा सुरू झाली ! पण या सुरुवातीलाही एक इतिहास आहे, व तो मनोरंजक आणि बोधप्रद असा आहे. १८५८ सालीं राणीसरकारनें हिंदुस्थानचें राज्य आपल्याकडे घेतल्यानंतर देशांत चोहोंकडे शांतता झाली, आणि मग लोकांना आपलीं सुखदुःखें कळून येऊं लागलीं. देशांतलें पहिलें वर्तमानपत्र सन १७८० सालीं एका इंग्रजानेंच काढलें. पण एकदां पायंडा पडल्यावर राजा राममोहन राय यांच्यासारखे हिंदी लोक पुढें येऊन वर्तमानपत्रें काढूं लागले. सामान्यतः १८३५ पर्यंत वर्तमानपत्रांना स्वातंत्र्य मुळींच नव्हतें; पण या सालीं सर चार्लस मेटकाफ यांनीं तें दिल्यामुळें देशी वर्तमानपत्रांना उत्तेजन मिळून ज्ञानाचा प्रसार हळूं हळूं होऊं लागला. याचवेळेला राजा राममोहन राय हे विलायतेला गेले होते, आणि त्यांची हाऊस ऑफ कॉमन्सच्या एका कमिटीपुढें साक्षही झाली. या साक्षीमुळें त्यावेळीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत कांहीं सुधारणा झाल्या. राजकीय प्रगतीसाठीं विलायतच्या सफरी पुढें गोखलेप्रभृतींना कराव्या लागल्या, त्यांचें मूळ राजा राममोहन रॉयांच्या या सफरींत सांपडतें. राजकीय काम करण्यासाठीं १८५१ च्या सुमाराला बंगाल्यांत ‘ ब्रिटिश-इंडियन असोसिएशन ’ व मुंबईंत ‘ बॉम्बेअसोसिएशन ’ ह्या संस्था स्थापन

झाल्या. कांहीं काळानें पुण्याला ‘ सार्वजनिक सभा ’ व मद्रासला ‘ महाजन सभा’ या संस्था स्थापन झाल्या. त्या वेळीं व पुढें हिंदी राजकारणांत नांवाजलेले लोक या संस्थांतून कामें करीत असत. आज राजकीय चळवळीला जो व्यापक अर्थ आला आहे, तो त्यावेळीं मुळींच नव्हता. प्रांतानिहाय ज्या किरकोळ अडचणी असत, त्याचें निवारण करून घेण्यासाठीं या संस्था खटपट करीत असत. निरनिराळ्या प्रांतांचीं सुखदुःखें निरनिराळीं असत, व त्यामुळें निरनिराळ्या पुढाऱ्यांचें परस्परांत दळणवळण नसे. सर्वांच्या समान दुःखांच्या अस्तित्वाची जाणीव अद्यापि होऊं लागली नव्हती. पण लॉर्ड लिटन हे व्हाइसरॉय झाल्यावर त्यांनीं ही उणीव भरून काढली. आधींच लोकांना राज्यकारभारांत भाग घेतां येत नसे, युरोपियन व हिंदी यांच्यांत विषमता असे, आणि लोकांच्या तक्रारींकडे सरकार लक्ष देत नसे. अशांत लॉर्ड लिटन यांनीं आणखी अन्यायांची भर टाकली. दक्षिण हिंदुस्थानांत उग्र दुष्काळानें कहर उडविला असतां इकडे दिल्लीला या लाटसाहेबांनीं बडा दरबार भरवून प्रजेच्या लाखों रुपयांचा चुराडा केला. दुसऱ्या अफगाण युद्धाला सुरुवात केली, आणि ‘सायंटिफिक फ्रॉन्टियर’ च्या नादानें हिंदुस्थानाच्या पैशाची हवीतशी उधळपट्टी केली. यांच्याच कारकीर्दींत सर्व हिंदी प्रजेला निःशस्त्र करण्यांत आलें, आणि देशी वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करण्यांत आली. लँकेशायरच्या व्यापाऱ्यांना खूष करण्यासाठीं कापडावरील आयात जकात उठविली. अशा एकंदर प्रकारांनीं सर्व हिंदी जनतेला एकत्र यावें असें वाटूं लागलें व याचा परिणाम ‘ इंडियन असोसिएशन ’ ची १८७६ सालीं स्थापना होण्यांत झाला. हिंदुस्थानांत राजकीय ऐक्य आणि सामुदायिक चळवळ घडवून आणणें हे या संस्थेचे मुख्य उद्देश होते. सुरेन्द्रनाथ बानर्जी हे या संस्थेचे आधारस्तम्भ होते, व त्यांना आनंद मोहन बोसांसारख्या पुढाऱ्यांची मनःपूर्वक मदत होती. सुरेंद्रबाबूंनीं १८७७ सालीं उत्तर हिंदुस्थानांत, व १८७८ सालीं दक्षिण हिंदुस्थानांत दौरे काढून प्रमुख शहरीं व्याख्यानें दिली, व याचा परिणाम सर्व हिंदुस्थानातर्फे पार्लमेंटाला सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेबद्दल एक अर्ज पाठविण्यांत

झाला. दु:खामागून सुख या न्यायानें लॉर्ड लिटन यांच्या पश्चात् लॉर्ड रिपन व्हाइसरॉय होऊन आले, व त्यांनीं लिटन साहेबांचीं बहुतेक दुष्कृत्यें धुवून टाकलीं. याशिवाय रिपन साहेबांनीं लोकांस स्थानिक स्वराज्याचे हक्क दिले आणि हिंदी व गोऱ्या लोकांच्यामध्यें न्यायदानाच्या पद्धतींत जो फरक होता तो घालविण्याच्या उद्देशानें, इल्बर्ट बिल पुढें आणलें. या बिलाअन्वयें हिंदी मॅजिस्ट्रेटांना गोऱ्या आरोपींची चौकशी करण्याचे कांहीं हक्क मिळणार असल्यामुळें गोऱ्या लोकांनीं रिपन साहेबांविरुद्ध एकच काहूर माजविलें. सनदशीरपणा पार झुगारून देऊन रिपन साहेबांना परस्पर बोटीवर बसवून विलायतेला सक्तीनें पाठविण्याचा कांहीं गोऱ्या लोकांनीं कट केला होता! (Indian National Evolution : Page 41) यावरून त्यांची एकंदर चळवळ किती तीव्र स्वरूपाची असेल याची कल्पना करतां येते. याच्या उलट हिंदी लोकांचा प्रकार झाला. एकराष्ट्रीयत्वाची भावना उद्भवली नसल्यामुळें व आपलें हिताहित कळत नसल्यामुळें हिंदी लोकांकडून रिपनसाहेबांना पुरेसा पाठिंबा मिळाला नाहीं, व त्यांना हें बिल गाळावें लागलें. यावरून एक गोष्ट स्पष्ट दिसून आली ती ही कीं, सर्व राष्ट्राला एकत्र आणणारी संस्था नसल्यामुळें सर्वराष्ट्रीय चळवळ करून एखादें अहित-कारक सरकारी कृत्य हाणून पाडण्याचें किंवा हितकारक सरकारी कृत्य घडवून आणण्याचें सामर्थ्य हिंदी लोकांत नाहीं. व्यक्तिश: किंवा प्रांतश: ओरड केली तर ती सरकारला ऐकूं जात नाहीं, तेव्हां सर्वजण एकत्र जमून आपलें सर्व बळ एकवटून ओरडूं या, मग सरकारनें न ऐकलें तर पहातां येईल असा विचार हिंदी पुढाऱ्यांना पटूं लागला; व १८८४-८५ सालीं मद्रास, मुंबई व कलकत्ता येथील पुढाऱ्यांनीं सर्व देश एकत्र आणण्यासाठीं निरनिराळ्या संस्था स्थापून काँग्रेसच्या जन्माची पूर्व तयारी करून ठेवली.

पण काँग्रेसला मूर्त स्वरूप देण्याचें काम एका इंग्रजाचें होतें. मि. ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम हे हिंदी राष्ट्रीय सभेचे जनक होत. १८८२ सालीं नोकरीचा राजीनामा दिल्यावर ह्यूमसाहेबांनीं कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांना एक अनावृत्त पत्र लिहून त्यांना देशकार्याविषयीं उपदेश केला.

याचा योग्य तो परिणाम होऊन देशांतील सर्व पुढाऱ्यांची परस्परांशीं ओळख व्हावी व पुढील सालीं कोणती राजकीय चळवळ हातीं घ्यावी हें ठरवितां यावें, या हेतूनें १८८५ च्या नाताळांत पुण्याला पहिली राष्ट्रीय सभा भरविण्याचें ठरलें. हेतूप्रमाणें १८८५ सालीं राष्ट्रीय सभा भरली; पण ती पुण्यास न भरतां मुंबईस भरली एवढाच फरक.

पहिल्या कॉंग्रेसला सारे ७२ प्रतिनिधि हजर होते. पण गोखले ज्या सालीं प्रथम कॉंग्रेसमध्यें बोलले, त्यासालीं १८८९ प्रतिनिधि नोंदले गेले होते. ही फक्त पांचवी बैठक होय हें लक्ष्यांत घेतां राष्ट्रीय सभेचें महत्त्व तेव्हांच कळून येतें. योगायोग असा कीं, गोखल्यांचे सुप्रसिद्ध प्रतिपक्षी टिळक हेही याच राष्ट्रीय सभेंत पहिल्यानें बोलले, आणि विशेष आश्चर्याची गोष्ट अशी कीं, कौन्सिलाच्या ठरावावर टिळकांनीं उपसूचना आणली व तिला गोखल्यांनीं अनुमोदन दिलें! (How India Wrought for Freedom: Page 80) वरिष्ठ कायदेकौन्सिलांतील प्रतिनिधि प्रांतिक कौन्सिलांनीं निवडून द्यावे अशी ही उपसूचना होती, व ती जरी नापास झाली, तरी १८९२ पासून १९१९ पर्यंत टिळक व गोखले यांनीं मिळून सुचविल्याप्रमाणें प्रांतिक कौन्सिलच्या सभासदांनीं वरिष्ठ कौन्सिलचे सभासद निवडून देण्याचीच पद्धति अमलांत होती हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. टिळक आणि गोखले यांचे मार्ग— ध्येय एक असूनहि— पुढें भिन्न झाले, व त्यांचाच इतिहास— राष्ट्रीय सभेपुरता— येथें सांगावयाचा आहे. टिळक आणि गोखले यांचा कॉंग्रेसशीं संबंध १८८९ सालीं प्रथम आला, आणि गोखल्यांपुरता तो १९१४ च्या कॉंग्रेसमध्यें संपला. या अवधींत टिळक आणि गोखले यांचे कॉंग्रेसच्या बाबतींत तीन महत्त्वाचे खटके उडाले. १८९५ सालाचा खटका या तीन खटक्यांत अधिक सौम्य होता म्हणजे त्याचे परिमाण दूरवर पसरून राष्ट्रीय सभेला इजा झाली नाहीं. १९०७ व १९१४-१५ चे खटके मात्र राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत व हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत कायमचे नमूद होण्याइतके महत्त्वाचे आहेत. १८९५ च्या खटक्यानें राजकीय चळवळीचें नुकसान झालें नाहीं, तसेंच १९१४-१५ च्या खट-

क्यानेंही झालें नाहीं. १९०७ सालानें मात्र हिंदी राजकारणाचें पुष्कळच नुकसान झालें, पण १९१४-१५ चा खटका गोखल्यांच्या दृष्टीनें इतका भयंकर ठरला कीं त्यामुळें त्यांचा मृत्यु ताबडतोब घडून आला. १८९५ चें भांडण टिळक ही व्यक्ति व गोखले ही व्यक्ति यांमध्यें नसून सुधारणाविरोधी पक्ष व सुधारकपक्ष यांच्यामध्यें आधीं होतें व मागाहून त्यांत या व्यक्ति गोंवल्या गेल्या; आणि एकदां टिळक सुधारणाविरोधी पक्षांत उघडपणें मिसळल्यावर ते जसे त्या पक्षाचे पुढारी बनले, तसे गोखले सुधारकपक्षाचे बनले नाहींत. यामुळें यावेळीं खरा खटका उडाला तो टिळक आणि रानडे यांच्यामध्यें उडाला, टिळक आणि गोखले यांच्यामध्यें उडाला नाहीं. १९०७ सालींहि व्यक्तीव्यक्तींचा झगडा नसून पक्षापक्षांचा झगडा होता, आणि त्यांतील प्रमुख व्यक्तींचाच निर्देश करावयाचा झाल्यास तो फेरोझशहा व टिळक यांचाच करावा लागेल. प्रतिपक्षीयांचा राग फेरोजशहांवर अत्यंत होता व जोडा मारणाराचा हेतु फेरोजशहांनाच तो लागावा असा होता अशी साक्ष कै० रं० न० मुधोळकर यांनीं दिली आहे! १९१४-१५ सालीं मात्र टिळकांना फेरोजशहांनीं जितका विरोध केला नाहीं तितका गोखल्यांनीं केला व त्याचा परिणाम गोखल्यांना चांगलाच भोंवला. असो, या तीन प्रसंगांचें वर्णन योग्य वेळीं याच प्रकरणांत येणार आहे हें सांगून कॉंग्रेसमधील गोखल्यांची कामगिरी वर्णन करितों.

टिळकांनीं आणलेल्या उपसूचनेला गोखल्यांनीं पाठिंबा दिला, ही गौण कामगिरी झाली. पण याच कॉंग्रेसमध्यें गोखल्यांना अधिक महत्त्वाची कामगिरी देण्यांत आली. एस. रामस्वामी मुदलियार यांनीं मांडलेल्या पांचव्या ठरावाला गोखल्यांनीं दुजोरा दिला. हा ठराव ‘ पब्लिक सर्व्हिस कमिशन ’ संबंधानें होता. सिव्हिल सार्व्हिस परीक्षेला १९ ही वयाची मर्यादा होती, ती २३ करण्यापलीकडे या कमिशननें हिंदी लोकांना संतुष्ट केलें नव्हतें. ही नाखुषी गोखल्यांनीं अत्यंत उत्तम रीतीनें व्यक्त केली. आंकडेवार माहिती भरपूर असल्यानें त्यांच्या भाषणाला नेहमींच महत्त्व प्राप्त होत असे. कॉंग्रेसमध्यें पहिल्याप्रथम ज्या विषयावर ते बोलले, त्याच विषयावरच्या

कमिशनवर ते आपल्या आयुष्याच्या शेवटीं सभासद झाले; यावरून त्यांचा अभ्यास किती पूर्वींपासूनचा होता हें व्यक्त होतें. गोखल्यांच्या या भाषणानें अध्यक्ष वेडरबर्न व पाहुणे ब्रॉडलॉ यांच्या मनांवर चांगलाच परिणाम झाला असला पाहिजे. फेरोजशहा मेथा यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या १८९०च्या कॉंग्रेसमध्यें गोखल्यांनीं पांचव्याच ठरावाला दुजोरा दिला. मात्र हा ठराव मिठावरील कर कमी करण्यासंबंधीं असून तो मि० प्रिंगल केनेडी यांनीं मांडला होता. या ठरावावर केलेल्या भाषणानें फेरोझशहांना गोखल्यांचें कौतुक वाटलें, व एव्हांपासून त्यांचें गोखल्यांविषयीं चांगलें मत झालें. १८९१ सालीं हेरंबचंद्र मित्र यांनीं मांडलेल्या आठव्या ठरावावर गोखल्यांचें भाषण झालें. हा ठराव शिक्षणासंबंधीं होता. या वेळीं कै० वा० ब० पटवर्धन हे नागपुरास असून त्यांनीं गोखल्यांचें हें भाषण ऐकलें होतें. गोखल्यांनीं हें भाषण आधीं लिहून काढलें होतें, असें पटवर्धन सांगतात. १८९२ सालीं गोखल्यांना कॉंग्रेसमध्यें ठराव मांडण्याचा मान मिळाला. १८८९ सालीं ज्या 'पब्लिक सर्व्हिस कमिशन' वर ते बोलले होते त्या कमिशनच्या रिपोर्टावर हिंदुस्थान सरकारानें ठराव काढून कमिशननें देऊं केलेल्या देणग्याही परत घेतल्या होत्या. या वेळचें गोखल्यांचें भाषण विस्तृत, आवेशपूर्ण व त्वेषाचें झालें. ठराव मांडणाराला दुजोरा देणारापेक्षां केव्हांही अधिक वेळ मिळतो, व या वेळेचा गोखल्यांनीं चांगलाच फायदा घेतला. हिंदी लोकांना राज्यव्यवस्थेंत अधिकाधिक भाग द्यावा अशी गोखल्यांची कायमची तक्रार होती. तेव्हां या विषयावरचें त्यांचें भाषण कळकळीचें व परिणामकारक झाल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं. हा ठराव दुसरा असून त्याला पंडित मदन मोहन मालवीय यांनीं दुजोरा दिला होता. ठराव मांडण्याची संधि मिळणें ही योग्यता वाढल्याची व पटल्याची खूण होय. या पुढची कॉंग्रेस दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरल्यामुळें गोखल्यांच्या दृष्टीनें फार महत्त्वाची ठरते. १८८२च्या कौन्सिल आक्टासंबंधींचा ठराव मुधोळकरांनीं मांडला व त्याला गोखल्यांनीं अनुमोदन दिलें. हा जसा पहिला ठराव होता, तसाच १७ वा म्हणजे

जवळ जवळ शेवटचा गोखल्यांनींच मांडला. हिंदुस्थानानें इंग्लंडला देण्याची रक्कम ( Home Charges ) कमी करण्याबद्दल लॉर्ड नॉर्थब्रुक यांनीं खटपट केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्याचा हा ठराव होता. या वेळच्या दोनही भाषणांनीं दादाभाईंचें गोखल्यांविषयीं फारच चांगलें मत झालें असलें पाहिजे. गोखले सार्वजनिक आयुष्यक्रमांत पडल्यापासून लाहोरच्या कॉंग्रेसपर्यंत दादाभाईंची व त्यांची प्रत्यक्ष गांठ पडण्याचा योगायोग आला असेल असें वाटत नाहीं. हा योगायोग या वेळीं जुळून आला व पुढें चारच वर्षांनीं दादाभाईंबरोबर गोखल्यांनीं वेल्बी कमिशनपुढें साक्ष दिली या गोष्टी फारच महत्त्वाच्या आहेत. १८९४ सालीं सिव्हिल सर्व्हिस परीक्षा इंग्लंडांत व हिंदुस्थानांत घेण्याच्या ठरावावर गोखले बोलले होते. पुढच्या वर्षीं तर काय कॉंग्रेस घरींच आलेली. गोखल्यांनीं या वेळेस स्वागताध्यक्ष रा० ब० भिडे यांचें भाषण वाचून दाखविलें. शिवाय मिठाच्या करावरील १९ वा ठरावही त्यांनाच मांडावा लागला. १८९६ सालीं वाच्छा वेल्बी कमिशनपुढें साक्षीला जाणार याबद्दल त्यांचें अभिनंदन करणाऱ्या ठरावाला गोखल्यांनीं दुजोरा दिला.

सन १८९७ सालीं माफी प्रकरण उद्भवल्यामुळें गोखल्यांना एक दोन वर्षें अज्ञातवासांत घालवावीं लागल्याचें दुसरीकडे सांगितलेंच आहे. पण कॉंग्रेसच्या बाबतींत काय झालें कोण जाणे; गोखले १८९६ सालीं जे कॉंग्रेसमध्यें बोलले त्यानंतर पुन: १९०४ सालीं बोलले! दरम्यानचीं सात वर्षें तशींच गेलीं. १९०४ सालीं त्यांनीं आठवा ठराव मांडला. हुंडणावळीच्या कृत्रिम भावानें रुपयाच्या किंमतींत फेरबदल होऊन हिंदुस्थानच्या तिजोरींत जी खूप शिल्लक सांचली होती तिचा विनियोग शिक्षणासारख्या लोकोपयोगी कार्याकडे व्हावा असा हा ठराव होता. पुढच्या वर्षीं गोखले राष्ट्रीय सभेचे अध्यक्षच झाले. त्यांच्या भाषणांत त्यांनीं युवराज व युवराज्ञी आणि लॉर्ड व लेडी मिंटो यांचें स्वागत केलें; लॉर्ड कर्झन यांना औरंगजेबाची उपमा दिली, स्वदेशीचा गौरव केला आणि बहिष्कार हें राजकीय शस्त्र होऊं शकतें असा निकाल दिला. वसाहतींचें स्वराज्य हें हिंदी राष्ट्राचें

ध्येय आहे हें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें. अध्यक्ष असल्यामुळें युवराज-युवराज्ञींच्या स्वागताचा पहिला ठराव व नेहमींच्या तक्रारींचा कायम ठशाचा सतरावा ठराव हे त्यांनाच मांडावे लागले. पुढच्या वर्षीं अध्यक्ष दादाभाई यांचें भाषण गोखल्यांना वाचून दाखवावें लागलें. दादाभाई या वेळीं ८२ वर्षांचे असल्यामुळें त्यांना सुमारें २०००० लोकांना ऐकूं जाईल अशा रीतीनें वाचतां येणें शक्य नव्हतें म्हणून हा मान गोखल्यांना मिळाला. फाळणीविरुद्ध म्हणून बंगालनें बहिष्काराचा अवलंब करावा अशा आशयाचा सातवा ठराव बाबू अंबिकाचरण मुजुमदार यांनीं मांडला. त्याला दुजोरा देतांना बिपिन चंद्रपाल यांनीं जोराचें भाषण करून असें प्रतिपादन केलें कीं, सर्व सरकारावरच बहिष्कार घालावा. या मताला अर्थात्च पाल-बाबूंच्या नंतर बोलणाऱ्या वक्त्यांनीं विरोध केला. त्यांतच गोखले हे एक होते. त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, कॉंग्रेसच्या ठरावावर भाषण कर-तांना कोणी कसलींही मतें प्रतिपादन केलीं, तरी त्यांनीं कॉंग्रेस बांधली जात नाहीं. खुद्द ठरावांत जें सांगितलें असेल तेंच खरें व बंधनकारक. १९०७ सालीं कॉंग्रेस मोडल्यानंतर सुरत येथेंच जें ' कन्व्हेन्शन ' भरलें होतें, त्यांत एकच ठराव पास झाला व तो गोखल्यांनींच मांडला. कॉंग्रेसची घटना तयार करण्याकरितां एक कमिटी नेमण्याचा हा ठराव होता. ही कमिटी ' कन्व्हेन्शन कमिटी ' या नांवानें प्रसिद्ध असून तिनें एप्रिल १९०८ मध्यें अलाहाबाद येथें कॉंग्रेसची घटना लिहून काढली, व हीच घटना थोड्या फार फरकानें १९०८ पासून १९२० पर्यंत अमलांत होती. १९०८ सालीं मद्रास येथें भरलेल्या कॉंग्रेसमध्यें गोखल्यांनीं ह्यूम व वेडर-बर्न यांच्या आभाराचा व अभिनंदनाचा सतरावा ठराव मांडला. गोखल्यांचें हें भाषण विस्तृत व वक्तृत्वपूर्ण असें झालें. इंग्लंडमध्यें वारंवार जावें लागल्यामुळें त्यांना ह्यूम आणि वेडरबर्न या दोघांची चांगलीच मदत व माहिती झाली होती; आणि हा ठराव मांडण्याला त्यांच्या इतके दुसरे लायक पुढारी त्यावेळीं कॉंग्रेसमध्यें खास कोणी नव्हते. १९०९ सालीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांना मदत करण्याविषयींचा नववा ठराव गोखल्यांनीं

मांडला. या भाषणांत त्यांनीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या दुःखांचा इतिहास सांगून गांधींच्या नेतृत्वाखालीं सुरू असलेल्या चळवळीची माहिती सांगितली. या ठरावाला अनुमोदन देणाऱ्यांत मि० पोलक हे एक असून सुरेन्द्रबाबूंनीं वर्गणी मागतांच १८००० रुपये जमले! १९१० सालीं अध्यक्ष सर विल्यम वेडरबर्न यांचे आभार मानण्याचा तिसावा ठराव गोखल्यांनींच मांडला. पुढच्या वर्षीं पंडित बिशन नारायण धार यांनीं कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान स्वीकारावें अशा आशयाच्या सुरेंद्रबाबूंनीं मांडलेल्या ठरावाला गोखल्यांनीं दुजोरा दिला. याच कॉंग्रेसमध्यें गोखल्यांनीं वरिष्ठ कायदे-कौन्सिलांत आणलेल्या सक्तीच्या शिक्षणाच्या बिलाला पाठिंबा देणारा ठराव दि० ब० एल. ए. गोविंदराघव अय्यर यांनीं मांडला होता. या ठरावावर दादासाहेब करंदीकर, डॉ० गौर, डॉ० सतीशचंद्र बानर्जी वगैरेंचीं भाषणें झाल्यावर स्वतः गोखल्यांनीं समारोपवजा भाषण केलें व नंतर ठराव कॉंग्रेसनें मंजूर केला. १९१२ सालीं बांकीपूरला मुधोळकरांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशा ठरावाला गोखल्यांनीं दुजोरा दिला. दक्षिण आफ्रिकेच्याबद्दलचा तिसरा ठराव मांडतांना गोखल्यांनीं आपल्या दक्षिण आफ्रिकेच्या सफरीचें स्वरूप खासगी कसें होतें हें सांगितलें. सन १९१३ व १९१४ सालीं कराची व मद्रास येथें कॉंग्रेस भरली; पण गोखल्यांच्या आजारीपणामुळें त्यांना हजर रहातां आलें नाहीं. १९१५ सालीं कॉंग्रेस भरण्यापूर्वींच ते वारले होते; आणि अशा रीतीनें प्रत्यक्षपणें कॉंग्रेसमध्यें ते १९१२ सालीं अखेरचे बोलले. कॉंग्रेसचा व त्यांचा अशा प्रकारचा संबंध येथेंच— म्हणजे १९१२ सालींच— संपला. १८८९ पासून १९१२ पर्यंत मधलीं लागोपाठ सात वर्षें वगळून गोखले कॉंग्रेसमध्यें बोलत होते.

सुरेन्द्रनाथ बानर्जी यांच्या इतकी नसली, तरी फेरोजशहा मेथा यांच्याहून निःसंशय अधिक ही कामगिरी आहे. सुरेन्द्रनाथांनीं १८८५पासून जहालांच्या हातांत १९१८ सालीं कॉंग्रेस जाईपर्यंत सारें एकच अधिवेशन— कराचीचें—बुडविलें होतें. बाकीच्या सर्व अधिवेशनांना ते हजर राहिले होते; आणि सर्व महत्त्वाचे ठराव मांडण्याचा मक्ता त्यांच्याचकडे होता असें

म्हटलें तरी चालेल. याच्या उलट फेरोजशहा मेथा आपल्या मिजासखोर स्वभावामुळें बऱ्याचशा अधिवेशनांना हजर रहात नसत. काँग्रेसचीं सूत्रें फेरोजशहांच्या हातांत असत हें खरें; पण तीं बहुधा मुंबईहूनच हलविलीं जात. गोखले एकदां काँग्रेसचे अनन्यभक्त बनले ते कायमचे बनले. काँग्रेसशीं त्यांचा संबंध अनेक प्रकारांनीं आला; पण फेरोजशहांसारखा तो खास नव्हता. पडेल तें काम करावयाचें; मानापानासाठीं भांडावयाचें नाहीं असा त्यांचा क्रम असे. काँग्रेसचे ते वक्तेच होते असें नाहीं, तर चिटणिस, शिष्टमंडळाचे सभासद, आणि काँग्रेसच्या अधिकारी मंडळाचे सभासदही तें होते. १९०३ च्या काँग्रेसमध्यें गोखल्यांना काँग्रेसचे ॲडिशनल जॉइंट जनरल सेक्रेटरी नेमण्यांत आलें, व हें काम त्यांनीं १९०८ पर्यंत केलें; पुढें या जागीं दाजी आबाजी खरे यांची नेमणूक करण्यांत आली. सन १९०० च्या काँग्रेसमध्यें गोखल्यांची इंडियन काँग्रेस कमिटीमध्यें व एज्युकेशनल कमिटीमध्यें नेमणूक झाली. १९०१ च्या काँग्रेसमध्यें मुंबई इलाख्यांत ‘ इंडिया ’ वर्तमानपत्राच्या हजार प्रतींचा खप करविण्यासाठीं जी कमिटी नेमण्यांत आली होती, तिचे गोखले सभासद होते. १९०२ सालींही काँग्रेसनें हीच कमिटी कायम ठेविली होती. १९०३ सालीं याच कमिटीकडे काँग्रेसच्या ब्रिटिश कमिटीसाठीं वर्गणी जमविण्याचें काम देण्यांत आलें होतें. १९०४ सालीं काँग्रेसच्या घटनेचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या कमिटींत गोखले होते. १९०५ सालीं काँग्रेसनें गोखल्यांच्या इंग्लंडांतील कामगिरीबद्दल आभार मानण्याचा ठराव मंजूर केला. पण या आभारांत लाला लजपतराय यांचा वांटा होता. झालेल्या कामगिरीबद्दल आभार मानून काँग्रेसनें पुढच्या वर्षासाठीं गोखल्यांना विलायतचे आपले प्रतिनिधि नेमलें. काँग्रेसच्या कार्यासाठीं नेमलेल्या स्टँडिंग कमिटीचेही गोखले चिटणीस व सभासद होते. सुरत कन्व्हेन्शनमध्यें गोखले होते हें निराळें सांगावयास नकोच. १९१० सालीं काँग्रेसतर्फें व्हाइसरॉयांना मानपत्र देण्यासाठीं नेमलेल्या कमिटींत माजी अध्यक्ष म्हणून

गोखले होते. दक्षिण आफ्रिकेंतील कामगिरीबद्दल काँग्रेसनें गोखल्यांचे आभार मानले होते.

पण एवढ्यानेंच काँग्रेसचा व गोखल्यांचा संबंध संपत नाहीं. वर नुसती गोखल्यांच्या राष्ट्रीय सभेंतल्या कामाची यादी दिली आहे. तीच अत्यंत मोठी आहे; पण ही कामगिरी मोठ्या काँग्रेसची होय. छोट्या काँग्रेसचा म्हणजे प्रांतिक परिषदेचा अद्यापि विचार केलेला नाहीं. तो आतां करूं. १८८९ सालीं गोखले, टिळक व नामजोशी यांना प्रांतिक परिषदेचे चिटणीस नेमण्यांत आलें. पण पुढें दोनच वर्षांनीं १८९१ ची परिषद् झाल्यावर गोखल्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला व तो नाइलाजानें मंजूर केला गेला. पुढें कांहीं वर्षांनीं काँग्रेसची बैठक पुण्याला भरण्याचें ठरलें, व त्या बैठकीच्या व्यवस्थेसाठीं टिळक व गोखले यांना चिटणीस नेमण्यांत आलें. येथेंच टिळक व गोखले यांचा पहिला खटका उडाला.

राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरवावी किंवा भरवूं नये हा खरोखरीच अत्यंत क्षुल्लक प्रश्न होय. केवळ सोय म्हणून ही गोष्ट आधीं होत असे; पण पुण्याला राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा वाद माजला त्यांत दोन पक्ष दोन टोंकाला गेल्यामुळें फारच गवगवा झाला. सामाजिक परिषद् मंडपांत भरणार असेल तर मंडपाला आग लावूं असे उद्गार काढणारे चुकले, आणि सामाजिक परिषद् याच मंडपांत भरली पाहिजे असा आग्रह धरणारेही चुकले. पण यांत एका बाजूला टिळक आणि दुसऱ्या बाजूला गोखले असे दोघेही गोंवले गेल्यामुळें प्रस्तुत ठिकाणीं त्यांच्यापुरता थोडासा विचार केला पाहिजे. वर सांगितल्याप्रमाणें पुण्याच्या सुधारणाविरोधी लोकांनीं हा वाद आधीं सुरूं केला व टिळकांना राजीनामा देणें भाग पडल्यावर मग ते या बाजूला मिळाले या गोष्टी लक्ष्यांत घेतल्या म्हणजे टिळक-गोखले यांचे संबंध गुंतागुंतीचे दिसतात ते दिसणार नाहींत. शिवाय गोखले हे टिळकांप्रमाणें आपल्या पक्षांत श्रेष्ठत्व पावले नसल्यामुळें खरा वाद रानडे व टिळक यांच्या दरम्यान होता. याचा पुरावा असा देतां येतो कीं, खुद्द गोखले हे सामाजिक बाबतींत बहुशः उदासीन असत

व शेवटीं हार खाल्ली, ती रानडे यांनीं ‘ सामाजिक परिषद् वेगळ्या मंडपांत भरेल ’ असें सांगून खाल्ली— गोखल्यांना ही हार खावी लागली नाहीं. टिळकांनीं ही क्षुल्लक बाब इतकी ओढून धरली म्हणून त्यांना जर हंसावयाचें, तर क्राफर्ड मार्केटचें घड्याळ बॉम्बे टाईमप्रमाणेंच चालावें, स्टँडर्ड टाईमप्रमाणें चालूं नये असा हट्ट धरल्याबद्दल फेरोजशहांना कां हंसूं नये ? कॉर्पोरेशननें दोनदां स्टँडर्ड टाईम स्वीकारण्याचा ठराव केला असतांना तो धाब्यावर बसवून आपला हट्ट चालविणारे फेरोजशहा जर वाखाणले जातात, तर टिळकांची निंदा कां व्हावी हें समजत नाहीं. शिवाय सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांतून बाहेर काढतांना रानड्यांना तेवढें वाईट वाटलें, आणि काँग्रेसच्या चिटणिशीचा राजीनामा देतांना टिळकांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या, असें थोडेंच आहे ? सूक्ष्म दृष्टीनें विचार केला म्हणजे क्षुल्लक असली तरी सुधारणा-विरोधी पक्षाची ती चूक होती हें निःसंशय होय. पण ती ‘ हिमालयाएवढी ’ चूक होती अशी स्वतःची किंवा इतरांची कल्पना करून देणें ही मात्र ‘ घोडचूक ’ आहे, आणि म्हणूनच हा थोडासा विषयांतराचा विस्तार करावा लागला.

हें विषयांतर पुढें चालवावयाचें असेल तर असें म्हणतां येईल कीं, पुण्याप्रमाणेंच १८९४ सालीं मद्रास येथें व १८९६ सालीं कलकत्ता येथें काँग्रेसच्या वेळीं धार्मिक, नैतिक, किंवा सामाजिक मतभेदांमुळें तंटे माजले होते. (D. V. Athalye's Tilak's life: Page 77.) पुण्याचे लोक विशेष कलहप्रिय असल्यामुळें पुण्याचा वाद हिंदुस्थानभर गाजला; आणि बाहेरचा इतिहास-संशोधन करून हुडकावा लागतो इतका अप्रसिद्ध राहिला इतकाच फरक ! वादानें वाद वाढतो या न्यायानें पुण्यांतील पक्षभेद मात्र विकोपास गेले यांत कांहींच शंका नाहीं ; पण १८९५ सालचा हा प्रसंग टळला असता, तर हे पक्षभेद झालेच नसते असें मात्र मुळींच नाहीं.

आतां पुण्याहून सुरतेला जाऊं. या बारा वर्षांत ( १८९५ ते १९०७ ) राष्ट्राची प्रगति पुष्कळच झाली. ‘ राजकारण विरुद्ध समाजकारण ’ असा जुना वाद जाऊन त्याच्या जागीं ‘ राजकारणा ’ च्या दोन पक्षांमध्येंच

वाद उभा राहिला. ध्येयासंबंधीं हा वाद फारसा नसून ध्येयसाधनाच्या मार्गासंबंधींच हा वाद होता. लॉर्ड लिटन साहेबांकडे ज्या अर्थानें राष्ट्रीय सभेचें जनकत्व जातें, त्याच अर्थानें कर्झन साहेबांकडे या पक्षभेदाचें जनकत्व जातें. पक्षभेदाचें बीं महाराष्ट्राच्या खडकाळ भूमींत यापूर्वींच १८९५-९६ च्या सुमारास रुजलें होतें; पण बंगालची फाळणी होईपर्यंत हा वृक्ष सर्व हिंदुस्थानभर फोंफावला नव्हता. कर्झन साहेबांनीं ' बारा महत्कृत्यें ' करण्याचा विडा उचलून कामास सुरुवात करतांच हळूहळू एकेक शाखा पसरूं लागली. रूपकाची भाषा सोडून बोलावयाचें असल्यास असें म्हणतां येईल कीं, कर्झन साहेबांच्या अरेरावी कारभारामुळें हिंदीलोकांत असंतोष व इंग्रजी राज्याविषयीं अप्रीति हीं झपाट्यानें वाढूं लागलीं, आणि एक अराजकांचा व एक जहालांचा असे दोन वर्ग तयार होऊं लागले. अराजकांनीं राष्ट्रीय सभेची केव्हांही पर्वा केली नसल्यामुळें व असले माथेफिरू कोणत्याही देशांत केव्हांही थोडेच असणार यामुळें त्यांचा विचार करण्याचें येथें कारण नाहीं. उरलेला वर्ग म्हणजे जहालांचा. दरवर्षीं काँग्रेसनें गाऱ्हाण्यांचा पाढा वाचावा; पण त्याचा कांहीं उपयोग न होतां प्रतिवर्षीं गाऱ्हाण्यांची संख्या वाढत जावी यामुळें कांहीं लोकांना सहजच संताप आला. अर्ज, ठराव, विनंत्या, मानपत्रें, शिष्टमंडळें यांचा कांहीं उपयोग होत नाहीं हें पाहून या सनदशीर मार्गावरील त्यांचा विश्वास उडाला व कांहीं तीक्ष्ण उपाय योजण्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊं लागली. लॉर्ड कर्झन यांनीं तर हिंदी लोकमत सरास पायांखालीं तुडवून वरतीं हिंदी लोकांवर ' खोटें बोलणारे ' असा छाप मारला! हें कमिशन नेम, तो कायदा कर, हें खातें नवें कर, तो कायदा रद्द कर असा प्रकार सुरूं करून राणीच्या जाहिरनाम्यावर अशक्य सनद म्हणून शेरा मारण्यासही त्यांनीं कमी केलें नाहीं. सुप्रसिद्ध इंग्रजी वर्तमानपत्रकार मि० ए. जी. गार्डिनर यांनीं म्हटल्याप्रमाणें— ' He ( Lord Curzon ) has dwelt in a house of mirrors. Wherever he has turned he has met the dazzling vision of himself' ( Prophets, Priests, and

Kings : page 220 ) याचा परिणाम गार्डिनर साहेबांनींच असा वर्णिला आहे. 'It was this view of the mild Hindoo as a child, to be amused and paternally governed that was the vice of his method. He was aloof on Olympus. India had no access to him. Hindoos like Mr. Gokhale, one of the ablest men and noblest characters with whom I have ever come in contact and Mr. Surendranath Banerjee were ignored' ( Page. 222. )

ज्यांच्या हातांत कॉंग्रेस त्यांच्या चळवळीला सरकार काय किंमत देतें हें पाहून जहाल पक्ष बळावला तर त्यांत नवल तें कसलें? १९०६ सालींच कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान टिळकांना देण्यांत यावें अशी चळवळ या पक्षानें केली. पण दादाभाई नवरोजी अध्यक्ष झाल्यानें हा डाव फसला. पुढची कॉंग्रेस नागपूरला भरावयाची होती पण तेथल्या जहाल पक्षाच्या दंडेलीच्या वर्तनामुळें नागपुराहून सुरतेला कॉंग्रेस न्यावी लागली. पण शेवटीं सुरतेला कॉंग्रेस नेऊनही मेथा, गोखले, बानर्जी प्रभृतींना ती वांचवितां आली नाहीं. सुरतेस कॉंग्रेस मोडलीच !

बाबू अंबिकाचरण मुझुमदार यांनीं आपल्या Indian National Evolution या पुस्तकांत सुरत—प्रकरणासंबंधींचे सर्व कागदपत्र दिलेले आहेत त्यांवरून निःपक्षपातीपणानें विचार केला म्हणजे असें म्हणावें लागतें कीं, सुरत कॉंग्रेस मोडण्यांत जहालपक्षाची फारच मोठी चूक झाली. कै० रं० न० मुधोळकरांनीं दाखवून दिल्याप्रमाणें 'Blow up if everything else fails' या संकेताप्रमाणें असो, किंवा स्वतः जहाल सांगतात त्याप्रमाणें अनिच्छेनें असो, कॉंग्रेस मोडण्यांत जहालांची चूक झाली यांत कांहींच शंका नाहीं. कलकत्त्याला १९०६ सालीं पास झालेले बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण वगैरे ठराव १९०७ च्या एप्रिलमध्यें सुरत येथें भरलेल्या प्रांतिक परिषदेंत फेरोजशहांनीं आपल्या वजनामुळें गाळून टाकले असा जहालांनीं त्यांच्यावर स्पष्ट आरोप केलेला मात्र गोखले, मुधोळकर,

किंवा फेरोजशहांचे चरित्रकार एच. पी. मोदी यांनीं खोडून टाकला नाहीं; व म्हणून काँग्रेसमध्येंही हे ठराव गाळण्यांत येणार अशी ओरड जहालांनीं बरोबर केली असेंही मानलें तरी, खुद्द काँग्रेसच्या दिवशींच हे ठराव गाळले जात नाहींत हें कळल्यावर अध्यक्षांच्या निवडणुकीला उपसूचना आणण्याचा हट्ट धरण्यांत जहालांची चूक झाली. जहालांनीं आपल्या पत्रकांत गोखल्यांवर जे आरोप केले होते, त्यांना स्वतः गोखल्यांनींच अत्यंत समर्पक व सुंदर उत्तरें दिलीं आहेत. ' एका हातानें टाळी वाजत नाहीं ' या न्यायानें दुसऱ्या बाजूनेंही कांहीं चुका केल्या असल्या तर त्या फेरोजशहांनीं केलेल्या आहेत, गोखल्यांनीं केलेल्या नाहींत.

सुरतेची काँग्रेस मोडण्यांत आपली चूक झाली हें जहालांनाही ताबडतोब कळून आलें. याचें प्रत्यंतर हेंच कीं, दोनही पक्षांची एकी करावी अशा आशयाची भाषा प्रथम जहालांकडूनच सुरू झाली ! पण फेरोजशहांनीं आतां त्यांना चक्क नकार सांगितला. (P. M. Metha: pages 549-550) थोड्याच दिवसांत टिळकांना ६ वर्षांची शिक्षा झाली व त्यामुळें जहालपक्ष थंडावल्यासारखा झाला. दरम्यान जहालपक्षाचे दुसरे पुढारी अरविंद घोष हे राजकारणांतून निघून योगसाधनाच्या मार्गाला लागले, यामुळें १९१३ पर्यंत फेरोजशहांच्याच हातांत काँग्रेस अबाधितपणें होती. पण १९१४ सालीं टिळक सुटून आल्यावर या प्रश्नाला पुन्हां तोंड लागलें; आणि या वेळीं टिळक-गोखले यांचा समोरासमोर हातघाईचा सामना होऊन, त्यांतच गोखल्यांचा अंत झाला. या भांडणाची जरूर तेवढी हकीकत सांगून हें लांबलेलें प्रकरण पुरें करूं.

टिळक सुटून आल्यावर लगेच महायुद्धास सुरुवात झाली; व ती संधि साधून टिळकांनीं जाहीरपणें राजनिष्ठेचें पत्रक प्रसिद्ध केलें. ता० २७ आगस्ट १९१४ रोजीं प्रसिद्ध केलेल्या या पत्रकांत टिळकांनीं असें स्पष्ट लिहिलें होतें कीं, मी राजनिष्ठ प्रजाजन असून सरकारास सर्व प्रकारें मदत करण्यास तयार आहें. यानंतर नेमस्त व जहाल यांनीं पुनः काँग्रेसच्या निशाणाखालीं एकत्र जमावें अशाविषयीं प्रयत्न सुरू झाले. १९१४ ची

कॉंग्रेस मद्रास येथें भरणार होती, व त्याच वेळीं शक्य तर ही एकी घडवून आणावी अशा उद्देशानें कॉंग्रेसचे चिटणीस मि० सुब्बाराव व मिसेस बेझंट या डिसेंबर १९१४ च्या पहिल्या आठवड्यांत पुण्यास आल्या व त्यांनीं गोखले व टिळक यांची संमति मिळविली. पण टिळकांना मुंबईचे नेमस्त पुढारी या तडजोडीला कबूल होतील असें वाटत नव्हतें; व फेरोजशहांच्या चरित्रकारांनीं ही गोष्ट त्यांना सर्वस्वी नापसंत असल्याचें स्पष्ट लिहिलें आहे. विरुद्ध पक्षाच्या पुढाऱ्यांशीं गोखले या बाबतींत बोलतात हें फेरोजशहांना बिलकूल पसंत पडलें नाहीं. (Page 654) अशा स्थितींत सुब्बाराव हे मुंबईला गेले व निराश होऊन परत आले हें सुब्बारावांनींच सांगितलें आहे. (New India: 8th Feb. 1915) येथपर्यंत सर्व ठीक होतें; पण सुब्बारावांना फेरोजशहांनीं स्पष्ट नकार सांगितल्यावर ते पुन: पुण्यास आले व ता० ८ डिसेंबर १९१४ रोजीं त्यांच्या व टिळकांच्या दरम्यान झालेल्या संभाषणानें टिळक व गोखले यांच्या दरम्यान वाद सुरू झाला.

तडजोडीच्या अटी स्वतः गोखल्यांनींच ठरविल्या होत्या. कॉंग्रेसच्या घटनेच्या विसाव्या नियमांत जरूर ती दुरुस्ती करण्यासंबंधींचा ठराव मद्रास कॉंग्रेसपुढें यावयाचा होता. नेमस्तांनीं ठरविलेल्या ‘ क्रीड ’ ला मान्यता देण्यास जहाल तयार होते. पण ८ डिसेंबरच्या संभाषणांत टिळकांनीं ‘ सरकारावर पूर्ण बहिष्कार ’ घालण्याचें आपलें धोरण सुब्बारावांना सांगितलें व त्यामुळें गोखल्यांना तडजोड मोडावीशी वाटली. त्याप्रमाणें त्यांनीं कॉंग्रेसचे नियोजित अध्यक्ष बाबू भुपेन्द्रनाथ बसू यांना ता० १४ डिसेंबर १९१४ रोजीं एक विस्तृत पत्र पाठविलें व त्यांत स्वतः मान्य केलेली तडजोड आपणांस कां अमान्य करावी लागत आहे हें खुलासेवार सांगितलें. या पत्रापैकीं दोन उतारे फेरोजशहांचे चरित्रकार एच. पी. मोदी यांनीं त्या चरित्रांत दिले आहेत. पण त्यांचा विशेष परामर्श येथें घेण्याची फारशी जरूरी नाहीं. मुख्य गोष्ट इतकीच कीं, ता० ८ डिसें-

बरच्या संभाषणानें ज्या वादाचें बीज पेरलें गेलें होतें; त्याच वादाला या पत्रानें फुलें फळें आलीं. हीं अर्थात्च जहरी विषानें ओतप्रोत भरलीं होतीं.

या पत्राचा उपयोग इतकाच झाला कीं, १९१४ च्या काँग्रेसमध्यें समेट घडून आला नाहीं. अर्थात्च या गोष्टीचें खापर हा पक्ष त्या पक्षावर व तो पक्ष ह्या पक्षावर फोडूं लागला. प्रत्येक पुढारी आपआपला खुलासा प्रसिद्ध करूं लागला. मिसेस बेझंट, मि० सुब्बाराव, ना० गोखले व टिळक यांनीं आपले खुलासे प्रसिद्ध केले. पण हें आगींत पाणी ओतणें नसून तेल ओतणें होतें. या खुलाशांनीं वाद न विझतां भडकला मात्र. गोखल्यांप्रमाणें भूपेन्द्र बाबूही समेटाला आधीं अनुकूल होते; पण वर सांगितलेलें गोखल्यांचें पत्र मिळाल्यानंतर त्यांनीं आपलें मत बदललें. या मत बदलण्याला कारण काय असा प्रश्न ओघानेंच आला व त्याला उत्तर देण्यासाठीं हें पत्र त्यांना इतरांना दाखवावें लागलें. पुढें काँग्रेसच्या विषयनियामक कमिटींत बेझंटबाईनीं ही तडजोडीची उपसूचना मांडतांच अध्यक्ष व इतर नेमस्त प्रतिनिधि यानीं ‘ टिळक हे सरकारावर बहिष्कार घालणारे आहेत,’ असें म्हणून त्या उपसूचनेला विरोध केला. बेझंटबाईना अर्थातच कोडें पडलें व त्यांनीं खरा प्रकार काय आहे तो कळवा अशी टिळकांना तार केली. ‘ हा आरोप साफ खोटा आहे ’ असें टिळकांनीं तारेनें कळविलें व बेझंटबाईनीं ही तार सब्जेक्टस कमिटींत वाचून दाखविल्यावर भूपेन्द्र बाबूंना आपले शब्द परत घ्यावे लागले. याचा परिणाम असा झाला कीं, बेझंटबाईची उपसूचना नापास न होतां विचारासाठीं एका कमिटीकडे सोंपविली गेली. हा ठराव क्रमानें एकविसावा असून तो खुद्द अध्यक्षांनींच काँग्रेसपुढें मांडला होता. ( How India Wrought for freedom pages 583 and 590 )

अशा रीतीनें या वादांत दोनही पक्षांचा जयपराजय सारखाच झाल्यानें हा वाद येथेंच मिटणें युक्त होतें. पण योगायोग तसा नव्हता त्याला कोण काय करणार ? मद्रास येथें एकदम काँग्रेसमध्यें घुसून ती काबीज करतां आली नाहीं हा जसा जहालांचा पराजय; तसाच समेटाच्या

प्रश्नाला कायमची मूठमाती देता आली नाहीं हा नेमस्तांचाही पराजयच होता. यंदां समेट झाला नाहीं तरी पुढच्या वर्षीं होण्याची आशाही खुंटली नाहीं एवढ्यापुरता जसा जहालांचा जय, तसाच 'आजचें मरण उद्यांवर गेलें' हा नेमस्तांचाही जयच होता. पण हा सूक्ष्म विवेक गोखल्यांना करतां आला नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. भूपेंद्र बाबूंनीं टिळकांवरील आरोप परत घेतला, तरीही गोखले तो परत घेईनात. टिळकांसारख्या धूर्त व धोरणी माणसानें याचा चांगलाच फायदा घेतला व गोखल्यांवर विश्वासघाताचा आरोप करून 'चोराच्या उलट्या बोंबा!' हा अग्रलेख लिहिला. टिळकांच्या या लेखाला उपमा त्यांच्याच दुसऱ्या लेखाची सांपडते. १८९६ सालीं रानड्यांना उद्देशून त्यांनीं 'म्हातारचळ कां पोर खेळ?' हा अग्रलेख लिहिला, व १९१५ सालीं गोखल्यांना उद्देशून 'चोराच्या उलट्या बोंबा!' हा अग्रलेख लिहिला. रानडे स्थितप्रज्ञ असल्यामुळें टिळकांचा विषारी लेख त्यांना बाधला नाहीं; पण गोखले हे कोंवळ्या मनाचे व रोगग्रस्त शरीराचे असल्यामुळें हा अग्रलेख केसरीच्या ज्या अंकांत प्रसिद्ध झाला त्यानंतरचा एकच अंक टाकून पुढच्या अंकांत टिळकांना गोखल्यांचा मृत्युलेखच लिहावा लागला! टिळकांची बाजू सर्वस्वी खरी असली, किंवा गोखल्यांची सर्वस्वी चूक असली तरीही टिळकांच्या लेखांतील विषारीपणाचें समर्थन करतां येत नाहीं.

पण टिळकांच्या पदरांत दोषाचें भरपूर माप घातल्यावर गोखल्यांच्या धोरणाचा विचार केला तर तें चुकीचें होतें असेंच म्हणावें लागतें. या धोरणांत मनाचा सरळपणा व देशहिताची सात्त्विक तळमळ हीं भरपूर आहेत. पण मुत्सद्देगिरीचा त्यांत अभाव आहे. या बाबतींत फेरोजशहांचें वर्तन अगदीं बरोबर व कडेलोट मुत्सद्देगिरीचें दिसून येतें. सुरतेची कॉंग्रेस मोडल्यापासून तों मरणापर्यंत त्यांनीं एकसारखा समेटाला विरोध केला. जहालांचें राजकीय तत्त्वज्ञान व मनोवैशिष्ट्य पूर्णपणें माहीत असल्यामुळें त्यांनीं आपल्या हयातींत जहालांच्या हातीं कॉंग्रेस जाऊं दिली नाहीं. उलट गोखल्यांनीं या बाबतींत चुकांवर चुका करून ठेवल्या. जहा-

लांची मनोरचना बदलली असें वाटून त्यांनीं समेटाला उचलून धरलें ही पहिली चूक, टिळक हे बहिष्कारवादी आहेत म्हणून समेट नको असें म्हटलें ही दुसरी चूक, व हा आरोप खोटा आहे हें टिळक सांगत असतांना तो मागें घेतला नाहीं ही तिसरी चूक. आधीं समेटाला अनुकूल मत देऊन मागून मत बदलणें ही जशी जहालांच्या दृष्टीनें त्यांची चूक; तशीच समेटाचा प्रश्न इतक्या कळकळीनें शिजवून कॉंग्रेसच्या हितशत्रूंना त्याचा फायदा आयता देणें ही नेमस्तांच्या दृष्टीनेंही त्यांची चूकच होती. गोखल्यांच्या या वर्तनांत मनाचा सरळपणा खचित आहे; पण मनुष्य-स्वभावाचें मार्मिक ज्ञान व मुत्सद्देगिरी हीं मुळींच नाहींत. जहालांना कॉंग्रेसमध्यें यावयाचें होतें, तें कॉंग्रेस काबीज करण्यासाठीं हें गोखल्यांना कळलें नाहीं ही गोष्ट कोणाला खरी सुद्धां वाटणार नाहीं. भूपेंद्र बाबूंना पाठविलेल्या पत्रांत ते म्हणतात.— " We were under the impression that our Extremist friends in the different provinces had by that time seen the error of their ways and had come to realize that the only political work possible in the existing circumstances of the country was on the lines of the Congress; that they wanted *quietly* to return to the Congress fold".........14-12-1914 (H. P. Mody's life of P. M. Mehta: Page 653) खरोखरीच हा परमावधीचा भोळेपणा होता. याच्या उलट बेझंटबाई-च्या समेटाच्या उपसूचना एका कमिटीकडे सोंपविल्याचें कळतांच फेरोज-शहांनीं काय केलें तें त्यांच्या चरित्रकारांच्याच शब्दांत देतों.—

" When Mrs. Besants' proposals for the amendment of the constitution were referred by the Madras Congress to a committee, Pherozeshah had decided, as we have seen, on having the next session in Bombay. He was anxious to put an end once and for all to the manœuvres which had been going on for some years to

effect a compromise which he regarded as mischievous, and he was confident that his personality and his immense influence in Bombay would carry everything before them." दुर्दैवानें फेरोजशहा कॉंग्रेस पूर्वींच वारले व याचा परिणाम असा झाला कीं, "The way was made smooth for the amendment of the constitution, and the Nationalists walked in. Their triumph was speedy and complete. When the next split took place, it was the Moderates who had to walk out." (Page 658). तात्पर्य इतकेंच कीं, सुरतेची कॉंग्रेस मोडण्यांत टिळकांनीं चूक केली व समेटाला अप्रत्यक्ष मदत करण्यांत गोखल्यांनीं चूक केली. गोखल्यांचा व कॉंग्रेसचा येथेंच संबंध संपत असल्यामुळें हें प्रकरणही येथेंच संपतें हें निराळें सांगावयास नकोच.

---

## प्रकरण ४ थें.

# परदेशांतील कामगिरी.

"Yesterday I had my fifth and final talk with Gokhale–the first talk since my budget deliverance. It is of vast advantage that we should be on terms with him; I believe, from all I learn, that his influence on the Indian section in the House of Commons has been most salutary, and that he has stood up for my speech and its promise of good against the men who complained of it as vague, timid, tepid, hollow. He has a politician's head; appreciates executive responsibility; has an eye for the tactics of practical common-sense. He made no secret of his ultimate hope and design— India to be on the footing of a self-governing Colony."

—Recollections (Vol. II.); page 181:

VISCOUNT MORLEY.

तारीख २ आगष्ट १९०६ रोजीं हिंदुस्थानचे स्टेट-सेक्रेटरी मि० मोर्ले यांनीं हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांना जें पत्र पाठविलें, त्यांतून वरील अवतरण घेतलें आहे. मि० ( किंवा पुढें लॉर्ड ) मोर्ले यांची इंग्रजी राजकारणांत व वाङ्मयांत केवढी मोठी योग्यता आहे, हें नव्यानें सांगावयास नको. अशा माणसानें नामदार गोखले यांच्याविषयीं वरील उद्गार काढावे, अशीच खरोखरी ना० गोखल्यांची परदेशांतील कामगिरी होती. परदेशांत कायमचें राहून एकाच वेळीं ही कामगिरी त्यांनीं केली असें मात्र नाहीं. १८९७ पासून १९१४ पर्यंत वेगवेगळ्या वर्षीं, वेगवेगळ्या कारणांकरितां त्यांना परदेशांत जावें लागलें. या त्यांच्या सर्व सफरींची योग्य ती माहिती या प्रकरणांत देण्याचा विचार आहे.

न्यायमूर्ति रानड्यांनीं हाताशीं धरल्यामुळें गोखले ज्यावेळीं सार्वजनिक कामांत पुढें सरसावूं लागले होते, त्याच वेळीं महर्षि दादाभाई नवरोजी पार्लमेंटाचे सभासद झाले होते. ( सन १८९२ ). यापूर्वीं कित्येक वर्षें हुंडणावळीच्या भावांत बेसुमार चलबिचल झाल्यामुळें, हिंदुस्थान सरकारच्या मिजासखोर साम्राज्यवादी धोरणामुळें, सरहद्दीवरील लढायांमुळें आणि देशांतील सार्वत्रिक महर्घतेमुळें हिंदुस्थानच्या तिजोरीची स्थिति अत्यंत हलाखीची झाली होती. सैन्यावर होणारा खर्च प्रमाणाबाहेर सारखा वाढत होता. अंदाजपत्रकांत वारंवार तुटी येत होत्या. तूट आली कीं ती भरून काढण्यासाठीं कर सारखे वाढविण्यांत येत होते. ही विषमता नाहींशी करून हिंदुस्थानाला फायदेशीर होईल अशी जमाखर्चाची शास्त्रशुद्ध व निःपक्षपाती पद्धति सुरू करण्यांत यावी अशी खटपट राष्ट्रीय सभा करीत होती. पण राष्ट्रीय सभेनें ठराव कितीही केले, तरी त्यांना विचारतो कोण ? दादाभाईंच्या आंतड्याला ही विषमता पाहून पीळ पडत असे. त्यांनीं हें दुःख निवारण्यांत यावें अशा अर्थाची ओरड फार पूर्वींपासूनच सुरू केली होती. आतां ते पार्लमेंटाचे सभासद झाल्यामुळें त्यांच्या खटपटीला यश येऊन, १८९५ च्या सुमारास हिंदुस्थानाच्या राज्यव्यवस्थेची आणि जमाखर्चाची चौकशी करण्याकरितां एक रॉयल कमिशन

नेमल्याचें जाहीर करण्यांत आलें. लॉर्ड वेल्बी हे या कमिशनचे अध्यक्ष असून, त्याच्या सभासदांत सर विल्यम वेडरबर्न, विल्यमकेन, व स्वतः दादाभाई नवरोजी यांचा समावेश करण्यांत आला होता. अध्यक्षांच्या नांवावरून या कमिशनला ‘ वेल्बी कमिशन ’ असें म्हणण्यांत येतें.

स्वतः दादाभाई हे कमिशनचे सभासद होते, तरीही त्यांनीं कमिशनपुढें साक्ष दिली. त्यांच्याशिवाय हिंदुस्थानांतील बहुजनसमाजातर्फे सुरेन्द्रनाथ बानर्जी, जी. सुब्रह्मण्य अय्यर, दिनशा एदलजी वाच्छा, आणि गोपाळराव गोखले यांच्या साक्षी कमिशननें घेतल्या. या सर्व साक्षीदारांत गोखले हेच वयानें धाकटे होते. दूर देशांत जाऊन तज्ज्ञांपुढें अवघड विषयांत साक्ष देणें हें एक साहसच होतें. नुकत्याच स्थापन झालेल्या डेक्कन सभेचे प्रतिनिधि ह्मणून गोखले विलायतेला गेले होते. आपण केवढी जबाबदारी आपल्या अंगावर घेत आहों याची त्यांना पूर्ण जाणीव असल्यामुळें, त्यांनीं या साक्षीची तयारी आपल्या गुरूच्या देखरेखीखालीं करून केली होती. सुप्रसिद्ध आंकडेशास्त्रज्ञ कै० ना० ग० व्यं० जोशी हे त्या वेळीं सोलापुरास हेडमास्तर असल्यानें, व रावसाहेब रानडे हे मुंबईस हायकोर्ट जज्ज असल्यानें, या साक्षीची तयारी करीत असतांना गोखल्यांना “ पुण्याहून मुंबईला, मुंबईहून सोलापुराला, आणि सोलापुराहून पुनः पुण्यामुंबईला खेपा किती तरी घालाव्या लागल्या. ” ( मनोरंजन-वसंत अंक १९१५; पृ० ३५७ ) या साक्षीची तयारी जवळ-जवळ तीन महिने होत होती. अखेरीस ता० १२ आणि १३ एप्रिल १८९७ रोजीं प्रो० गोखल्यांची कमिशनपुढें साक्ष झाली; आणि या अग्निदिव्यांतून ते सुखरूपपणें पार पडले. विलायतेंत व हिंदुस्थानांत लोकांच्या व सरकारच्याही दृष्टीनें या साक्षीमुळें गोखल्यांची मान्यता निःसंशय वाढली. वाच्छा व बानर्जी हे कसलेले व अनुभवी पुढारी, त्यांच्या साक्षी चांगल्या झाल्या यांत नवल कांहींच नाहीं; खरें नवल हेंच कीं, अननुभवी व नवशिक्या गोखल्यांची साक्ष यांच्या साक्षींहूनही कांकणभर सरस ठरली! आपल्या शिष्यानें हा

अपूर्व विजय संपादन केलेला पाहून न्यायमूर्तींची काळजी दूर झाली व त्यांना अत्यंत आनंद झाला. ( Gokhale and Economic Reforms: page 54 ). सार्वजनिक सभा विरुद्ध डेक्कन सभा असा वाद टिळक व गोखले यांच्यामध्यें असल्यामुळें टिळकांनीं गोखल्यांच्या साक्षीवर लिहितांना बरेंच टाकून लिहिलें होतें. तरीही खुद्द साक्षीसंबंधानें केसरीला पुढील कबुली द्यावीच लागली— " शेवटीं इतकेंच सांगून पुरें करतों कीं, प्रो० गोखले यांनीं येवढी लांबची सफर केल्याचें व आपल्या अनुभवी व विद्वान् गुरूच्या शिकवणीचें चीज केलें. " ( केसरी, ता० ११-५-१८९७ ). याच अग्रलेखांत गोखल्यांविरुद्ध करण्यांत आलेल्या टीकेला खुद्द गोखल्यांनींच लंडनहून समर्पक उत्तर लिहिल्यामुळें, ही टीका सहजच फोल ठरते ( न० चिं० केळकरकृत टिळकचरित्र: पृ. ४८९ )

वेल्बी कमिशनपुढें गोखल्यांनीं दिलेली साक्ष विस्तारानें फारच मोठी आहे. मुख्य कैफियत व उलटतपासणी मिळून नटेसन यांच्या गोखल्यांच्या भाषणाच्या पुस्तकाचीं बारीक टायपाचीं १८६ पृष्ठें होतात! एवढ्या मोठ्या साक्षीचा विस्तृत सारांश येथें देतां येणें शक्य नाहीं व इष्टहि नाहीं. फक्त महत्त्वाचे मुद्देच देतों. हिंदुस्थानाच्या जमाखर्चावर हिंदी लोकांचा ताबा नाहीं. इतर देशांत कर देणाऱ्यांचा ताबा पैशावर असतो, हिंदुस्थानची गोष्ट तशी नाहीं. हिंदुस्थानच्या पैशाचा व्यय इंग्लंडच्या हिताहिताकडे पाहून होत असतो, देशांत शांतता असतां युद्धाच्या जय्यत तयारी-निशीं गोरें सैन्य ठेवण्यांत येतें; नोकरीच्या सर्व प्रकारच्या वरिष्ठ जागांवर गोऱ्या नोकरांची भरती करण्यांत येते, आणि अशाच प्रकारचे अनेक अन्याय प्रत्यहीं चालू असतात. प्रांतिक सरकारांवर हिंदुस्थान सरकारचा ताबा असतो, हिंदुस्थानसरकारावर स्टेट सेक्रेटरीचा ताबा असतो, आणि स्टेट सेक्रेटरी पडला पार्लमेंटाच्या ताब्यांत. पण हा ताबा सर्व एका अधिकाऱ्याचा दुसऱ्या अधिकाऱ्यावर अशा सरकारी स्वरूपाचा व नांवाचा असतो. लोकमताला जबाबदार कोणीच नसतात. इंग्रजी राजकारणांत जरी

'लिबरल' व 'कॉँझर्वेटिव्ह' असे पक्ष असले, तरी हिंदुस्थानाचा प्रश्न आला म्हणजे सगळेच 'कॉँझर्वेटिव्ह' बनतात, आणि त्यामुळें हिंदुस्थान सरकाराला सर्व मोकळें रान सांपडतें. याचा परिणाम रयतेला व प्रांतिक सरकारांना भोगावा लागतो. 'पंच वार्षिक करारा' ची पद्धति घातुक असन तिच्यामुळें प्रांतिक सरकारांची कुचंबणा होते, आणि हिंदुस्थान सरकारला उधळेगिरी करावयास फावतें. जमेच्या मानानें खर्चाची वाढ भयंकर होते, या खर्चापैकीं फारच मोठा भाग सैन्यावर खर्च होतो, आणि रयतेच्या डोक्यावरील कराच्या ओझ्यांत सारखी भर पडत जाते. हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्यामधील देण्याघेण्याची विभागणी प्रमाणशीर होत नाहीं, आणि इंग्लंडसाठीं हिंदुस्थानाला विनाकारण भूर्दंड सोसावा लागतो वगैरे मुद्दे गोखल्यांनीं पुराव्यानिशीं साक्षींत जोरानें प्रतिपादिले आहेत. त्यांनीं टीकेबरोबरच कांहीं सूचनाही कमिशनला केल्या होत्या. प्रांतिक कौन्सिलांत लोकनियुक्त प्रतिनिधि असणें, बजेट कौन्सिलपुढें मंजुरीसाठीं मांडणें, लोक-प्रतिनिधींना बजेटावर सूचना आणण्याचा अधिकार असणें, ठराव मांडतां येणें, इंग्लंडांत हिंदुस्थानच्या जमाखर्चाची चांचणी करणारी एक कमिटी नेमणें व प्रत्येक प्रांतातर्फे पार्लमेंटांत एक प्रतिनिधि निवडून पाठविण्याचा अधिकार प्रांतिक कौन्सिलांना देणें वगैरे सूचना त्यांनीं केल्या होत्या. लॉर्ड डफरीन यानीं नेमलेल्या फायनॅन्स कमिटीनें 'पंचवार्षिक करारांच्या' बाबतींत ज्या सूचना केल्या होत्या, त्याच गोखल्यांनींही केल्या. वरिष्ठ जागांवर हिंदी लोकांच्या नेमणुका करण्याची सूचना करण्यास गोखले विसरतील हें शक्यच नव्हतें.

गोखल्यांनीं दिलेल्या या 'कडू गोळ्या' कमिशनच्या सभासदांच्या घशाखालीं सुखानें उतरल्या नाहींत. सर्व कमिशनर्स त्यांच्यावर उलट तपासणीच्या वेळीं तुटून पडले. रेल्वेमुळें हिंदी उद्योगधंद्यांना धक्का बसला हें गोखल्यांचें विधान कमिशनर्सना फार धाडसाचें वाटलें. याबद्दल त्यांना बरेच प्रश्न विचारण्यांत आले. फॅमिन इन्शुअरन्स फंडाविषयींच्या विधानांनीं सभासद बरेच गरम झाले. पण या व इतर मुद्यांवर गोखल्यांनीं मुळींच न

3049

डगमगतां शेवटपर्यंत जोर दिला. गोखल्यांपुरतो या कमिशनचा इतिहास येथेंच संपतो. कमिशनचा पुढचा इतिहास हाच कीं, सभासदांत मतभेद होऊन बहुमतवाल्यांनीं एक रिपोर्ट लिहिला, अल्पसंख्याकांनीं दुसरा लिहिला आणि कोणत्याहि रिपोर्टापासून पुढें फारसें कांहींच निष्पन्न झालें नाहीं. अल्पसंख्याकांचें आणि गोखलेप्रभृति हिंदी साक्षीदारांचें पूर्ण एकमत होतें, एवढीच महत्त्वाची गोष्ट येथें सांगितली पाहिजे.

याच खेपेस गोखले आयर्लंडांत जाऊन डिलन, मायकेल डेव्हिट, वगैरे आयरिश पुढाऱ्यांना भेटले होते. ( आयर्लंडचा इतिहासः पृष्ठ २ ) तसेंच या वेळीं गोखल्यांनीं विलायतेंत एका ‘ टेम्परन्स ’च्या सभेपुढें भाषण केलें. हें भाषण त्यांच्या भाषणांच्या पुस्तकांत प्रसिद्ध झालेलें नाहीं. पण मुंबई सरकारनें १९२२-२३ सालीं नेमलेल्या एक्साइज कमिटीच्या रिपोर्टांत पृष्ठ २४ वर या भाषणांतील कांहीं उतारे दिलेले आहेत. त्या भाषणांत गोखल्यांनीं मद्यपानबंदीविषयींचीं आपलीं मतें उघडपणें सांगितलीं आहेत. ते म्हणतात— "I will state frankly at the outset that personally I am a prohibitionist, and I believe that total prohibition is really in keeping with the sentiment of the Indian people." (Report of the Excise Committee; Vol. I. page 24). मुलकी अधिकाऱ्यांनीं मक्तेदारांना परवाने देऊं नयेत, आणि मक्त्यांचे लिलांव करण्यांत येऊं नयेत, अशा त्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या मद्यपानप्रतिबंधाच्या धोरणांत दुरुस्त्या सुचविल्या आहेत. येथें जातां जातां हें सांगून टाकलें पाहिजे कीं, ‘ पूना टेम्परन्स असोसिएशन ’ चे उपाध्यक्ष गोपाळराव फार दिवस होते. (Report of the Excise Committee; Vol. II. page 206 ) पुढें १९१२ सालीं गोखले विलायतेस असतांना स्टेट सेक्रेटरीकडे ‘ टेंपरन्स डेप्युटेशन ’ घेऊन सर हरबर्ट रॉबर्ट्स हे गेले होते. या डेप्युटेशनमध्यें गोखले होते व हिंदुस्थानसरकारच्या ‘ एक्साइज पॉलिसी ’ ची चौकशी करण्याकरितां एक स्वतंत्र कमिटी नेमण्यांत यावी अशी या डेप्युटेशनची मागणी होती. तिला

दुजोरा देतांना गोखले म्हणाले— "They (The Government of India) do not want to spread drinking but they are interested in the revenue that arises from it and that constitutes a serious difficulty in dealing with the question." (Report of the Exc. Comm. Vol. I. Page 31)

'व्हिक्टोरियन ईरा एक्झिबिशन' याच वर्षी लंडन येथें झालें. त्यांत एक 'शिक्षणपरिषद्' भरविण्यांत आली होती. या शिक्षणपरिषदेपुढें गोखल्यांनीं हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षणावर एक निबंध वाचला. या निबंधांत हिंदी स्त्रियांच्या शिक्षणाच्या मार्गांत सामाजिक अडचणी कशा आहेत, सध्यांच्या हिंदुस्थानांतिल स्त्रीशिक्षणाची प्रगति कशी झाली वगैरे गोष्टी गोखल्यांनीं आंकडे देऊन सांगितल्या आहेत. लॉर्ड रिपन यांनीं नेमलेल्या एज्युकेशन कमिशनच्या आधारें गोखल्यांनीं आपलें म्हणणें मांडलेलें आहे. निरनिराळ्या प्रांतांतून स्त्रीशिक्षणाला केव्हां सुरुवात झाली, स्त्रीशिक्षणाचे आरंभींचे पुरस्कर्ते कोण होते, व १८९७ सालीं प्रांतानिहाय शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची संख्या काय होती हें स्पष्ट रीतीनें दाखवून, यापुढें हिंदी स्त्रियांच्या शिक्षणाची प्रगति होईल अशी त्यांनीं आशा प्रदर्शित केली आहे.

कर्मधर्मसंयोग असा कीं, ज्या वेळीं इंग्लंडांत व हिंदुस्थानांत गोखल्यांचा यशोदुंदुभि सारखा वाजत होता, त्याचवेळीं दैव त्यांच्यावर गुप्तपणें घाला घालण्याची तयारी करीत होतें. पुण्यांतील प्लेगव्यवस्थेच्या कागाळ्या समंजस व शहाण्यासुर्त्या माणसांनीं विलायतेंत गोखल्यांच्या कानावर घातल्या. वकील, प्रोफेसर, लेखक वगैरे दर्जाच्या नऊ गृहस्थांनीं गोखल्यांना खासगी पत्रें लिहून, त्यांत सोल्जरांच्या अनन्वित अत्याचारांचें रसभरित वर्णन केलें होतें. याशिवाय त्यांना सुधारकाचा एक अंक मिळाला होता. इतक्यांत रँड आणि आयर्स्ट यांच्या खुनांनीं सर्व हिंदुस्थानच काय पण इंग्लंडही समूळ हादरून गेलें. जेथें खून झाले, तेथून गोखले आलेले; यामुळें इंग्लंडांत गोखल्यांना जो तो प्रश्न विचारूं लागला. राजकीय प्रगति तर बाजूलाच राहिली, परागति मात्र आतां हटकून होणार अशीं चिन्हें

दिसूं लागलीं. तेव्हां सर विल्यम वेडरबर्न, ह्यूम, दादाभाई वगैरेंच्या सांगण्यावरून, गोखल्यांनीं त्या पत्रांतील हकीकत प्रसिद्ध केली! त्याबरोबर कोठारांत ठिणगी पडून भडका उडावा, तसा सर्व इंग्लंडभर भडका उडाला. ब्रिटिश सोल्जरांची अब्रू खराब झाली ह्मणून इंग्लंड आणि हिंदुस्थान यांच्यामधील सरकारी तारायंत्र जोरानें हलूं लागलें, आणि शेवटीं गोखल्यांचीं विधानें खोटीं व दुष्टपणाचीं आहेत, असें मुंबईसरकारनें जाहीर केलें. गोखल्यांना माहिती पुरविणाऱ्या वीरांनीं आपलीं नांवें सांगूं नका म्हणून गोखल्यांची करुणा भाकली, आणि शरणागताला अभय देऊन गोखल्यांनीं हिंदुस्थानांत आल्याबरोबर सपशेल माफीचें पत्र प्रसिद्ध केलें!

या गोष्टीचे परिणाम मात्र साधे झाले नाहींत. खुद्द गोखल्यांना अत्यंत वाईट वाटलें. हाऊस ऑफ कॉमन्समध्यें एक सभासद गोखल्यांना 'Despicable perjurer' ह्मणाला. सर फेरोजशहा मेथांना पुढें चार वर्षांनीं पाठविलेल्या पत्रांत गोखले याबद्दल ह्मणतात: "The words burnt into my heart." (Sir Pherozeshah Mehta: H. P. Mody; Vol. II. Page 422) वेल्बीकमिशनपुढें मिळविलेल्या अपूर्व यशावर पाणी पडल्यासारखें झालें. सामान्य जनतेला गोखले आवडतनासे झाले. त्यांच्या विरोधकांनीं या संधीचा चांगला फायदा घेतला. सरकार खटला करील या धाकानें, मुंबई टाइम्सचे संपादक बेनेटसाहेब यांनीं सरकारला हव्यातशा रीतीनें लिहिलेल्या माफीपत्रावर गोखल्यांनीं सही केली, अशा अफवा उठल्या! (केळकरकृत टिळक-चरित्र पृ० ६०७) जवळ जवळ दोन वर्षें गोखल्यांना अज्ञातवासांत काढावीं लागलीं इतका हा लोकमताचा क्षोभ भयंकर होता.

तारीख ३० जुलै १८९७ रोजीं (टिळक-जीवनरहस्य पृ. ७३) गोखले विलायतेहून यश मिळवून आले; आणि लगेच दुर्दैवानें त्यांच्या पदरांत अपयशाचें माप टाकलें. यानंतर गोखले पुनः १९०५ सालीं कॉंग्रेसचे प्रतिनिधि म्हणून इंग्लंडांत गेले. लॉर्ड कर्झन यांच्या अरेरावी कारकीर्दीचा कळस झाला होता; आणि इंग्लंडांतही बाल्फोर साहेबांच्या प्रधानमंडळाची

सत्ता संपुष्टांत येऊन जनरल इलेक्शन लवकरच होण्याचा संभव होता. अशा वेळीं गोखले व लाला लजपतराय यांच्यासारखे लोक विलायतेंत अवश्य हवे होते. या खेपेला इंग्लंडांत असतांना गोखल्यांनीं ५० दिवसांत कमींत कमी ४५ व्याख्यानें दिलीं! (The Indian Nation Builders, Part I. Page 214) या श्रमांमुळें परत येतांना बोटीवरच त्यांच्या घशाचें ऑपरेशन करावें लागलें हें मागें सांगितलेंच आहे. (प्रकरण १ लें) याच वर्षीं गोखल्यांनीं मोर्लेसाहेबांची प्रथम गांठ घेतली असावी असें वाटतें. मोर्ले साहेबांनीं आपल्या 'आठवणीं'त ता० २२ नोव्हेंबर १९०५ रोजीं गोखल्यांविषयीं पुढील मजकूर लिहिला आहे. November 22. (1905)........Also interview of half an hour with Gokhale, a Mahratta brahmin from Bombay, immensely interesting." (Page 139) या वेळेला कॉन्झर्वेटिव्ह प्रधानमंडळाचा पराभव झालेला होता; पण लिबरल पक्षानें आपलें प्रधानमंडळ बनविलें नव्हतें. सर कँबेल बॅनरमन यांनीं डिसेंबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यांत प्रधानमंडळ बनविलें, आणि मोर्ले स्टेट सेक्रेटरी झाले. ज्याप्रमाणें जुना स्टेट सेक्रेटरी जाऊन नवा आला, तसाच जुना व्हाइसरॉय जाऊन नवा व्हाइसराय आला. लॉर्ड मिंटो आणि लॉर्ड मोर्ले या दोघांच्याही कारकीर्दी एकदमच १९०६ सालापासून सुरू झाल्या असें म्हणण्यास हरकत नाहीं. देशांत असंतोष अतिशय माजला, फुल्लरसारखे अधिकारी बेतालपणानें वागूं लागले, आणि लोकमतांत व सरकारच्या विचारांत फारच अंतर पडूं लागलें. अशा स्थितींत हिंदी लोकांना अधिक राजकीय हक्क मिळावे, अशी खटपट करण्यासाठीं गोखले पुनः १९०६ सालीं विलायतेस गेले. या खेपेस त्यांनीं जाहीर भाषणें फार न करतां मुत्सद्यांच्या व पार्लमेंटच्या सभासदांच्या मुलाखती वरचेवर घेतल्या. लॉर्ड मोर्ले यांच्या वरील अवतरणावरून हें कळून येईल कीं, ता० १ आगष्ट रोजीं गोखले व मोर्ले यांची पांचवी व शेवटची मुलाखत झाली. यापूर्वीं ता० ९ मे १९०६ च्या मुलाखतीची

हकीकत मोर्ले यांनीं दिली आहे. त्यांत मोर्ले म्हणतात:—"Mr. Gokhale is to stay in London until the end of the Session, and I am in good hopes of finding him a help to me, and not a hindrance, in guiding the strong currents of democratic feeling that are running breasthigh in the H. of C......The British Radical now prominent in the H. of C. does *not* mean mischief, and I think Gokhale does not mean to lead him that way if the said G. is rightly handled." ( page 171 ) मोर्ले यांच्या 'आठवणीं' वरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही कीं, व्हाइसरॉय आणि स्टेटसेक्रेटरी—विशेषतः स्टेट सेक्रेटरी यांच्या मनांतून खरोखरच हिंदुस्थानचें हित करावयाचें होतें. मात्र हें हित फार मर्यादित स्वरूपाचें होतें. 'वसाहतींचें स्वराज्य' हें आपलें ध्येय असल्याचें गोखल्यांनीं जसें मोर्ले यांना स्पष्ट सांगितलें, तसेंच मोर्ले यांनींही गोखल्यांना स्पष्टच सांगितलें कीं, 'मला हिंदुस्थानच्या क्षितिजावर वसाहतींच्या स्वराज्याच्या उदयाचीं चिन्हें मुळींच दिसत नाहींत!' तरीही पण त्यांनीं गोखल्यांना असें सांगितलें कीं, हिंदी लोक जर आम्हांला झेंपणाऱ्या सुधारणा सुचवितील, तर त्या देतां येण्यासारखी परिस्थिति सध्यां आहे. हिंदुस्थानाला सध्यां जे व्हाइसरॉय आहेत, त्यांना हिंदी लोकांविषयीं स्नेहभाव वाटतो. स्टेटसेक्रेटरीच्या जागेवर सध्यां असा इसम आहे कीं, ज्याच्यावर प्रधानमंडळाचा, हाऊस ऑफ कॉमन्सचा, आणि उभय पक्षांच्या वर्तमानपत्रांचा पूर्ण विश्वास आहे. यापेक्षां सुधारणांना अनुकूल अशी परिस्थिति दुसरी कोणती असणार? मात्र हिंदी लोकांनीं जर आपला दुराग्रह सोडला नाहीं, आणि आपल्या अवाढव्य मागण्या प्रमाणांत आणल्या नाहींत, तर ही अनायासें चालून आलेली संधि ते दवडतील. हा मोर्लेसाहेबांचा उपदेश ऐकून गोखल्यांनीं असा कांहीं एक प्रकार होणार नाहीं असें त्यांना आश्वासन दिलें, आणि हिंदुस्थानांतिल आपल्या

अनुयायांना जपून बोलण्या व लिहिण्याविषयीं पुनः पुनः बजावून सांगितलें. हिंदुस्थानाला कांहीं तरी देण्याची लॉर्ड मोर्ले यांना अगदीं मनापासून इच्छा होती; पण हें पार्लमेंटाच्या ताब्यांत असल्यानें कॉमन्स व लॉर्ड या सभांतील सभासदांची एक संमिश्र पार्लमेंटरी कमिटी असावी, व तिच्यापुढें विलायतेला परत गेलेले इंडियन सिव्हिल सर्व्हंट, गोखल्यांसारखे हिंदी पुढारी यांनीं वेळोवेळीं आपआपल्या बाजू मांडाव्या अशा कल्पना त्यांना वारंवार सुचत.

( page 195)

पुनः गोपाळरावांना १९०८ सालीं विलायतची सफर करावी लागली. ही त्यांची चौथी सफर होय. १९०७ सालीं लॉर्ड मोर्ले यांनीं इंडिया कौन्सिलवर दोघां हिंदी गृहस्थांच्या नेमणुका केल्या. यामुळें हिंदी सुधारणांच्या प्रश्नाला तोंड लागल्यासारखें झालें. तेव्हां स्वतःची योजना पुढें मांडण्यासाठीं व विचारविनिमय करण्यासाठीं बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशनतर्फे गोपाळराव विलायतेला गेले. त्यांनीं स्वतःची म्हणून जी योजना सादर केली तिच्यांत त्यांनीं व्हाइसरॉयांच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्यें दोन हिंदी सभासद असावेत, प्रांतिक एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्यें कोठें एक व कोठें दोन हिंदी सभासद असावेत, वरिष्ठ कायदे कौन्सिलांत सरकारी बहुमत रहावें, पण प्रांतिक कायदे कौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांचें बहुमत असावें, कौन्सिलाच्या सभासदांना बजेटावर मतें देण्याचा, ठराव आणण्याचा व प्रश्न विचारण्याचा हक्क असावा, ‘व्हेटो’चा अधिकार असावा, जिल्हा कौन्सिलें स्थापण्यांत यावीं, ग्रामपंचायतींचा प्रसार करण्यांत यावा वगैरे वगैरे मुद्दे मांडले होते. या योजनेवर टाईम्सनें टीका केली, त्या टीकेला उत्तर देतांना गोखल्यांनीं असें सांगितलें कीं, हीच योजना पूर्वी हिंदुस्थान सरकार आणि अधिकारविभागणी कमिशन यांच्यापुढें विस्तारानें मांडण्यांत आली होती. गोखले सुधारणांसाठीं विलायतेला गेल्यावर हिंदी मुसलमानांच्या मागणीची ओरड सुरू झाली; आणि गोखल्यांनीं हिंदूंची बाजू तेवढी मोर्ले यांच्यापुढें मांडली असा त्यांच्यावर आरोप करण्यांत आला. तेव्हां ही योजना प्रसिद्ध करणें गोखल्यांना जरूर वाटलें, व त्याप्रमाणें ती प्रसिद्ध

झाल्यावर पुष्कळ समंजस मुसलमानांचें समाधान झालें. केवळ गोखल्यांच्या मोहबतीखातर मोर्ले यांनीं त्यांच्या योजनेंतला महत्त्वाचा भाग पसंत केला असें नसून मोर्ले यांचीं मतें व गोखले यांचीं मतें या बाबतींत जुळलीं अशी खरी गोष्ट होती. हिंदुस्थानसरकार, लॉर्ड मोर्ले व गोखले या तिघांचेंही मत जेथें जुळलें, तेथें कार्यभागाला उशीर काय लागणार ?

मोर्ले यांनीं लिहिल्याप्रमाणें या वर्षीही गोखल्यांनीं पार्लमेंटच्या हिंदुस्थानाविषयीं सहानुभूति वाटणाऱ्या सभासदांपुढें भाषणें केलीं, व त्याचा मोर्ले यांना फार फायदा झाला. ( Page 261 ) हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें सुधारणांविषयीं लोक अधीर झाले होते, त्याचप्रमाणें इंग्लंडांतही गोखल्यांच्या चळवळीमुळें म्हणा, किंवा मोर्ले यांच्या खटपटीनें म्हणा, थोडीशी अधीरता उत्पन्न झाली होती. ( page 282 ) गोखले यांनीं मोर्ले यांच्या मार्गांतील अडचणी शक्य तितक्या कमी करण्याविषयीं सर हेन्री कॉटन यांनाही लिहिल्याचें मोर्ले सांगतात. ( page 295 )

सन १९०८ च्या डिसेंबराच्या पहिल्या आठवड्यांत गोखले आणि मोर्ले यांचें शेवटचें भाषण झालें. यावेळीं गोखल्यांनीं त्यांच्याजवळ असें सांगितलें कीं, आतां आपण पुनः इंग्लंडास येणार नाहीं, इंग्लंडांतलें काम झालें; आतां हिंदुस्थानांत कामाचे डोंगर पडले आहेत, तिकडे वळलें पाहिजे. हिंदुस्थानांत कामाचे डोंगर पडले होते हें तर खरेंच; पण इंग्लंडांतही काम होतेंच, आणि म्हणूनच गोखल्यांना पुढें तीनच वर्षांनीं इंग्लंडला जावें लागलें, पण त्यावेळीं मोर्ले अधिकारावर नसल्यामुळें गोखल्यांचा व मोर्ले यांचा संबंध येथेंच संपतो. तेव्हां या शेवटच्या भेटीच्या वेळीं गोखल्यांच्याविषयीं मोर्ले यांना काय वाटलें तें त्यांच्याच शब्दांत देऊन मग पुढील सफरींचा विचार करूं. मोर्ले मिंटो यांना लिहितात:—

" On the whole, his tone both attracted and impressed me. He promises very confidently a good reception for our Reforms by the Congress. I did not disclose to him their precise terms, but of course it was

easy enough for an old hand like him to guess pretty well on what lines they are sure to run." (page 286)

आज हिंदी लोकांच्या आकांक्षा मांटेग्यू-चेल्मसफर्ड सुधारणांनाही मागें टाकून पुढें जात आहेत. अशा वेळीं मोर्ले-मिंटो सुधारणा कोणाच्या लक्षांतही न आल्या, तरी त्यांत कांहीं नवल नाहीं. मोर्ले-मिंटो सुधारणांच्या मानानें मॉंटफर्ड सुधारणांनीं पुष्कळच अधिक दिलें यांत शंका नाहीं. पण हिंदी राष्ट्राच्या राजकीय प्रगतीच्या सोपानपरंपरेची एक पायरी म्हणून इतिहासकाराला मोर्लेमिंटो सुधारणांना विसरतां येणें शक्य नाहीं. हिंदी स्वराज्याचा प्रासाद उभारण्याचें काम चालूं असतां, खालील पाया दिसत नसला तरी जागेवर आहे अशी दृढ भावना असली पाहिजे. ही भावना मनांत जागृत ठेऊन विचार केला म्हणजे गोखल्यांच्या कामगिरीचें महत्त्व कळून येईल. 'टाईम्स' च्या टीकेला उत्तर देतांना व १९०९ च्या बजेटावर भाषण करतांना (Gokhale's speeches: pp. 179-181 and 980-983) स्वतः गोखल्यांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांच्या आणि अधिकारीवर्गाच्या सुधारणांच्या योजना जुळल्या ही गोष्ट खरी; पण त्या जुळल्यामुळेंच अधिकारीवर्गाला या सुधारणा अमलांत आणण्यास सहाय्य व उत्तेजन मिळालें ही गोष्ट विसरतां कामा नये. गोखल्यांनीं मोर्ले यांना कशी मदत केली हें मोर्ले यांच्याच 'आठवणीं' वरून वर दाखविलें आहे, शिवाय लॉर्ड रे म्हणतात.— "if Lord Morely were at that meeting he would testify as to the great assistance derived in elaborating his plans from the advice he obtained from Mr. Gokhale. And that advice was always given on practical lines." (अभ्यंकरकृत गो० च० पृ० ४०) यावेळीं माथेफिरू लोकांनीं हिंदुस्थानांत अत्याचारांचा कसा धुमाकूळ घातला होता, व वर्तमानपत्रें कशीं बेजबाबदारपणानें लिहीत होतीं हें ज्यांना माहीत आहे, त्यांना गोखल्यांच्या श्रमांची यथार्थ कल्पना करतां येईल.

१९१२ सालीं गोखल्यांना विलायतची पांचवी सफर करावी लागली. याच सालीं ते इंग्लंडहून साऊथ आफ्रिकेला गेले. आफ्रिकेला काय कारणासाठीं त्यांना जावें लागलें, आणि तेथील त्यांची कामगिरी कशी झाली हें सांगण्यापूर्वी खुद्द इंग्लंडांत त्यांनीं काय केलें हें थोडक्यांत सांगितलें पाहिजे. मद्यपाननिषेधविषयक डेप्युटेशनचे एक सभासद म्हणून ते स्टेटसेक्रेटरी साहेबांकडे गेल्याचें वर सांगितलेंच आहे. याशिवाय त्यांनीं प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत इंग्लंडांतील सत्ताधारी वर्गाची सहानुभूति मिळविली. त्यांच्या मतांना आतां चोहोंकडे मान्यता मिळूं लागल्यामुळें लिबरल पक्षांतील लोकांप्रमाणेंच कॉंझर्वेटिव्ह पक्षाचे लोकहि त्यांच्या मुलाखती घेऊं लागले. याचवेळीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या दुःखाची परमावधि झाल्यामुळें गांधींच्या निमंत्रणावरून आणि इंग्रजी मुत्सद्यांच्या सांगण्यारून गोखले तिकडे गेले. दक्षिण आफ्रिकेंत हिंदी मजुरांची रवानगी सन १८६० सालापासून होऊं लागली. या मजुरांना पांच वर्षांच्या मुदतीचा करार करून द्यावा लागत असे, व हा करार पूर्ण झाला ह्मणजे हिंदुस्थानांत परत येणें किंवा तेथेंच कायमचें रहाणें हे दोनही मार्ग त्यांना मोकळे असत. तेथें रहाणाऱ्यांना दरसाल तीन पौन्डांचा कर द्यावा लागे व मजुरांना त्यांचे मालक फारच वाईट रीतीनें वागवीत. वर्णभेद व स्थानभेद यांचा जबरदस्त पगडा वसाहतवाल्यांवर बसून त्यांनीं सर्व एशियाटिक लोकांना व हिंदी लोकांना शक्य तो त्रास देण्यास सुरुवात केली. हिंदी लोकांचा मतदानाचा हक्क काढून घे, त्यांच्यावर जबर कर लाद, त्यांना ट्रॅम, रेल्वे वगैरेंचा समान हक्कानें उपयोग करण्यास बंदी कर, असले अनेक प्रकार वसाहतवाल्यांनीं दक्षिण आफ्रिकेंत करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. हिंदी लोकांचीं हीं गाऱ्हाणीं फार जुनीं असून सन १८९४ सालींच हिंदी राष्ट्रीय सभेला दक्षिण आफ्रिकेबद्दल पहिल्यांदा ठराव करावा लागला. सुदैवानें तेथील दुबळ्या हिंदी प्रजेला गांधींसारखा सात्त्विक पण करारी नेता मिळाल्यामुळें तिला थोडेंफार आपलें संरक्षण करतां आलें. अधिकारावर बोअर सरकार असो, साम्राज्यसरकार असो, किंवा वसाहतवाल्यांचें

स्वयंशासित सरकार असो, हिंदी लोकांच्या दुःखांना केव्हांहि उतार पडावयाचा नाहीं. अशा परिस्थितींत गांधीजींनीं आपली सत्याग्रहाची मोहीम चालू केली व १९१२ सालीं ती हातघाईवर आल्यावर गांधींच्या निमंत्रणावरून हिंदुस्थानसरकार व विलायतसरकार याच्या संमतीनें गोखले आफ्रिकेंत गेले.

तारीख २२ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबरपर्यंत म्हणजे सुमारें पाऊण महिना गोखले दक्षिण आफ्रिकेंत होते. एवढ्या अवधींत जेवढें काम करणें शक्य होतें तेवढें गोखल्यांनीं केलें. स्मटस व बोथा या दोघांकडून तीन पौंडांची डोईपट्टी रद्द करण्याचें वचन त्यांनीं मिळविलें, पण गोखले परत हिंदुस्थानांत आल्यावर या गोष्टीचा इनकार करण्यासही या दोघांनीं कमी केलें नाहीं! (अवंतिकाबाई गोखलेकृत महात्मा गांधी, पृष्ठ ४८) गोपाळरावांनीं या प्रसंगीं केलेल्या कामगिरीबद्दल सर व्हॅलेंटाईन चिरोल व लॉर्ड हार्डिंज (ग० र० अ० कृत गोखले चरित्र पृ० ४७–४९) यांनीं प्रशंसापर उद्गार काढले असले तरी अखेरीस स्मट्स व बोथा यांच्या वरील इनकारानें या कामगिरीवर पाणीच पडल्यासारखें झालें. येथें आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं, गोखले व गांधी या उभयतांनीं वसाहतींशीं वागतांना जें फाजील तडजोडीचें धोरण स्वीकारलें होतें तें फेरोझशहा मेथांना बिलकूल पसंत नव्हतें. (H. P. Mody's P. M. M.: pp. 629-30)

यानंतर पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सभासद ह्मणून कमिशनच्या कामासाठीं गोखल्यांना १९१३ व १९१४ सालीं विलायतेस जावें लागलें. या वेळीं प्रकृति नादुरुस्त असतांही त्यांनीं इंग्लंडांत हिंदुस्थानाच्या प्रश्नांविषयीं कामगिरी केलीच. ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी व इंडिया पत्र हीं चांगलीं चालावीं म्हणून त्यांना नेहमीं झटावें लागे. पब्लिक सर्व्हिस कमिशनचें कामही फारच त्रासदायक होतें. पब्लिक सर्व्हिसेसचा प्रश्न किती जुना आहे हें मागील प्रकरणावरून कळून येईलच. लॉर्ड इस्लिंग्टन यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या या कमिशनमध्यें हिंदी लोकांची बाजू

संभाळण्याचें काम गोपाळरावांकडेच असल्यामुळें त्यांना युरोपियन साक्षीदारांची कसून उलटतपासणी करावी लागे. पण ही नीट करतां यावी म्हणून त्यांना २४ तासांपैकीं २० तास काम करावें लागे! अशा श्रमांनीं त्यांची प्रकृति फारच खालावली व कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध होण्यापूर्वींच ते दिवंगत झाले!

ता. १५ जानेवारी १९०१ रोजीं फेरोझशहांना पाठविलेल्या पत्रांत गोखल्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे.— " ......I made up my mind to devote my life......to the furtherance of our political cause in England......The English work is dear to my heart...... " ( H. P. M's P. M. M. pp. 422-23 ). इंग्लंडांत राहून दादाभाईसारखे पार्लमेंटचे सभासद होण्याचीही हौस गोखल्यांना होती. Joseph Chailley नांवाच्या फ्रेंच चेंबर ऑफ डेप्युटीजच्या सभासदानें लिहिलेल्या Administrative Problems of British India या पुस्तकांत तो म्हणतो— "......I imagine that Mr. Gokhale will in time also seek Parliamentary honours, and if he obtains them he will be a notable member, who will have to be reckoned with. " ( Page 179 ) पण रानड्यांनीं त्यांना या इच्छेपासून परावृत्त केलें असें प्रो० पटवर्धन लिहितात. तें कसेंही असलें तरी पार्लमेंटांत बसण्याइतकी योग्यता गोखल्यांजवळ होती याबिषयीं कोणासच शंका नाहीं. परदेशांतील कामगिरी करून त्यांनीं सर्वांकडूनच शाबासकी मिळविली. कॉंग्रेसच्या आजच्या तऱ्हेवाइक धोरणामुळें परदेशांतील राजकारण कॉंग्रेसनें सोडून दिलें असलें, तरीही तें गोखल्यांच्या अनुयायांनीं चालूंच ठेविलें आहे ही गोष्ट नमूद करून हें प्रकरण येथेंच पुरें करूं.

## प्रकरण ५ वें.

# प्रांतिक व वरिष्ठ कायदे कौन्सिलांतील कामगिरी.

राष्ट्रीय सभेंत व विलायतेंत कर्तबगार व होतकरू पुढारी म्हणून लौकिक संपादन केल्यावर गोखल्यांना कौन्सिलांत जाण्याची इच्छा झाली हें क्रमप्राप्तच होय. वेल्बी कमिशनपुढें त्यांनीं जें आंकडेगिरींतील प्रावीण्य प्रगट केलें, त्याला योग्य स्थान कायदेकौन्सिल हेंच होतें. पण मध्यंतरीं माफी प्रकरण उद्भवल्यामुळें त्यांना एकदोन वर्षें अज्ञातवासांत काढावीं लागलीं म्हणून, व १८९९ पर्यंत कायदेकौन्सिलाची नवी निवडणूक होणार नव्हती म्हणून त्यांना थोडेंसें थांबावें लागलें. १८९५ सालीं टिळकांचे प्रतिपक्षी म्हणून जठार उभे राहिले होते, व त्यांच्यासाठीं मतें मिळविण्याची खटपट गोखल्यांना करावी लागली होती; पण यावेळीं टिळकांचा जय झाला. १८९७ सालीं गोखलेच टिळकांना विरोधी म्हणून उभे रहावयाचे; पण निवडणुकीच्या वेळीं ते इंग्लंडांत होते. याही वेळीं टिळक निवडून आले, पण ही निवडणूक लवकरच फुकट गेली व त्यांच्या जागीं गरूड यांची नेमणूक होऊन गेली. १८९९ सालीं गोखल्यांची नाउमेद दूर करून न्या० रानडे यांनीं त्यांना कौन्सिलाकरितां उभें केलें व बहुमत मिळून ते निवडून आले. याही वेळीं निवडणुकीस उभें रहाण्याचा टिळकांचा बेत होता, पण तो साधला नाहीं. आपल्याला यश मिळणार नाहीं हें जाणून त्यांनीं नॉमिनेशन पेपरही पाठविला नाहीं !

गोखले अवघे दोनच वर्षें मुंबई कौन्सिलांत होते व त्यानंतर ते एकदम वरिष्ठ कौन्सिलांत गेले. या अवधींत एक म्युनिसिपालिट्यांचें बिल व एक लँडरेव्हिन्यु बिल अशीं दोन महत्त्वाचीं बिलें कौन्सिलापुढें आलीं. या दोनही बिलांच्या बाबतींत गोखल्यांनीं केलेली कामगिरी खरोखरीच प्रशंसनीय आहे. फेरोझशहा मेथा, गोकुळदास परेख, दाजीसाहेब खरे वगैरेंसारख्या

अनुभवी व कसलेल्या सभासदाइतकी गोखल्यांची कामगिरी चांगली व वाखाणण्यासारखी झाली. ता० १२ फेब्रुवारी १९०१ रोजीं मुंबई कायदे-कौन्सिलांत सर चार्लस ओलिव्हंट यांनीं मांडलेल्या ' मोफुसिल म्युनिसिपॅलिटीज बिल ' वर गोखल्यांनीं चांगलेंच भाषण केलें व बिलावर एक उपयुक्त उपसूचनाही आणली. म्युनिसिपालिट्यांतून लोकनियुक्त सभासद अधिकाधिक येत जावे व सरकारनें म्युनिसिपालिट्यांना योग्य तें स्वातंत्र्य द्यावें वगैरे मुद्दे गोखल्यांच्या या भाषणांत आहेत. अमेरिकेंतील म्युनिसिपालिट्या व युरोपांतील म्युनिसिपालिट्या यांचीं उदाहरणें देऊन व मिलच्या ' रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्नमेंट ' च्या आधारें गोखल्यांनीं आपलें म्हणणें विशद केलें. त्यांच्या या शास्त्रशुद्ध टीकेचा चांगला परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं.

पण गोखल्यांच्या खऱ्या कसोटीची वेळ थोडीशी पुढें होती. १९०१ च्या उन्हाळ्यांत महाबळेश्वराला कौन्सिलची बैठक भरवून मुंबईसरकारनें एक बिल पुढें आणलें, व या बिलामुळें सर्व महाराष्ट्रभर एकच हलकल्लोळ उडाला. शेतकऱ्यांच्या जमिनीवरील मालकीला अपायकारक होणारें असें हें बिल होतें व त्यामुळें रयतेनें त्याचा सार्वत्रिक निषेध केला. जमीनमहसूल हा रेंट ( भाडें ) आहे किंवा ' टॅक्स ' ( कर ) आहे हा सरकार व प्रजा यांच्या दरम्यानचा एक मोठाच वादग्रस्त प्रश्न आहे. हिंदुस्थानांत निरनिराळ्या जमीनधाऱ्याच्या पद्धति आहेत. मुंबईकडे रयतवारी पद्धति असून तिचा अंमल १८७९ च्या कायद्याप्रमाणें होत असे. या कायद्यांत दुरुस्ती सुचविण्याच्या निमित्तानें शेतकऱ्याचा जमीन विकण्याचा हक्क काढून घेण्यासाठीं सरकारनें हें बिल तांतडीनें आणलें व लोकमताला न जुमानतां तें पासही करून घेतलें. अनेक जाहीर सभा भरून बिलाचा निषेध करणारे अर्ज सरकारकडे पाठविण्यांत आले; पण सरकारनें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. महाबळेश्वराच्या बैठकींत गोखल्यांनीं सरकाराला इषारा दिला व पुढें २३ ऑगस्ट रोजीं पुणें येथें भरलेल्या कायदेकौन्सिलांत फेरोजशहांनीं लोकमत अजमावण्यासाठीं बिल लांबणीवर टाकावें अशी उपसूचना आणली. या

उपसूचनेवर गोखल्यांनीं फारच मुद्देसूद, विस्तृत व जोरदार भाषण केलें व बिलाचें भयंकर स्वरूप उघडकीस आणलें. पण ही उपसूचना नापास झाली व ना. मेथा, ना. खरे, ना. परेख, ना. सर भालचंद्र व ना. गोखले हे ताबडतोब कौन्सिलहॉलमधून उठून गेले व मग त्यांच्या गैरहजेरींत हें बिल पास झालें. "परंतु गोखल्यांच्या भाषणाचा परिणाम इतका झाला, कीं, तें उपजत मेल्यासारखें दिसलें," असे एका यूरोपियन गृहस्थानेंच उद्गार काढल्याचें सांगतात. हें भाषण झाल्याच्या दुसऱ्या दिवशीं प्रि. सेल्बीसाहेबांचें अभिनंदनपर पत्र आलें." (मनोरंजन— वसंत १९१५ पृ० ३६३.)

येथेंच गोखल्यांची प्रांतिक कायदे-कौन्सिलांतील कामगिरी संपली. १९०१ च्या आरंभींच प्रकृतीच्या अस्वाथ्यामुळें फेरोझशहा मेथांनीं वरिष्ठ कायदे-कौन्सिलांतील आपल्या जागेचा राजीनामा दिला व त्याजागीं गोखल्यांना एक मतानें निवडण्यांत आलें. ता. १२ एप्रिल १९०१ रोजीं डॉ. र. पु. परांजपे यांना पाठविलेल्या पत्रांत गोखल्यांनीं ही गोष्ट सांगितली आहे व म्हटलें आहे.—

"I am sensible that my colleagues in Council have conferred a great honour on me, but the responsibility is also great and I can only pray that I may be enabled to discharge the duties of my new position to the satisfaction of my friends and of the public."

सन १९०२ च्या सुरुवातीपासून ते १९१४ च्या अखेरीपर्यंत गोखले वरिष्ठ कायदेकौन्सिलचे सभासद होते. एवढीं वर्षें ते एकसारखे त्या जागेवर होते यावरून त्यांची कामगिरी किती उत्तम होत असेल याची कल्पना करावी. हिंदुस्थानांत कायदेकौन्सिलें स्थापन झाल्या दिवसापासून आजपर्यंत अनेक कायदेकौन्सिलाचे सभासद झाले आहेत, किंवा होतील परंतु गोखल्यांची सर कोणालाच येणें शक्य नाहीं. कायदेकौन्सिलचे सभासद होण्यासाठींच ते जन्माला आले होते असें म्हटलें तरीही चालेल. 'झाले

बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा ' हें कवीचें वर्णन या बाबतींत गोखल्यांना लावलें तर त्यांत बिलकूल अतिशयोक्ति होणार नाहीं. स्थलाभावामुळें या मनोवेधक कामागिरीचें त्रोटक विवेचन करूनच समाधान मानून घेणें भाग आहे, त्याला इलाज नाहीं.

गोखल्यांच्या कायदे कौन्सिलांतील कामगिरीचे बजेटांवरील भाषणें व त्याव्यतिरिक्त भाषणें असे दोन भाग पडतात. हीं बजेटांवरील भाषणें एकंदर अकरा असून त्यांनीं गोखल्यांच्या भाषणांच्या पुस्तकाचीं २०८ पृष्ठें व्यापिलीं आहेत! मोर्ले–मिंटो सुधारणांच्या पूर्वी कायदे कौन्सिलांतील सभासदांना फक्त बजेटाच्या चर्चेच्या वेळींच सर्व राज्यकारभारावर टीका करितां येत असे. ठराव व बिलें आणण्याचा अधिकार त्यांना नव्हता. यामुळें बजेटांवरील भाषणांचें महत्त्व फार आहे. पुढें सुधारणा अमलांत आल्यानंतर मिळालेल्या सवलतींचा फायदाही गोखल्यांनीं घेतला व त्या प्रसंगांचीं भाषणेंही विचारांत घेण्यासारखीं आहेत. तेव्हां प्रथम बजेटांचा विचार करूं.

हिंदी राष्ट्राच्या आर्थिक इतिहासांत विसाव्या शतकाच्या आरंभींचीं वर्षें फारच महत्त्वाचीं आहेत. हुंडणावळीच्या भावाची चलबिचल, दुष्काळ, लष्करी खर्चाची बेसुमार वाढ वगैरे आपत्तींना न जुमानतां १८९८ ते १९०३ पर्यंत हिंदी खजिन्यांत २२ कोटींची शिल्लक सांचली! १९०२ सालीं गोखल्यांनीं आपल्या पहिल्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें १९०१-०२ या एकाच वर्षांत सात कोटींची शिल्लक उरली. शिलकेची ही परंपरा १९०९ सालापर्यंत एकसारखी अव्याहतपणें चालली. लागोपाठ दहा वर्षें हिंदी खजिन्यांतील शिल्लक फुगत गेली पण या सर्व शिलकेचा वचपा म्हणूनच कीं काय १९०९ सालीं एकदम ५॥ कोटींची तूट आली. एकसारखी दहा वर्षें शिल्लक सांचत गेली, याचीं निरनिराळीं कारणें सरकार व गोखले दाखवीत. सरकार म्हणे कीं, शिल्लक उरते ती लोकांच्या वाढत्या संपन्नतेमुळें. हिंदुस्थानची भरभराट होत आहे याला दरवर्षी सांचणारी

शिल्लक हाच उत्तम पुरावा होय. पण गोखल्यांनीं हें म्हणणें आपल्या अंदाजपत्रकांवरील भाषणांतून खोडून काढलें आहे. त्यांनीं असें स्पष्ट दाखविलें कीं, रुपयाचा भाव १६ पेन्स असा ठरविल्यानें, जरूरीपेक्षां अधिक रक्कम रयतेकडून कराच्या रूपानें वसूल केल्यामुळें व जमेची बाजू मुद्दाम कमी व खर्चाची बाजू मुद्दाम जास्त दाखवीत गेल्यानें ही शिल्लक सांचत गेली. या शिल्लकेवरून जर कांहीं सिद्ध होत असेल तर ती सरकारची करडी द्रव्यासक्ति सिद्ध होते. हिंदुस्थानसरकारला विलायतेंत पाठवाव्या लागणाऱ्या रकमेंत हुंडणावळीच्या कृत्रिमभावानें बचत झाल्यामुळें, अफूचा वसूल वाढल्यामुळें, सर्वसामान्य वसुलाची रक्कम वाढल्यामुळें व रेल्वे खात्याच्या जमेंत सुधारणा झाल्यामुळें दहा वर्षांत शिलका सांचत गेल्या असें गोखल्यांनीं १९१० सालच्या भाषणांत स्पष्ट सांगितलें आहे. ( पृष्ठ १८६. )

शिल्लक उरत गेल्यामुळें सरकारनें उधळपट्टी वाढत्या प्रमाणांत सुरू केली. कर्झन साहेबांनीं सबंध राज्यकारभाराची उलथापालथ करून नवी घडी बसविण्याचा प्रयत्न केला, व त्यामुळें सहजच खर्च बेसुमार वाढला. गोखल्यांनीं याविरुद्ध खूपच तक्रार केली, पण प्रत्यक्ष तूट येईपर्यंत सरकारचे डोळे उघडले नाहींत. तूट आल्यावर काटकसरीची भाषा फडणवीस बोलूं लागले व या तुटीमुळें जर सरकारला काटकसरीचें महत्त्व पटलें असेल तर ही तूट म्हणजे आपत्ति नसून गुप्त वरच आहे असे उद्गार गोखल्यांनीं काढले! ( पृष्ठ १६९ ) काटकसर करून रयतेवरील कराचा बोजा हलका करा असा आग्रह गोखल्यांनीं धरला होता. या आग्रहामुळें सरकारनें १९०६ सालीं मिठाचा कर २॥ रु० होता तो २ रु० केला व प्राप्तीवरील कराची खालची मर्यादा ५०० रु० होती ती १००० रु० केली. कापडावरील जकात मात्र लँकेशायरच्या हितासाठीं सरकारनें नाहींशी केली नाहीं. मिठावरील कर आणखीही कमी करावा असा आग्रह गोखल्यांनीं १९०४ सालीं धरला. याच वेळीं त्यांनीं हिंदी कापडावरील जकात अजिबात उठविण्याविषयीं व वायव्य प्रांत, मद्रास व मुंबई या

इलाख्यांतील जमीनधाऱ्याचे दर कमी करण्याविषयीं आग्रह धरला. १९०५ सालीं मिठावरील कर १॥ रु. करण्यांत आला. १९०७ सालीं हा कर १ रु. करण्यांत आला. याशिवाय कांहीं किरकोळ कर कमी करण्यांत आले; पण ही परंपरा १९०९ सालींच थांबली व १९१० सालीं पुनः नवीन कर बसविण्यांत आले.

प्रत्यक्ष कर कमी किंवा जास्त बसविण्यासंबंधीं हें झालें. पण एवढ्यानेंच सरकारचें व सरकारच्या टीकाकारांचें काम संपत नाहीं. मिळणारा पैसा सरकारला खर्च करावा लागतो व तो योग्य रीतीनें खर्च होत आहे किंवा नाहीं हें टीकाकारांना पहावें लागतें. हें टीकाकाराचें अवघड काम गोखल्यांनीं फारच उत्तमपणें बजावलें याविषयीं वेळोवेळीं सरकारी सभासदांनींही कबुल्या दिल्या आहेत. शिल्लक उरलेले पैसे रेल्वे व सैन्य यांवर खर्च करण्याचा सरकारचा तडाखा असे. गोखल्यांनीं यावर सरकारला वारंवार असें सुचविलें कीं, रेल्वेवर खर्च प्रत्यक्ष शिलकेंतून करूं नये. रेल्वेचा विस्तार कर्ज काढून करावा. शिलकेचा विनियोग शिक्षण, आरोग्य, स्थानिक स्वराज्यसंस्थांना मदत, जमीनधारा कमी करणें वगैरे लोकोपयोगी गोष्टींकडे करण्यांत यावा. सैन्याच्या वाढत्या खर्चाचाही त्यांनीं असाच निषेध केला. दरवर्षीं या खर्चाविरुद्ध त्यांची तक्रार ऐकून सेनापतिसाहेब वैतागून गेले व पुनः पुनः तेंच तें ऐकण्याचा मला कंटाळा आला असे उद्गार त्यांनीं काढले. गोखल्यांनीं याला फारच उत्तम उत्तर दिलें. ते म्हणाले— " मी जर पुनः पुनः तेंच तें बोलूं नये असें सेनापतिसाहेबांना वाटत असेल, तर त्यांनीं मी सांगतों त्याप्रमाणें खर्च कमी करावा, म्हणजे मी बोलणार नाहीं ! " या पुनरुक्तीचा एकंदरीनें फारसा उपयोग झाला नाहीं तरी १९०७ सालीं ' आर्मी री ऑर्गनायझेशन स्कीम ' ची देणगी पांच लक्ष पौंडांनीं कमी करण्यांत आली.

१९०६ सालीं रेल्वे व इरिगेशन या खात्यांचा जमाखर्च ठोकळ न दाखवितां नक्की दाखविण्यांत यावा अशी सूचना गोखल्यांनीं केली होती. या दोन खात्यांपासून नक्की नफा किंवा तोटा किती होतो हें अंदाजपत्रकांत

नमूद केल्यानें लोकांची दिशाभूल होणार नाहीं म्हणून गोखल्यांनीं ही सूचना केली होती. सरकाराला हें म्हणणें पटून १९०७ च्या बजेटांत तशी सुधारणा करण्यांत आली, पण तीहि अर्धवट करण्यांत आली. शिलकेंतून पुढील सुधारणा कराव्या असें गोखल्यांनीं प्रतिपादन केलें— ( १ ) मद्रास, मुंबई, व संयुक्त प्रांत यांतील जमीनधारा कमी करणें, ( २ ) शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठीं सरकारनें सहकारी पतपेढ्या व बँका स्थापन करणें, ( ३ ) पाटबंधारे व शेतकीचें शास्त्रीय शिक्षण देणें, ( ४ ) व्यापारी व धंदेशिक्षणाची सोय करणें, ( ५ ) प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणें, व ( ६ ) पाणीपुरवठा व ड्रेनेज वगैरेंची सोय करून आरोग्य सुधारणें. वरिष्ठ सरकारनें प्रांतिक सरकारांना व स्थानिक स्वराज्यसंस्थांना अधिकाधिक स्वातंत्र्य द्यावें अशाविषयीं गोखले नेहमीं बोलत. हिंदी लोकांना वरिष्ठ जागांवर नेमण्यांत सरकारनें पक्षपात किंवा कंजुषपणा करूं नये असा त्यांचा नेहमींचा आग्रह असे, व याच हेतूनें त्यांनीं पब्लिक सर्व्हिस कमिशनचें काम अतिशय कळकळीनें केलें. हिंदी लोकांनीं आपल्याच देशांत केवळ ‘ पाणक्ये व लाकूडतोड्ये ’ होऊन दिवस कंठावे, ही स्थिति अत्यंत शोचनीय होय हें त्यांनीं सरकारला स्पष्ट बजावलें. हिंदुस्थानसरकार जातीनें परकी असलें तरी कृतीनें तें राष्ट्रीयच असलें पाहिजे, असा पथ्यकर उपदेश त्यांनीं सरकारला वारंवार केला.

बजेटांवरील भाषणांशिवाय कौन्सिलांत वेळोवेळीं केलेलीं सुमारें चाळीस भाषणें नटेसन यानीं प्रसिद्ध केलीं आहेत. यांतील कांहीं विशेष महत्त्वाचीं नाहींत म्हणून सोडून दिलीं म्हणजे सुमारें तीस भाषणांचा येथें विचार करणें भाग पडतें. १९१० पूर्वीं ठराव किंवा बिलें आणतां येत नव्हतीं; पण कर्झन साहेबांनीं लोकनियुक्त सभासदांना पुरून उरेल इतकें काम तयार करून ठेवलें होतें. ऑफिशियल सीक्रेट्स ॲक्ट, युनिव्हर्सिटीज ॲक्ट, युनिव्हर्सिटीज व्हॅलिडेशन ॲक्ट या सुप्रसिद्ध कायद्यांना विरोध करण्याचें काम गोखल्यांना करावें लागलें, व तें त्यांनीं उत्तम रीतीनें केलेंही. ‘ इंग्लिशमन ’ सारख्या ॲंग्लो-इंडियन पत्रानें देखील पहिल्या बिलाविरुद्ध मत

दिलें होतें. गोखल्यांनीं उपसूचना आणून, भाषणें करून, शक्य तेवढा विरोध केला. युनिव्हर्सिट्यांच्या कायद्याच्या बाबतींतही तोच प्रकार. कर्झनसाहेबांच्या या कृत्यानें उच्च शिक्षणाची पिच्छेहाट कशी होईल, युनिव्हर्सिट्या सरकारी संस्था कशा बनतील वगैरे गोष्टी मुद्देसूदपणानें सांगून गोखल्यांनीं या बिलाला विरोध केला. 'असंतुष्ट बी. ए.' नाहींसा करण्याचा मार्ग हा नव्हे हेंही गोखल्यांनीं सरकारला बजावलें. व्हॅलिडेशन ॲक्ट तर उघडउघड बेकायदेशीर कृत्यें कायदेशीर ठरविण्यासाठीं पास केलेला. त्याला गोखल्यांनीं विरोध केल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं. लॉर्ड कर्झन जाऊन लॉर्ड मिंटो आले. पण जुलमी कायद्यांचें सत्र चालूंच होतें. सभाबंदीचे वेळोवेळींचे कायदे, प्रेस ॲक्ट वगैरे कायद्यांविरुद्ध गोखल्यांनीं पराकाष्ठेचीं भाषणें केलीं. देशांत पसरलेला असंतोषाचा वणवा विझविणें असेल तर त्यावर राजकीय हक्कांचें पाणी ओतलें पाहिजे, दडपशाहीचे कायद्यांचें तेल ओतल्यास तो वणवा अधिकच भडकेल हें गोखल्यांनीं सरकाराला तीनतीनदां बजावून सांगितलें. सरकारचें हुकमी बहुमत असल्यामुळें या विरोधाचा केव्हांच परिणाम झाला नाहीं ही गोष्ट खरी असली तरी येथें अप्रस्तुत होय.

ठराव आणण्याचा हक्क मिळाल्यानंतर गोखल्यांनीं त्याचा चांगलाच फायदा घेतला. आज इतकीं वर्षे बजेटांच्या वेळीं त्यांच्याकडून ज्या सूचना सरकारास होत असत, त्यांपैकीं महत्त्वाच्या सूचना त्यांनीं ठरावांच्या रूपानें कौन्सिलपुढें मांडल्या. १९१० सालीं नवीन कर बसविण्याचें ठरल्यावर कोणत्या वस्तूंवर कर बसविणें आपल्या मताप्रमाणें इष्ट आहे हें त्यांनीं सांगितलें. तंबाखू, दारू, चांदी, व पेट्रोल यांच्यावर कर बसविण्याचें सरकारनें ठरविलें. गोखल्यांनीं चांदी व पेट्रोल यांच्या ऐवजीं साखरेवर आयात जकात व तागावर निर्गत जकात बसविण्याची शिफारस केली. अंदाजपत्रकांत उरणारी शिल्लक आरोग्यवर्धक कामांकडे खर्च करण्यांत यावी असाही त्यांनीं ठराव आणला. कर्जफेडीसाठीं राखून ठेवण्यांत येणारी रक्कम राखून ठेवूं नये अशीही शिफारस

गोखल्यांनीं केली. राज्यकारभाराचा वाढता खर्च तपासण्यासाठीं चौकशी कमिटी नेमण्याचा ठराव मांडतांना गोखल्यांनीं फारच महत्त्वाचें व विस्तृत भाषण केलें. या भाषणांत त्यांनीं १८७५ सालापासून खर्च वाढत कसा व कां गेला हें सप्रमाण दाखविलें व उधळेगिरी थांबणें जरूर आहे असें प्रतिपादन केलें. 'ओपियम फंड' स्थापन करावा म्हणून एक ठराव त्यांनीं आणला होता. मजुरांच्या मुलांची शिक्षणाची सोय कारखानदारानें करावी अशी उपसूचना ' इंडियन फॅक्टरीज ॲमेंडमेंट बिला ' ला त्यांनीं आणली होती. लॉर्ड इंचकेप यांनीं रेल्वेच्या कारभाराची केलेली चौकशी जाहीर करावी अशीही त्यांची एक मागणी होती. जिल्हानिहाय सल्लागार मंडळें स्थापन करण्यांत यावींत अशाविषयीं त्यांनीं १९१२ सालीं ठराव आणला होता. 'डिस्ट्रिक्ट ॲडव्हायसरी कौन्सिलस' ची कल्पना गोखल्यांनीं १९०५ सालींच बनारसच्या काँग्रेसच्या अध्यक्षाच्या पदावरून बोलून दाखविली होती. ( पृ० ७०६ ) व तिला मूर्त स्वरूप देण्याच्या उद्देशानें त्यांनीं हा ठराव आणला होता. पण त्यावेळीं तो १४ विरुद्ध ३२ इतक्या बहुमतानें नापास झाला. ( केसरी, ता० ५ मार्च १९१२ ) यानंतर बारा वर्षांनीं हाच ठराव मुंबईच्या सुधारलेल्या कायदेकौन्सिलापुढें नाशिकचे श्री० रामचंद्र गणेश प्रधान यांनीं आणला होता, पण याहि वेळीं तो ३१ विरुद्ध ५९ मतांनीं नामंजूर झाला. ( केसरी, ता० ५ ऑगस्ट १९२४ ). ठराव आणण्याचा हक्क मिळाल्यावर नाताळांत मुदतबंदीनें मजूर पाठविण्याचें बंद करावें अशा संबंधाचा ना० गोखले यांनीं पुढें आणलेला ठराव सरकारनें मान्य केला. हाच बहुधा गोखल्यांचा पहिला यशस्वी ठराव. यापुढें गोखल्यांनीं ठराव आणले तरी ते बहुतेक नापास तरी झाले किंवा परत तरी घेण्यांत आले. नवीन दिल्ली कर्ज काढून बांधावी, शिलकेंतून प्रांतिक सरकारांसाठीं रकमा राखून ठेवाव्या, स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या सांपत्तिक स्थितीची चौकशी करण्यांत यावी वगैरे ठराव त्यांनीं वेळोवेळीं मांडले. याशिवाय भूपेन्द्रनाथ बसूंनीं आणलेल्या विशिष्ट विवाहाच्या बिलाला व निमसरकारी वृत्तपत्रांना देण्यांत येणारी रक्कम कमी करण्यांत यावी या

ठरावाला, पंडित मदन मोहन मालवीयांच्या साखरेवरील आयात जकात वाढविण्याच्या ठरावाला, सुब्बाराव यांच्या पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमण्याच्या ठरावाला, मझरूल हक्क यांच्या ठरावाला गोखल्यांनीं दुजोरा दिला. लोकपक्षाची बाजू शक्य त्या रीतीनें सरकारपुढें मांडण्याची संधि गोखले मुळींच वाया जाऊं देत नसत.

पण गोखल्यांच्या कायदेकौन्सिलांतील कामगिरीचा कळस सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या बिलानें झाला. या बाबतींत त्यांनीं आधीं १९१० सालीं एक शिफारसवजा ठराव आणला व पुढल्या वर्षीं प्रत्यक्ष बिल आणलें. हें बिल सरकारनें एक वर्ष पुढें ढकललें व अखेर १९१२ सालीं तें नापास झालें. खुद्द गोखल्यांनीं हें बिल किती काळजीनें तयार केलें, त्यावर भाषण किती विद्वत्तापूर्ण केलें वगैरे गोष्टी येथें आम्ही सांगत नाहीं. शिक्षणाचा प्रश्न गोखल्यांना अत्यंत जिव्हाळ्याचा वाटत होता व या बिलावर त्यांनीं आपली सर्व करामत खर्च केली एवढेंच येथें सांगितलें म्हणजे पुरे. या प्रश्नाचा पुढचा इतिहास सांगावयाचा असल्यास तो थोडाच आहे. सर्व हिंदुस्थानापुरता हा प्रश्न अद्याप सुटला नाहीं. मुंबई इलाख्यांत मात्र ना. व्ही. जे. पटेल यांनीं जुन्या कौन्सिलांत हा प्रश्न तडीस नेला, व नव्या कौन्सिलांत शिक्षणमंत्री ना. डॉ. र. पु. परांजपे यांनींही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास करवून घेण्याचें श्रेय संपादन केलें.

गोखल्यांच्या कौन्सिलांतील कामगिरीचें याहून अधिक वर्णन करण्यास स्थलाभावामुळें सवड नाहीं. ना० प्रो० काळे यांनीं आपल्या Gokhale and Economic Reforms या पुस्तकांत दाखविल्याप्रमाणें गोखल्यांच्या कायदे कौन्सिलांतील कारकीर्दीचे खरोखरच पुढील तीन भाग पडतातः— (१) Initiation किंवा आरंभकाल, (२) Persistent and Effective किंवा परिणाम काल व (३) Commanding position किंवा मान्यतेचा काल. लॉर्ड कर्झन, लॉर्ड मिंटो व लॉर्ड हार्डिंज हे तीन व्हाइसरॉय अनुक्रमानें या तीन कालीं होते, व तिघांचींही कायदे कौन्सिलचे सभासद म्हणून गोखल्यांविषयीं फारच चांगलीं मतें होतीं.

लॉर्ड कर्झन यांनीं सी. आय. ई. हा किताब गोखल्यांना देऊन आपलें चांगलें मत व्यक्त केलें. लॉर्ड हार्डिंज यांनींही के. सी. आय. ई. साठीं गोखल्यांचें नांव सुचविलें होतें, गोखल्यांनीं ती पदवी स्वीकारली नाहीं ही गोष्ट वेगळी. सर गाय फ्लीटवुड विल्सन यांनीं गोखल्यांना ग्लॅडस्टनची उपमा देऊन ( Gokhale and Econ. Ref. page 231 ) गोखल्यांशिवाय बजेट म्हणजे डेन्मार्कच्या राजपुत्राशिवाय हॅम्लेट नाटक असे उद्गार काढले होते ! चिरोल साहेबांनींही नव्या कौन्सिलचें ( १९१० सालच्या) वर्णन करतांना गोखल्यांबद्दल जागोजागीं स्तुतिपूर्ण उद्गार काढले आहेत. ( Indian Unrest pages 163, 169 etc.) Joseph Chailley यानेंही गोखल्यांच्या वक्तृत्वामुळें, लॉर्ड कर्झन हे तात्पुरते गैरहजर असतांना, ऑफिशियल सीक्रेट्स बिलाच्या वेळीं, सरकारची तिरपीट उडाल्याचें नमूद केलें आहे. ( Administrative Problems of British India : 399 ) युनिव्हर्सिटीज बिलाच्या वेळीं लॉर्ड कर्झन हे न बोलण्याच्या निश्चयानें येऊन बसले असतां गोखल्यांचें भाषण ऐकून त्यांना आपला निश्चय बदलून भाषण करावें लागलें. ( Indian Nation Builders Part I : page 213 ) गोखल्यांची टीका नेहमीं सांधार असे. यामुळें कोणी त्यांना खोडून काढूं लागलें तर त्याला ते तावडतोब वळणावर आणीत. त्यांच्या बजेटांवरील भाषणांत याचीं दोन फारच मजेदार उदाहरणें सांपडतात. १९१० सालीं गोखल्यांनीं असें विधान केलें कीं, जमेच्या बाजूकडील कांहीं रकमा कमी दाखविल्या आहेत. ना० मि० मेस्टन यांना या विधानाचा राग येऊन त्यांनीं असें सांगितलें कीं, सरकारनें पुरविलेल्या माहितीवर खोटेपणाचा शिक्का मारणें हें चांगलें नव्हे. गोखल्यांनीं तावडतोब संधि मिळतांच पूर्वींच्या फडणविसांच्या भाषणांतून उतारे वाचून दाखवून आपलें म्हणणें सिद्ध केलें, व बाजू मेस्टन साहेबांच्या अंगावर उलटविली ( Speeches : pages 184-186 ). याचप्रमाणें १९११ सालीं ब्रह्मदेशाच्या आर्थिक स्थितीसंबंधानें गोखल्यांनीं काढलेले कांहीं उद्गार सहन न होऊन ब्रह्मदेशाचे प्रतिनिधि ना० मि० गेट्स यांनीं गोखल्यांना

एक टोमणा मारला. त्याला गोखल्यांनीं चांगलेंच खरपूस उत्तर दिलें! ( Speeches pages 193-196 ),

सरकारच्या दडपशाही कायद्यांना गोखल्यांनीं सर्रास विरोध केला, पण प्रेस आक्टाला त्यांनीं संमति दिली होती. देशांतील कांहीं वर्तमानपत्रें खरोखरच बेजबाबदार लिहीत होतीं, आणि खुद्द गोखल्यांना स्वतःच्या बाबतींत अशा वर्तमानपत्रांविरुद्ध दाद मागण्याकरितां १९०९ च्या सुमारास कोर्टांत जावें लागलें होतें. ( Indian Unrest : page 203 ) पण कायद्याची अंमलबजावणी नेहमींच चांगल्या रीतीनें होते असें नाहीं, या तत्त्वाचा अनुभव गोखल्यांना प्रेस ॲक्टाच्या बाबतींत आला व तो त्यांनीं १९११ सालीं सभाबंदीच्या कायद्याविरुद्ध भाषण करतांना सांगितला आहे. प्रेस ॲक्टाचा दुरुपयोग सर्वत्र—विशेषतः मुंबई इलाख्यांत—फारच झाल्यानें गोखल्यांसारख्यांची स्थिति फारच अनुकंपनीय झाली. गोखल्यांना यामुळें मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांची मुलाखत घ्यावी लागली व सर्व परिस्थिति त्यांच्यापुढें नीट मांडावी लागली. सर जॉर्ज क्लार्क यांना गोखल्यांचें म्हणणें पटून मग त्यांनीं या दुरुपयोगाला आळा घातला. ( Speeches : pages 324-326 ) ना० जिना यांनींही आपण प्रेस ॲक्टाला संमति दिली ही चूक केली असें १९१९ च्या पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढें साक्ष देतांना सांगितल्याचें नमूद आहे. ( विलायतचीं बातमीपत्रें : पृ. १०१ ).

मॉंटेग्यु-चेल्म्सफर्ड सुधारणा अमलांत येईपर्यंत कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांचें हमखास बहुमत कधींच नव्हतें. यामुळें लोकनियुक्त सभासदांच्या विरोधाचा किंवा दुजोऱ्याचा कांहींच दृश्य उपयोग होत नसे. गोखल्यांनीं इतके ठराव मांडले किंवा इतके वेळां विरोध केला म्हणून त्यांच्यासारखी बाजू झाली असें क्वचितच दिसतें. गोखल्यांनाही या गोष्टीची चांगलीच जाणीव होती. या जाणिवेचा निदर्शक असा एक त्यांच्याच भाषणांतील उतारा देऊन हें प्रकरण पुरें करूं. आपलें ‘ एलेमेंटरी एज्युकेशन बिल ’ नापास होणार हें जाणून गोखले म्हणतातः—

"My Lord, I know that my Bill will be thrown out before the day closes. I make no complaint. I shall not even feel depressed......... I have always felt and have often said that we, of the present generation in India, can only hope to serve our country by our failures. The men and women who will be priviledged to serve her by their successes will come later. We must be content to accept cheerfully the place that has been allotted to us in our onward march. This Bill, thrown out today, will come back again and again, till on the stepping-stones of its dead selves, a measure ultimately rises which will spread the light of knowledge throughout the land. It may be that this anticipation will not come true. It may be that our efforts may not conduce even indirectly to the promotion of the great cause which we all have at heart and that they may turn out after all to be nothing better than the mere ploughing of the sands of the sea-shore. But, my Lord, whatever fate awaits our labours, one thing is clear. We shall be entitled to feel that we have done our duty, and, where the call of duty is clear, it is better even to labour and fail, than not to labour at all."

या प्रकरणांत आम्ही गोखल्यांच्या भाषणांतील इतर उतारे दिले नसल्यामुळें या लांबलचक उताऱ्यानें त्यांची उणीव भरून येण्यास हरकत नाहीं. गोखल्यांच्या कायदे-कौन्सिलांतील कामगिरीचें रहस्य या उताऱ्यांत आहे असें म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं. कर्तव्य म्हणूनच गोखल्यांनीं हें काम केलें, व त्यामुळेंच त्यांची या कामाबद्दल जगभर प्रशंसा झाली.

## प्रकरण ६ वें.

# नामदार गोखले यांनीं स्थापिलेल्या संस्था.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडल्यानंतर गोखल्यांनीं तिच्याच तत्त्वावर दुसरी एक संस्था स्थापन केली. या संस्थेचा विशेष हा कीं, तिच्या कार्याचें क्षेत्र डे० ए० सोसायटीप्रमाणें मर्यादित नाहीं. स्वार्थत्यागाचें आणि कार्यप्रसाराचें जें तत्त्व डे० ए० सोसायटीच्या मुळाशीं आहे, तेंच तत्त्व 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी'च्या मुळाशीं आहे, याबद्दल गोखल्यांच्या सर्व अनुयायांचें एकमत आहे. जेसुइटांच्या ' येशूचे सेवक ' या संस्थेचा वृत्तांत वाचून गोखल्यांना अशी संस्था स्थापण्याची स्फूर्ति झाली, व तो विचार त्यांनीं १८९७ सालीं डॉ० परांजपे यांना इंग्लंडांत सांगितला. पुढें डे० ए० सो० सोडल्यावर त्यांनीं योग्य ती जुळवाजुळव करून ता० १२ जून १९०५ रोजीं ' सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी ' स्थापन केली. संस्थेच्या इमारतीच्या पायाचा दगड या दिवशीं गोखल्यांचे जुने सहकारी व रानड्यांचा परिचय करून देणारे उपकारी गृहस्थ कै० शिवराम हरी उर्फ आबासाहेब साठे यांनीं बसविला.

स्थापनेच्या वेळीं गोखल्यांनीं या संस्थेची उद्देशपत्रिका व घटना प्रसिद्ध केली आहे. हिंदी राजकारणाच्या इतिहासाला, इतका उदात्त हेतु मुळाशीं असणारी संस्था म्हणजे एक बहुमोल अलंकारच होय. या उद्देशपत्रिकेंत गोखले म्हणतातः— " हिंदी राजकीय प्रगति आतां इतकी झाली आहे, कीं यापुढें जाण्यास मिशनरी बाण्यानें सर्व जन्म जन्मभूमीला वाहाणारे कार्यकर्तेच पाहिजेत. आजपर्यंत झालेलें कार्य खरोखरच समाधानकारक आहे. गेल्या अर्धशतकांत एकराष्ट्रीयत्वासारख्या भावना चांगल्याच बळावल्या. आधीं हिंदी, मग हिंदु, मुसलमान, पार्शी, किंवा ख्रिश्चन अशी

भावना हळूहळू पसरूं लागली आहे. लोकांना काँग्रेससारख्या सभांचें महत्त्व हळूहळू पटूं लागलें आहे. ही कामगिरी खरोखरच वाखणण्यासारखी आहे. पण यापुढें कार्याचा व्याप व जबाबदारी वाढत जाणार म्हणून आजन्म जन्मभूमीला वाहून घेणारे स्वार्थत्यागी लोक तयार होणें फार जरूर आहे, आणि हें सिद्ध करण्याकरितांच ‘ सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी ’ स्थापन केली जात आहे. या संस्थेच्या सभासदांना हिंदुस्थानाचा इंग्लंडशीं आलेला संबंध हिंदुस्थानच्या हिताचा होईल अशी खात्री वाटते. इंग्रजी साम्राज्यान्तर्गत स्वराज्य हें या संस्थेचें ध्येय आहे. हें ध्येय हस्तगत होण्यासाठीं सार्वजनिक आयुष्यक्रम सात्त्विक झाला पाहिजे. देशसेवा हा धर्म आहे, अशी भावना बळावली पाहिजे. जन्मभर देशकार्याला वाहून घेणारे तरुण तयार करण्यासाठीं ही संस्था काढण्यांत येत आहे. या संस्थेचे सभासद पुढील कार्यें करण्याची खटपट करतील—( १ ) उदाहरणानें आणि शिकवणीनें, सामान्य लोकांत देशाविषयीं निस्सीमभक्ति उत्पन्न करणें; ( २ ) राजकीय शिक्षण व राजकीय चळवळी यांची पद्धतशीर व शिस्तवार संघटना करणें; ( ३ ) निरनिराळ्या समाजांमध्यें स्नेह व सहकार्य या भावना उत्पन्न करणें; ( ४ ) स्त्रियांच्या, मागासलेल्या वर्गांच्या, औद्योगिक आणि शास्त्रीय शिक्षणाला मदत करणें; ( ५ ) हिंदी राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला हातभार लावणें; आणि ( ६ ) अस्पृश्यवर्गांची उन्नति करणें. या संस्थेचा प्रत्येक सभासद पुढील सात शपथा पाळील—( १ ) माझ्या विचारांत व आचारांत माझ्या देशाला मी पहिलें स्थान देईन. माझ्याजवळ जें कांहीं उत्तमोत्तम असेल तें मी देशकार्यीं खर्च करीन. ( २ ) देशकार्य करतांना माझ्या स्वतःच्या फायद्याकडे मी पाहाणार नाहीं. ( ३ ) जात किंवा पंथ यांचा विचार न करतां सर्व हिंदवासीयांना बंधुभावानें लेखून त्यांच्या उन्नतीप्रीत्यर्थ मी झटेन. ( ४ ) स्वतःच्या व स्वतःच्या कुटुंबासाठीं सोसायटी जें वेतन देईल, तेवढ्यांतच मी संतुष्ट राहीन. माझ्यासाठीं पैसे मिळवावे या हेतूनें मी माझी शक्ति खर्च करणार नाहीं. ( ५ ) मी पवित्रपणें आयुष्य

करीन. ( ६ ) मी कोणाशीं भांडणार नाहीं. ( ७ ) सोसायटीचे उद्देश मी केव्हांही डोळ्याआड करणार नाहीं. सोसायटीच्या कार्यांत सदोदित मदत करीन आणि उद्देशांच्या विरुद्ध असें कोणतेंही कृत्य करणार नाहीं. "

सोसायटीची घटना, कामाचे नियम, वगैरे गोष्टी येथें देण्याचें मुळींच कारण नाहीं. संस्थेच्या स्थापनेच्या वेळीं फर्ग्युसन कॉलेज आणि सोसायटीची इमारत यांच्यामध्यें असणाऱ्या टेकड्यांवर दशदिशांस साक्ष ठेऊन श्रीयुत गोपाळ कृष्ण देवधर यांनीं गोपाळरावांपाशीं आपलें आयुष्य भरतभूच्या सेवेस अर्पण करण्याची शपथ घेतली. गोपाळराव देवधरांची कामगिरी खरोखरीच आपल्या गुरूला आणि शाळेला साजेशीच आहे. सोसायटीच्या सामाजिक कार्यांची प्रत्यक्ष मूर्ति म्हणजे गोपाळराव देवधर. स्त्रीशिक्षण, अस्पृश्योद्धार, सहकारी पतपेढ्या आणि मलबारांतील अनाथांच्या साहाय्यार्थ त्यांनीं नुकतीच बजावलेली प्रशंसनीय कामगिरी या गोष्टी हेंच दर्शवितात. श्री.नारायण मल्हार जोशी यांनीं मजुरांच्या प्रश्नाचा इतका सांगोपांग अभ्यास केला आहे व त्या बाबतींत त्यांची कामगिरी इतकी भरीव आहे कीं आंतर-राष्ट्रीय मजूरपरिषदेला हिंदी मजुरांचे प्रतिनिधि म्हणून ते हजर रहातात ! ही सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीची कामगिरी अभिमानास्पद नाहीं काय ?

गोखल्यांच्या पश्चात् सोसायटीचें धुरीणत्व ज्यांच्याकडे आलें, त्या नामदार श्रीनिवास शास्त्र्यांचा येथें अवश्य उल्लेख केला पाहिजे. खुद्द गोखल्यांनीं जो लौकिक संपादन केला, त्याहूनही एक प्रकारें अधिक लौकिक ना० शास्त्री यांनीं संपादन केला, याविषयीं दुमत होईल असें वाटत नाहीं. हिंदी राष्ट्राच्या राजकीय प्रगतीचीं सूत्रें इंग्लंडांतील जनतेच्या हातीं आहेत ही गोष्ट पटल्यामुळें गोखल्यांना जशा मोर्ले-मिंटो सुधारणांच्यावेळीं विलायतच्या खेपा कराव्या लागल्या, तशाच मॉंटफर्ड सुधारणांच्या वेळीं व पुढेंही शास्त्री यांना कराव्या लागल्या. आजही ते हिंदुस्थानाला अधिक राजकीय हक्क द्या असें सांगण्यासाठीं विलायतेला गेले आहेत. वसाहतींत हिंदी लोकांचे हाल होतात, ते चुकवावे ह्मणून गोखल्यांना दाक्षिण

आफ्रिकेला जावें लागलें; आणि त्याच हेतूमुळें शास्त्री यांनाहि बहुतेक सर्व जगभर प्रवास करावा लागला! केनियाप्रकरणीं हिंदी लोकांना अन्याय होतो हें सांगण्यासाठीं गतवर्षीच ते विलायतेस जाऊन आले. यावरून गोखल्यांच्या पश्चातहीं त्यांचें काम किती चोखपणानें चाललें आहे, व त्यांनीं स्थापन केलेल्या ' सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी ' चा राष्ट्राला कसा उपयोग होत आहे, हें कळून येईल.

मद्रास, नागपूर, अलाहाबाद, मुंबई वगैरे सारख्या प्रमुख शहरीं 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी 'च्या शाखा निघाल्या असून त्यांच्यांतून देशासाठीं स्वार्थसंन्यास करणारे तरुण बाहेर पडत आहेत. सर्वांगीण उन्नति हें ध्येय असल्यामुळें सभासदांना आवडीच्या विषयांत प्रावीण्य संपादन करून काम करतां येत असल्यामुळें देशाला फारच फायदा होतो. या संस्थेची हिंदी लोकांनीं तर स्तुति केलीच आहे; पण चिरोल, एच. डब्ल्यू. नेव्हिन्सन, मॉंटेग्यू वगैरेसारख्या गोऱ्या लोकांनींही या संस्थेची स्तुति करण्यास कमी केलें नाहीं. Indian Unrest या प्रसिद्ध पुस्तकांत चिरोल साहेबांनीं या संस्थेची माहिती सांगून अशी शंका प्रदर्शित केली आहे कीं, धार्मिक कार्यासाठीं संन्यास घेण्यास जसे हिंदी लोक तयार होतात, तसे आधिभौतिक कार्यासाठीं तयार होतील किंवा नाहीं; आणि या शंकेंत बरेंच स्वारस्यही आहे. पण आजपर्यंतच्या अनुभवावरून ही शंका दिवसेंदिवस निर्मूल होत जाईल असं वाटतें.

शेवटीं या संस्थेविषयीं एकच गोष्ट सांगून दुसऱ्या संस्थेकडे वळूं. १९१९ सालीं पार्लमेंटपुढें मॉंटफर्ड योजनांचा विचार चालू असतां, त्या कामासाठीं मुद्दाम नेमण्यांत आलेल्या जाइंट पार्लमेंटरी कमिटीपुढें ना. शास्त्री यांची साक्ष झाली. ही कमिटी ह्मणजे सुधारणा-बिलावरील सिलेक्ट-कमिटी असून तिच्यांत लॉर्ड सिडेनहॅम साहेब हे एक सभासद होते. ना. शास्त्री यांची उलटतपासणी करतांना सिडेनहॅम यांनीं शास्त्री यांस विचारलें कीं, 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' ही सर्वस्वी सामाजिक काम करणारी संस्था आहेना ? त्यावर ना. शास्त्री यांनीं ' नाहीं ' असा

जबाब दिला. पुन्हां साहेब म्हणाले कीं, 'ना. गोखल्यांनीं मला तसें सांगितल्याचें स्मरतें!' शास्त्री यांनीं उत्तर दिलें 'साहेब असें कसें म्हणतां? तुम्ही आमच्या सोसायटींत आलां, तुम्ही आम्ही मिळून चहा घेतला, आम्ही छात्रगण राजकीय विषयांचा अभ्यास करितों असें तुम्हांस सांगितलें, सर्वस्वी राजकीय विषयांवरचा असा सोसायटीचा मोठा ग्रंथसंग्रह तुम्हांला दाखविला आणि तुम्ही आम्हांला कांहीं पुस्तकेंही नजर केलींना?' असें सांगून ना. शास्त्री यांनीं लाटसाहेबांच्या गळ्यांत घोंगडें घातलें. तेव्हां 'मी तुम्हांस पुस्तकें दिलीं, पण तीं खास राजकीय विषयावरचीं नव्हतीं,' असा शेरा मारून लाटसाहेबांनीं त्यांतून आपली सुटका करून घेतली. (विलायतचीं बातमीपत्रें: पृ. १०३-४) हिंदुस्थानचे माजी फडनवीस सर गाय फ्लीटवुड विल्सन यांना गोखल्यांनीं सोसायटींत मेजवानी दिली त्यावेळची हकिकत सर्व प्रसिद्धच आहे. सर गाय विल्सन म्हणाले: "एका गोखल्यांना तोंड देणें आम्हांस दुष्कर झालें आहे. इतके गोखले जर तयार होणार असतील तर या देशांतून आम्हांला लवकरच पाय काढिला पाहिजे!" (ग. र. अ. कृ. गो. च.: पृ. ७८) सोसायटीच्या कामगिरीला आणखी कोणतें सर्टिफिकेट हवें?

'रानडे इंडस्ट्रियल अँड एकॉनामिक इन्स्टिटय़ूट' ही गोखले यांनीं स्थापन केलेली दुसरी संस्था होय. ही संस्था म्हणजे रानड्यांचें स्मारक होय, ही गोष्ट संस्थेच्या नांवावरून कळण्यासारखी आहे. १९०१ सालीं रानडे वारल्यावर सच्छिष्य या नात्यानें गोपाळरावांनीं रानड्यांच्या स्मारकासाठीं वर्गणी जमविण्यास सुरुवात केली. देशभर हिंडून एक लक्ष रुपये गोळा केले. मुंबईला रानड्यांचा पुतळा आणि मद्रासला रानडेलायब्ररी अशीं स्मारकें पूर्वींच झालीं होतीं. १९०१ सालींच मुंबईस गव्हर्नरसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं रानड्यांच्या स्मारकाचा विचार करण्यासाठीं सभा भरून तिच्यांत गोखल्यांचें भाषण झालें होतें; आणि मद्रासचें स्मारक तर गोखल्यांनींच उघडलें. पण रानड्यांना ज्या शहराविषयीं अत्यंत अभिमान आणि प्रेम वाटे अशा पुणें शहरीं त्यांचें अपूर्व स्मारक करून दाखविण्याची

गोखल्यानीं उमेद धरली, आणि आनंदाची गोष्ट ही कीं, तिच्यांत त्यांना यशही आलें. स्मारकाला औद्योगिक संस्थेचें स्वरूप दिल्यामुळें एकलक्ष रुपये हा निधि अपुरा पडला, आणि त्याचा परिणाम आज असा दिसत आहे कीं, संस्था जवळ जवळ बंद आहे. पण हा दोष केव्हांही गोखल्यांचा नव्हे. महाराष्ट्रांत स्मारकासाठीं इतकी मोठी रक्कम यापूर्वीं जमा झाली नव्हती. ही अशक्य गोष्ट शक्य करून गोखल्यांनीं एक नमुनेदार औद्योगिक संस्था स्थापन केली हाच त्यांचा मोठेपणा होय. सन १९१० च्या सप्टेंबरांत मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांनीं ही संस्था उघडली. त्यावेळींच गोखल्यांनीं सरकाराकडे व म्युनिसिपालिट्या आणि लोकलबोर्डें यांच्याकडे मदतीसाठीं विनंति केली. पण ही मदत फारशी न मिळाल्यामुळें आज संस्थेला फारसें काम करून दाखवितां येत नाहीं. मिरजेच्या अधिपतींनीं या संस्थेला दरसाल सुमारें हजार पंधराशें रुपयांची देणगी देण्याचें कबूल केलें आहे असें संस्था उघडतांना गव्हर्नरसाहेबांनीं जाहीर केलें; पण सरकार अमुक इतकी मदत करील असें मात्र आश्वासन त्यांनीं दिलें नाहीं ! तें कसेंही असो. महाराष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीप्रीत्यर्थ थोडीफार कामगिरी करणारी "अशा प्रकाराची बीजभूत संस्था निर्माण करून तिच्या द्वारें लोकसेवेच्या कळकळी-प्रमाणेंच आपल्या अलौकिक गुरुभक्तीसही भूषणभूत असें माधवरावजी रानड्यांचें स्मारक सिद्ध केल्याबद्दल ना० गोखले यांचें अभिनंदन करून" केसरीकारांप्रमाणेंच ( केसरी, ता० २०-९-१९१० ) आम्हीही या संस्थेची हकीकत संपवितों.

हें प्रकरण संपविण्यापूर्वीं गोखल्यांच्या वर्तमानपत्रांविषयीं थोडेंसें लिहिलें पाहिजे. पुण्यांतील सर्वांत जुनें वर्तमानपत्र 'ज्ञानप्रकाश' हें गोखल्यांनीं सोसायटीच्या मालकीचें केलें. गोखल्यांच्या मृत्यूनंतर ना० शास्त्री यांनीं १९१८ सालीं 'सर्व्हंट ऑफ इंडिया' हें पत्र काढलें व नागपूरला रा० न० अ० द्रवीड यांनीं 'हितवाद' पत्र चालविलें आहे. हितवाद, मुंबईवैभव व आर्यभूषण हे छापखानेही सोसायटीच्या मालकीचे आहेत. हीं वर्तमानपत्रें धंद्यासाठीं चालविलीं जात नसून मतप्रसारासाठीं चालविलीं जातात; व

म्हणून त्यांच्यापासून सोसायटीला फायदा होत नाहीं. (A brief account of the work of the Servants of India Society. From 1st January 1917 to 30th June 1923, page 45).

ता. २५ मे सन १९२६ रोजीं भर दोनप्रहरीं ज्ञानप्रकाश व आर्यभूषण छापखाने असलेल्या इतिहासप्रसिद्ध किबेवाड्याला भयंकर आग लागली. गेल्या पंचेचाळीस वर्षांत असा विलक्षण अग्निप्रलय पुण्यांत झाला नव्हता असें सांगतात. या आगीनें सरदार किबे यांचें, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचें, व महाराष्ट्रांतील अनेक लेखकांचें अपरिमित नुकसान झालें. अनेक महत्त्वाचे कागदपत्र, जुन्या व दुर्मिळ फायली, सुप्रसिद्ध इंग्रजी, मराठी, व संस्कृत ग्रंथांच्या हजारों प्रती अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडल्या. पण नामदार गोखले यांच्या पुण्याईनें सर्व भारतवर्ष पक्षभेद विसरून सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या मदतीला धांवून आला, व केवळ दोनच महिन्यांच्या अवधींत एक लक्षावर रुपये गोळा झाले. हा मदत फंड गोळा करण्याचें काम अझून चालूंच असून जरूर ती रक्कम लवकरच जमेल यांत संशय नाहीं.

---

## प्रकरण ७ वें.

# इतर किरकोळ कामगिऱ्या.

सन १८८८ सालीं आगरकरांनीं आपला ‘ सुधारक ’ सुरू केला. आगरकरांना ‘ सुधारक ’ कां सुरू करावा लागला याचीं कारणें येथें देण्याची जरूरी नाहीं, तीं सर्व प्रसिद्ध आहेत. या कामांत गोखल्यांचें त्यांना सहाय्य होतें एवढेंच येथें दाखवावयाचें आहे. गोखल्यांचा इंग्रजी लिहिण्याकडे व बोलण्याकडे कल फार यामुळें आगरकरांनीं ‘ सुधारकां ’ त दोन्ही भाषांतील मजकूर घालण्याचें ठरविलें. आगरकर स्वतः मराठी ‘ सुधारका ’ चे

संपादक बनले, आणि गोखले इंग्रजी ' सुधारका ' चे संपादक झाले. यापूर्वी गोखल्यांनीं ' मराठा ' पत्रांत General War in Europe नांवाची एक लेखमाला लिहिली होती, व ती त्यावेळीं लोकप्रिय झाली होती, असें त्यांचे चरित्रकार सांगतात. कांहीं दिवस त्यांनीं ' केसरी ' तील वर्तमानसाराचें काम केलें होतें असेंही सांगण्यांत येतें. ' सुधारका ' च्या सुरुवातीला आगरकरांनीं श्रीयुत सीताराम गणेश देवधर यांना लिहिलेलीं पत्रें देवधरांनीं मनोरंजनाच्या आगरकर अंकांत प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांवरून असें कळतें कीं, पहिल्या वर्षी 'सुधारका' ला सारे ६५० वर्गणीदार मिळाले व साल अखेर खर्चवेंच जातां शिल्लक फक्त ६० रुपये उरली ! तरीही आगरकर व गोखले यांनीं ' Labour of Love ' म्हणून हें काम करण्याचें ठरवून ' सुधारका ' ची वर्गणी कमी केली. गोखले इंग्रजींत लेख लिहीत ते बहुधा सामाजिक विषयांवर नसत ; सामाजिक विषय आगरकरच लिहीत. वैचित्र्याच्या दृष्टीनें ही गोष्ट इष्ट अशीच होती. गोखल्यांना राजकारणाची आवड असल्यामुळें त्यांचा भर राजकीय विषयांवर असे. " Shame, shame, my Lord, shame ! या मथळ्याखालीं आलेला त्यांचा सुधारकांतील लेख खुद्द लॉर्ड रेसाहेबांना इतका आवडल्याचें सांगतात कीं, ते स्वतः सुधारकाचे तेव्हांपासून वर्गणीदार झाले. " ( व० अं० पृ० ३४० ) गोखल्यांनीं ' सुधारकां ' त क्रिकेटवर लेख लिहिल्याचें पटवर्धन सांगतात. पुढें पुढें गोखल्यांचा कामाचा व्याप वाढत चालला, यामुळें त्यांना ' सुधारक ' सुमारें चार वर्षांनीं सोडावा लागला. ' सुधारकाच्या ' पुढील इतिहासाशीं आपणांस येथें कांहीं कर्तव्य नाहीं. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत गोखले हे उदासीन व तटस्थ कां असत याची चर्चा दुसरीकडे केलीच आहे.

' सुधारका ' पेक्षां ' सार्वजनिक सभे ' च्या त्रैमासिकाशीं संपादक या नात्यानें गोखल्यांचा संबंध अधिक आला. १८८८ च्या सुमारासच ते या त्रैमासिकाचे संपादक झाले. यापूर्वीचे संपादक व सभेचे चिटणीस सीतारामपंत चिपळूणकर यांचें व सभेचें क्रॉफर्ड प्रकरणाच्या बाबतींत जुळेना म्हणून

त्यांना सभा सोडावी लागली, आणि त्यांची जागा गोखल्यांना मिळाली. याचवेळीं, टिळकांनीं गोखल्यांना विरोध करण्याचा प्रयत्न केला; पण सोसायटींत व सभेंत दोनही ठिकाणीं बहुमत नसल्यामुळें तो फसला. पुढें टिळकांनीं सोसायटी सोडली, आणि सार्वजनिक सभेंत आपलें बहुमत करण्याचा प्रयत्न केला. अखेर या प्रयत्नाला रानडे पुण्याहून बदलून मुंबईस गेल्यावर यश आलें; आणि ता० १४ जुलै १८९५ रोजीं भरलेल्या सार्वजनिक सभेच्या वार्षिक सभेंत गोखलेपक्षाचा पराभव झाला. गोखलेपक्षाचे विष्णु मोरेश्वर भिडे, भाऊसाहेब नातू, शिवराम हरी साठे व विष्णुपंत करंदीकर यांना काढून टिळकांनीं त्यांच्या जागीं आपल्या पक्षाचीं माणसें नेमलीं; पण मुख्य चिटणीस गोपाळराव गोखले यांना तसेंच चिटणिशीच्या जागेवर कायम ठेवलें. पण हा टिळकांचा निवळ कावा होता हें त्यांच्या चरित्रकारांनींच कबूल केलें आहे. अशा परिस्थितींत गोखल्यांनीं १८९६ च्या मार्चपासून रजा घेतली, आणि पुढें त्याच वर्षाच्या आगष्ट महिन्यांत रीतसर राजीनामा दिला. या अधिकारक्रांतीमुळें उभयपक्षांतील वर्तमानपत्रांत वादाचें रण माजलें; तेव्हां खुलाशासाठीं गोखल्यांनीं १८९५ सालीं एक व १८९६ सालीं एक अशीं दोन पत्रें केसरीला पाठविलीं. पहिल्या पत्रांत त्यांनीं टिळकपक्षावर फसविण्याचा आरोप केला व चिपळूणकरांसारखें काम माझ्या हातून होणार नाहीं हें मीं आधींच सांगितलें होतें असें सांगितलें. दुसऱ्या पत्रांत त्यांनीं स्वतःच्या संपादकीय कामाचा आढावा दिला होता. प्रत्येक अंकांत बहुधा दोन आर्टिकलें येत व जेव्हां गोखले लिहीत नसत तेव्हां ते रानडे, गणेश व्यंकटेश जोशी वगैरेंकडून लिहवून घेत. गोखल्यांकडे संपादकीय काम आलें तेव्हां एकंदर वर्गणीदार ५०० होते, पण त्यांतले सुमारें २५० नुसते नामधारी होते. त्यांनीं हें काम सोडलें तेव्हां फक्त २५० वर्गणीदारांकडे अंक रवाना झाला होता. वर्गणी दिवसेंदिवस कमी वसूल होत होती. पण टिळकांचें एवढ्या खुलाशानें समाधान न होतां त्यांनीं आंकडेगिरी लढविली. त्यांनीं सांगितलें कीं, गोखल्यांनीं त्रैमासिकाचे एकंदर २६ अंक काढले. त्यांत ४९ स्वतंत्र लेख होते. पण त्यांपैकीं ९

पेक्षां अधिक लेख गोखल्यांचे स्वतःचे नव्हते. ही माहिती गोखल्यांना दोष देण्याकरितां टिळकांनीं सांगितली; पण पुढें स्वतः त्यांनीं सभेचें वाटोळेंच केलें हा टिळकांचा मोठा दोषच होय. अशा रीतीनें गोखल्यांचा दोष व टिळकांचा दोष यांचा परस्पर छेद उडाला म्हणजे टिळकांच्या स्वतःच्या कबुलीनेंच गोखल्यांची कामगिरी टिळकांच्या कामगिरीपेक्षां भरींव व श्रेष्ठ ठरते !

'सार्वजनिक सभा' हातची गेल्यावर गोखल्यांची कामाची हौस व तरतरी फुकट जाऊं नये म्हणून रानड्यांनीं १८९६ च्या नोव्हेंबरांत 'डेक्कन सभा' स्थापन केली; व गोखले तिचे चिटणीस झाले. खुद्द पुणेंशहरांत आतां पक्षभेद उघड उघड झाले होते, आणि प्रत्येक पक्षाला आपल्या हेतूप्रमाणें काम करण्यास स्वतंत्र संस्था पाहिजेच होत्या. या सभेचें उद्देशपत्रक खुद्द रानड्यांनीं लिहिलें होतें व त्यांच्याच शब्दांत कांहीं उद्देश सांगणें बरें. रानडे म्हणतात Liberalism म्हणजे उदारमतवादित्व व Moderation म्हणजे नेमस्तपणा हे या सभेचे हेतु आहेत. उदारमतवादित्वाची व्याख्या रानड्यांनीं अशी केली आहे:—

"The spirit cf Liberalism implies a freedom from race and creed prejudices and a steady devotion to all that seeks to do justice between man and man, giving to the rulers the loyalty that is due to the law they are bound to administer but securing at the same time to the ruled the equality which is their right under the law."

राजकीय काय किंवा इतर कोणतेंहि काय, शिक्षण म्हटलें कीं त्याचा अंतिम हेतु उत्तम नागरिक तयार करण्याचा असला पाहिजे असें रानड्यांनीं या उद्देशपत्रिकेंत म्हटलें होतें. असो. गोखले या सभेचे चिटणीस म्हणूनच वेल्बी कमिशनपुढें साक्षीस गेले होते. १९२२-२३ सालीं या सभेचे एकंदर २०० सभासद होते. (Excise Committee's Report. Vol. II. page 200). डॉ० र० पु० परांजपे

यांनीं म्हटल्याप्रमाणें ( Page 37. ) सार्वजनिक सभेप्रमाणें डेक्कन सभेला लोकांत व सरकारदरबारीं फारशी मान्यता मिळाली नाहीं हें खरें, पण याचें कारण मात्र डेक्कन सभेची कामगिरी वाईट होती हें नसून, अशा कामगिरीकडे कौतुकबुद्धीनें पाहाण्याची सरकारची दृष्टि कमी किंबहुना अजिबात बंद झाली हेंच होय. बाकी निरानिराळया प्रश्नांवर लोकमत जागृत करणें व ठराव करून सरकारला कळविणें, कमिशनें व कमिट्या यांच्यापुढें साक्षीपुरावा देणें, वेळोवेळीं विलायतेला शिष्टमंडळें पाठविणें वगैरे महत्त्वाचीं कामें डेक्कन सभा एकसारखी करीतच आहे. आज जें कांहीं महत्त्व या सभेला प्राप्त झालें आहे तें सर्व गोखल्यांमुळेंच प्राप्त झालें आहे, याबद्दल मतभेद होईल असें वाटत नाहीं.

प्लेगच्या भयंकर सांथीपासून गरीब लोकांचें संरक्षण करण्यासाठीं इनाक्युलेशनचा प्रसार करण्याचा गोखल्यांनीं १८९८ सालीं प्रयत्न केला. इनॉक्युलेशन अत्यंत अप्रिय असल्यामुळें लोकांचीं मनें वळविण्याचें काम फारच अवघड होतें. पण हें काम स्वयंसेवकांच्या मदतीनें करून गोखल्यांनीं त्यावेळचे प्लेग ऑफिसर कर्नल क्रेग ( पुढें हिंदुस्थानचे सेनापति सर ओमूर क्रेग ) यांच्यापासून शाबासकी मिळविली. इनॉक्युलेशनची योग्यायोग्यता ठरविण्यासाठीं १९०० सालीं सरकारनें एक प्लेग कमिशन नेमलें. इनॉक्युलेशनचा प्रसार होत असतां लोकांनीं अनेक तक्रारी केल्या, त्या तक्रारींचा विचार करून इनॉक्युलेशनवर मान्यतेचा शिक्का मारण्याचें काम या कमिशनकडे होतें. निरनिराळ्या जिल्ह्यांत हिंडून या कमिशननें तक्रारी ऐकल्या. गोखले हे या कमिशनचे सभासद होते, व त्यांनीं आपलें काम काळजीनें बजावलें.

पुणें म्युनिसिपालिटीमध्येंही गोखल्यांनीं काम केलें आहे. या म्युनिसिपालिटीचे अध्यक्षही ते पांच वर्षें होते. ( Speeches : p. 353 ) त्यांच्या अमदानींत " म्युनिसिपालिटीच्या सभा नियमित भरूं लागल्या. कामाचा निकाल शिस्तीनें व जलदीनें होऊं लागला. सभासदांनीं म्युनिसिपालिटीच्या कार्यकारी मंडळीस प्रश्न विचारण्याचा प्रघात याचवेळीं पडला,

व कमिटीच्या कामाचा अहवाल छापून तो सभासदांना वांटण्याचा क्रम सुरू झाला. " ( ग० र० अ० गो० च० पृ० १८ ) पण गोखल्यांनींच सांगितल्याप्रमाणें म्युनिसिपालिटीची सांपत्तिक स्थिति त्यावेळीं फारच खालावलेली असल्यामुळें विशेष काम होऊं शकलें नाहीं. ( Speeches: pp. 98, 353 ) पण याचा दोष केव्हांही गोखल्यांकडे नाहीं.

मुंबई युनिव्हर्सिटींतील त्यांची कामगिरी यापेक्षां अधिक भरींव आहे. ते जवळजवळ वीस वर्षे फेलो असून एक वर्ष सिंडिकेटचे सभासद होते. लॉर्ड सिडेनहॅम यांच्या इतिहास अभ्यासक्रमांतून काढून टाकण्याच्या प्रतिगामी धोरणाचा त्यांनीं जोराचा निषेध केला. हल्लींचा बी. ए. व एम. ए. या दोन परीक्षांचा इतिहास व अर्थशास्त्र यांचा अभ्यासक्रम गोखल्यांच्या सूचनांप्रमाणें तयार करण्यांत आला आहे. Politicsचा समावेश बी. ए. च्या अभ्यासक्रमांत झाला, त्याचें खरें श्रेय गोखल्यांनाच दिलें पाहिजे. इंग्रजी, इतिहास, व अर्थशास्त्र या विषयांत ते युनिव्हर्सिटीचे परीक्षक बरींच वर्षें होते. कौन्सिलांत युनिव्हर्सिटीसंबंधानें त्यांनीं केलेली कामागिरी दुसरीकडे दिलीच आहे.

१९०८ च्या सुमारास नेमण्यांत आलेल्या अधिकारविभागणी कमिशन-पुढें गोखल्यांनीं साक्ष दिली. या साक्षींत त्यांनीं वरिष्ठ सरकारापासून तों अगदीं खालीं जिल्ह्यापर्यंत अधिकारविभागणीचें तत्त्व कसें अमलांत आणतां येईल हें सयुक्तिक रीतीनें दाखवून दिलें आहे. पब्लिक सर्व्हिसचें इसलिंग्टन कमिशन व वेल्बी कमिशन यांचा उल्लेख दुसरीकडे करण्यांत आलेलाच आहे.

मार्ले-मिंटो सुधारणांच्यावेळीं जशी गोखल्यांनीं आपली एक सुधारणांची योजना तयार केली होती, तशीच मरणापूर्वीं थोडे दिवस त्यांनीं आणखी एक सुधारणांची योजना ना. आगाखान यांच्या विचारानें तयार केली होती. या योजनेचा इतिहास बराचसा मनोरंजक आहे. महायुद्ध सुरू झाल्यानंतर देशांत राजकीय असंतोष माजला. या असंतोषाचा बींमोड करण्यासाठीं सरकारानें आपण होऊन कोणकोणत्या सुधारणा कराव्या, त्या तुम्ही तयार करून द्या असें त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांनीं

गोखल्याना सागितलें. या विनंतीला मान देऊन गोखल्यांनीं ही योजना तयार केली. प्रत्यक्ष मृत्यूपूर्वी तीन दिवस गोखले या कामांत गुंतले होते असें सांगतात ( ग० र० अ० गो० च० पृ० २६ ). या योजनेंत त्यांनीं प्रांतिक स्वराज्याची मागणी केलेली आहे. पूर्ण प्रांतिक स्वायत्तता अद्यापिही आपणांस मिळाली नाहीं, ही एकच गोष्ट या योजनेचें महत्त्व दाखविण्यास पुरेशी आहे.

अस्पृश्योद्धाराचा प्रश्न गोखल्यांनीं हातीं घेतल्याचें चिरोल साहेब सांगतात. ( Indian Unrest : p. 181 ). १९०३ च्या सामाजिक परिषदेंत गोखल्यांनीं अस्पृश्योद्धाराचा ठराव मांडला होता. ही परिषद त्या वर्षी धारवाडला भरली होती. सामाजिक सुधारणेंत गोखल्यांनीं प्रत्यक्ष भाग फारसा घेतला नसल्यामुळें या त्यांच्या कामगिरीचें विशेष कौतुक करावेंसें वाटतें. सामाजिक बाबतींत ते उदासीन कां असत याचें विवेचन दुसरीकडे केलें आहे.

या ठिकाणीं प्रस्तुत निबंधाचा दुसरा भाग पूर्ण झाला. पहिल्या प्रकरणांत गोखल्यांचें चरित्र ( Life ) देऊन, दुसऱ्या, तिसऱ्या, चवथ्या, पांचव्या, सहाव्या व सातव्या प्रकरणांत त्यांची विविध कामगिरी ( Career ) वर्णन केली. पुढील उरलेल्या भागांत ध्येयां ( Ideals ) चें वर्णन करून उपसंहार करण्याचा विचार आहे. निबंधाला प्रकरणांचें स्वरूप देण्यांत हेतु असा कीं, निरनिराळे मुद्दे व्यवस्थित रीतीनें निरनिराळ्या प्रकरणांच्या रूपानें मांडले जावे. या ग्रंथांतील एकेक प्रकरण ह्मणजे वस्तुतः 'The Life, Career, and ideals of Gopal Krishna Gokhale' या निबंधाचा एकेक मुद्दाच होय. असो. कामगिरीचा अंक येथेंच संपवून नव्या अंकाला सुरुवात करूं.

## प्रकरण ८ वें.

# स्वभाव, मतें, ध्येयें, वगैरे.

मागील प्रकरणांतून गोखल्यांची विविध कामगिरी वर्णिल्यानंतर खरें बोलावयाचें म्हणजे ध्येयविवेचनासाठीं निराळें प्रकरण लिहिण्याची जरूर नाहीं. कांहीं एक ध्येय पुढें ठेऊन गोखल्यांनीं कामगिरी केली. अर्थात् ध्येयाप्रमाणें कामगिरी वठणार. ह्मणून कामगिरी वर्णन केली ह्मणजे ध्येयाचें वर्णन आपोआप झालेंच. आचाराचें वर्णन केलें ह्मणजे तेवढ्यावरून मनुष्याचे विचार कळण्यास अडचण पडूं नये. पण विचारांचेंही स्पष्ट वर्णन असल्यास त्या मनुष्याची माहिती अधिक बिनचूक होते यांत शंका नाहीं.

हे विचार बनण्यास स्वभाव व संगति कारणीभूत होतात. गोखल्यांना आधीं टिळक-आगरकर व पुढें रानडे-मेथा यांची संगति होती. या संगतीचा त्यांच्यावर काय परिणाम झाला तें या निबंधांत वर्णिलेल्या त्यांच्या आयुष्यक्रमावरून व कामगिऱ्यांवरून कळून येईल. येथें गोखल्यांच्या स्वभावाचें थोडेसें वर्णन करण्याचा विचार आहे. प्रो० वा० ब० पटवर्धनांनीं मनोरंजनांत ज्या गोष्टी दिल्या आहेत, त्यांवरून गोखल्यांचा स्वभाव फारच चांगला दिसून येतो. गोखले मानी, कष्टाळू, सरळ मनाचे व भोळ्या स्वभावाचे होते. त्यांचा मानीपणा खाणावळींतल्या गोष्टीवरून दिसून येतो. ‘ चाराचें जेवणार, आणि दहीं मागणार! ’ हा टोमणा त्यांना वर्मीं लागला. त्यांच्या कष्टाळूपणाविषयीं तर बोलावें तितकें कमीच होणार. किंबहुना हा गुण त्यांच्याजवळ नसता तर त्यांचें चारित्रच असें झालें नसतें. त्यांना जो मोठेपणा प्राप्त झाला तो स्वयंसिद्ध नसून सर्वस्वीं कष्टसिद्ध होता. जन्मतः त्यांना अलौकिक बुद्धिमत्ता नव्हती, पण श्रमांच्या जोरावर त्यांनीं ही उणीव भरून काढली. रानड्यांसारख्या कांटेकोर गुरूकडून त्यांनीं शाबासकी मिळविली ती केवळ श्रमांच्या जोरावर. आज महाराष्ट्रीयांचा

इंग्रजी वक्तृत्वाबद्दल जो लौकिक आहे तो केवळ गोखल्यांमुळें. हें वक्तृत्व गोखल्यांनीं किती श्रम करून पैदा केलें याची कल्पना देखील आज कित्येकांना होणार नाहीं. इंग्रजी भाषेंतील नामांकित ग्रंथकारांचे ग्रंथ मुखोद्गत करूनच ते थांबले नाहींत, तर आरंभीं कित्येक वर्षें ते प्रत्येक भाषण आधीं लिहून काढून पाठ करीत असत! आंकडेगिरींत त्यांनीं प्रावीण्य संपादन केलें तेही श्रमांमुळेंच. सरळपणाचें उदाहरण त्यांच्या एका लहानपणच्या गोष्टींत दिसतें. मास्तरानें उदाहरण बरोबर केल्याबद्दल पहिला नंबर दिला हें पाहून गोपाळराव रडूं लागले. कारण तें त्यांनीं दुसऱ्याकडून करवून आणलें होतें! हाच मनाचा सात्विकपणा शेवटपर्यंत त्यांच्यांत होता. भोळेपणाचीं उदाहरणें तर वाटतील तितकीं देतां येतील. वर्गांत मुलांनीं केलेली थट्टा न समजणें, किंवा ‘तयार झाल्यावर खारट लागणारें आइस्क्रीम (?) गोड लागेल’ या उत्तरावर विश्वास ठेवणें वगैरे उदाहरणें भोळेपणाचीं निदर्शक होत. भोळेपणा व मनुष्यस्वभावाचें मार्मिक ज्ञान हीं दोन केव्हांही एकत्र रहात नाहींत. गोखल्यांजवळ मनुष्यस्वभावाचें मार्मिक ज्ञान नव्हतें. त्यामुळें त्यांना बरेच वेळां फसण्याचे प्रसंग आले. १९१४ सालच्या समेटाच्या वेळीं भोळेपणानें गोखले कसे फसले हें मागें सांगितलेंच आहे.

गोखल्यांच्या भावना अत्यंत नाजूक असत. टीकाकारांच्या टीकांमुळें त्यांना अत्यंत त्रास होई. परदुःख त्यांना सहसा पाहवत नसे. दुसऱ्याला दुखविणें त्यांच्या जिवावर येई. पण त्यांचे कांहीं दुराग्रहहि बलवत्तर असत. तूप न खाण्याचा असाच त्यांचा एक दुराग्रह होता. घायकूत, उतावळी, हा एक त्यांचा दुर्गुण होता. एकदां कां एखादी गोष्ट त्यांच्या मतानें घेतली कीं तिचा कांहीं वेळ सारखा पिच्छा पुरवायचा अशी त्यांना संवय असे. यामुळें त्यांना फार त्रास होई, व पुढें पुढें त्यांनीं हा दुर्गुण आटोक्यांत आणला होता.

गोखल्यांच्या सात्विक स्वभावाचें व नाजूक मनोभावनांचें निदर्शक असें एक ठळक उदाहरण येथें सांगितलें पाहिजे. त्यांचा दुसरा विवाह कोणत्या

परिस्थितींत झाला हें मागें सांगितलेंच आहे. या बाबतींत आपण चुकलों अशी जाणीव एक सारखी त्यांना टोंचीत होती. एक पत्नी जिवंत असतां दुसरी करणाराच्या संसर्गानें समाजिक सुधारणेच्या पवित्र आणि शुद्ध कार्याची हानि होण्यास आपण जागा देऊं नये, असें त्यांस वाटे. या पापाचें प्रायश्चित्त म्हणून त्यांनीं स्वतःस अपंक्त ठरवून सामाजिक अज्ञातवास भोगला, व तरुणपणींच दुसरी पत्नी वारली असतांही पुनः विवाह केला नाहीं. गोखले हे नेहमीं स्वयं-बहिष्कृत स्थितींत रहात असल्यामुळें १८९० च्या ग्रामण्यप्रकरणांत ते सांपडले होते, तरी त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें नाहीं.

सामाजिक सुधारणा सर्वस्वी पसंत असतांना गोखल्यांनीं तिच्यांत प्रत्यक्ष भाग कां घेतला नाहीं हें यावरून कळून येईल. पण दुसऱ्याही एका कारणामुळें त्यांनीं तसें केलें नाहीं. प्रत्येकानें एकेका कार्याला वाहून घ्यावें अशा मताचे ते होते, व त्यांनीं स्वतःला राजकारणाला वाहून घेतलें होतें. पण येथेंही गोखल्यांनीं राजकारणच कां पसंत केलें असा प्रश्न येतो. एकच कार्य करावयाचें मग तें सामाजिक कां नाहीं, या प्रश्नाचीं गोखल्यांच्या बाबतींत दोन उत्तरें संभवतात. एक आवड म्हणून व दुसरें दुसऱ्या विवाहाचें प्रायश्चित्त म्हणून गोखल्यांनीं राजकारण पसंत केलें. सामाजिक सुधारणेपेक्षां राजकीय सुधारणा अधिक महत्त्वाची असें अनुमान कोणी गोखल्यांच्या चरित्रावरून काढूं लागल्यास त्याचा हात धरतां येणार नाहीं हें मात्र निर्विवाद आहे.

राजकीय बाबतींत गोखल्यांनीं आपला जन्म खर्च केला तेव्हां त्या बाबतींत त्यांचीं मतें व ध्येयें काय होतीं हें पाहूं. इंग्रजांचा व हिंदुस्थानचा संबंध परमेश्वरी योजनेनें जगाच्या हितासाठीं घडून आला आहे असें त्यांचें ठाम मत होतें. १९०७ सालीं त्यांनीं कॉंग्रेसचें जें 'क्रीड' ठरविलें, तेंच त्यांचेंही ध्येय होतें असें म्हणणें मुळींच चुकणार नाहीं. पण त्यांनीं आपली दृष्टि केव्हांही संकुचित ठेवली नव्हती. 'I recognize no limits to my aspiration for our Motherland' असे उद्गार त्यांनीं १९०७ सालीं पंडित मोतीलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखालीं दिलेल्या व्याख्यानांत

काढले. ( page 949 ) अशाच अर्थाचे उद्गार त्यांनीं १९१२ सालीं इंग्लंडांतही काढले होते. ( केसरी, ता० १३-८-१२ ). वसाहतींचें स्वराज्य हें हिंदुस्थानचें प्रत्यक्ष राजकीय ध्येय; पण येथेंच थांबण्याचा आग्रह कोणालाही करतां येणार नाहीं, कोणत्याही मर्यादा हिंदी राष्ट्र जुमानणार नाहीं असें त्यांचें स्पष्ट मत होतें.

ध्येयाच्या बाबतींत कोणाचाच मतभेद नव्हता. पण तें ध्येय साध्य कोणत्या मार्गांनीं करावयाचें याबद्दल मतभेद होऊन पक्षभेद झाले. जहालांचे मार्ग कोणते होते याचें थोडेंसें वर्णन मागें तिसऱ्या प्रकरणांत आलेंच आहे. गोखले राजकारणांत नेमस्त होते. रानड्यांनीं आंखून दिलेलें 'मॉडरेशन' चें धोरण त्यांनीं जन्मभर अमलांत आणलें. विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, गोखले हे धोरणानेंच केवळ नेमस्त नव्हते, तर स्वभावतःच ते नेमस्त होते. सनदशीरपणा व पापभीरूपणा हे त्यांचे फार मोठे गुण होते. यामुळेंच त्यांनीं १८९७ सालीं बिनतक्रार माफी मागितली. इंग्रजी राज्यांत अन्याय होतात, पण ते मुद्दाम होत नसून अज्ञानानें होतात; हें अज्ञान घालवून खरी वस्तुस्थिति समजावून दिली म्हणजे आपल्या उन्नतीचा मार्ग मोकळा होईल अशी त्यांची दृढ समजूत होती. या विश्वासामुळेंच त्यांनीं त्याच त्या तक्रारी वर्षानुवर्ष सरकारपुढें मांडल्या. प्रामाणिकपणा, व्यवस्थितपणा, आस्थेवाईकपणा व कष्टाळूपणा या चार गुणांवर त्यांच्या कामगिरीची बहुविध इमारत उभारलेली आहे. त्यांची कोणतीही कामगिरी घ्या, त्यांत हे चारही गुण प्रमुखपणानें दिसून येतात. 'सार्वजनिक आयुष्यक्रम' म्हणून कांहीं नवीन वस्तू आहे व ती हिंदी लोकांनीं आत्मसात् केली पाहिजे अशी गोखल्यांची शिकवण होती. Public Life in India या विषयावर त्यांनीं एक सुंदर व्याख्यान दिलें होतें, त्या व्याख्यानाचें गोखल्यांच्या ध्येयविवेचनांत फारच महत्त्व आहे. हें व्याख्यान नटेसन यांनीं प्रसिद्ध केलेल्या संग्रहांत नाहीं. या व्याख्यानांतील कांहीं मुद्दे येथें दिले तर ते अस्थानीं होणार नाहींत. सार्वजनिक आयुष्यक्रम हा बहुजनसमाजाच्या हितासाठीं असला पाहिजे व त्यांत बहुजनसमाजानें भाग घेतला पाहिजे. सार्वजनिक

आयुष्यक्रमाचे राष्ट्रीय, राजकीय व सामाजिक असे तीन प्रकार असतात. राष्ट्राराष्ट्रांतील सार्वजनिक आयुष्यक्रम हिंदी लोकांना सध्यां शक्य नाहीं तेव्हां गोखल्यांनीं राजकीय व सामाजिक सार्वजनिक आयुष्यक्रमाचेंच विवेचन आपल्या व्याख्यानांत केलें आहे. त्यांतल्या त्यांत राजकारणांतर्गत सार्वजनिक आयुष्यक्रमावरच गोखल्यांनीं भर दिला आहे. हा आयुष्यक्रम अद्याप बाल्यावस्थेंत आहे, कारण लोकहितासाठीं धडपडण्याचें ब्रीद लोकांना अद्याप मानवत नाहीं असें गोखल्यांनीं सांगितलें आहे. परार्थासाठीं सुख, सोयीगैरसोयी, द्रव्य यांचा त्याग करावयास लोक थोडे तरी तयार असतात, पण मतांचा त्याग करावयास कोणीच तयार नसतात हें चांगलें नाहीं. वस्तुत: आपलीं मतें बाजूस ठेवून पुढाऱ्यांच्या मतांप्रमाणें वागणें हें अनुयायांचें काम आहे. त्याशिवाय सार्वजनिक कामें होऊं शकत नाहींत. मतें म्हणजे सदसद्विवेकबुद्धि नव्हे. सर्वस्वी भिन्न असे दोन मानववंश या देशांत एकत्र आले आहेत ही गोष्ट लक्षांत घेऊन सार्वजनिक आयुष्यक्रम कंठिला पाहिजे. जित लोकांतही अनेक धर्म, पंथ व जाती यांचा समावेश होत असल्यानें कोणालाहि न दुखवितां देशाची उन्नति घडवून आणली पाहिजे. मुसलमान व हिंदु प्रजाजन व इंग्रज सरकार यांनीं एकमेकांशीं सहकार्य केलें तरच देशकार्य सुलभपणें घडून येईल. सरकारानें आपल्या धोरणाविषयीं प्रजेच्या मनांत केव्हांही संशय उत्पन्न होऊं देतां कामा नये. उलट प्रजेनेंहि सरकारचें साहाय्य केलें पाहिजे. परस्परांनीं परस्परांविषयीं संशयाला व भीतीला जागा राहूं देऊं नये. राजनिष्ठा अशाप्रकारें संशयातीत स्थितींत ठेऊन प्रजेनें आपलीं गाऱ्हाणीं सात्त्विकपणें सरकारपुढें मांडावींत. राजनिष्ठा योग्य प्रकारें पाळून लोकमतजागृति, लोकांना सहकार्य, शिस्त, व हक्क यांची जाणीव करून देणें, व अशा रीतीनें उत्पन्न झालेल्या शक्तीचा सरकार लोकमतानुवर्ती बनविण्यांत विनियोग करणें हीं तीन कामें सार्वजनिक आयुष्यक्रमांत प्रामुख्यानें समाविष्ट होतात. दिलेल्या हक्कांचा योग्य तो उपभोग घेऊन अधिक हक्कांबद्दल आपली लायकी प्रजेनें सिद्ध केली पाहिजे. लोकशिक्षणाचें कार्य अत्यंत महत्त्वाचें व

अवघड आहे. ब्रिटिश सरकार इंग्रजी प्रजेच्या हातांत असल्यामुळें इंग्रजी प्रजेलाहि आपण जागें केलें पाहिजे. हिंदी लोक कायमचे दास्यत्वांत राहाण्यासाठीं जन्माला आले नाहींत. ते आपला राज्यकारभार स्वतःच चालवितील. वैयक्तिक राजसत्तेचे दिवस संपून लोकशाहीच्या युगाला सुरुवात झालेली आहे. ब्रिटिश अमलाखालींच हिंदुस्थान स्वयंशासित होणार. या ध्येयाकडे डोळे लावून आपल्या सर्व चळवळी झाल्या पाहिजेत. हिंदु-मुसलमानांनीं आपल्यांतील दुही वाढविणाऱ्या विशिष्टपंथदर्शक संस्था काढण्याचें टाकून दिलें पाहिजे. राज्यकर्त्यांच्या भावनांना नव्हे तर बुद्धीला आपल्या अडचणी पटविल्याशिवाय त्या दूर होत नाहींत. लायक इसमांनींच कौन्सिलांत गेलें पाहिजे. कौन्सिलांत जाऊन मग सार्वजनिक प्रश्नांचा अभ्यास करण्यास सुरुवात करण्याचा 'तहान लागल्यावर विहीर खणण्याचा' प्रकार उपयोगी नाहीं. लोककार्याला सर्वस्वी वाहून घेणारे अनेक देशभक्त यापुढें निघाले पाहिजेत. फावल्या वेळीं देशभक्ति करून भागणार नाहीं. सरकारी नोकरीचा मोह तरुणांनीं सोडला पाहिजे. सार्वजनिक आयुष्यक्रम हा एक धंदाच आहे, जन्माचा व्यवसायच आहे अशी समजूत पसरत गेली पाहिजे. तरुणांनीं हें काम जोमानें हातीं घेतलें तर देशाचा भाग्योदय हां हां म्हणतां होईल.

गोखल्यांच्या ध्येयांविषयीं आणखी लिहिण्यासारखें कांहीं नाहींच असें म्हटलें तरी चालेल. हें सुंदर व्याख्यान गोखल्यांनीं मोर्ले-मिंटो सुधारणा अमलांत आल्यानंतर दिलें असून त्यांत त्यांनीं आपलें सर्व राजकीय तत्त्वज्ञान ओतप्रोत भरलें आहे असें कोणासही दिसून येईल. हें व्याख्यान १९२२ सालीं The National Literature Publishing Company नें स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध केलें आहे हें भाग्यच म्हणावयाचें. या व्याख्यानांत आलेल्या मुद्यांव्यतिरिक्त इतर मुद्दे सांगून हें प्रकरण पुरें करूं.

श्रमविभाग म्हणून, सामाजिक सुधारणा सर्वस्वीं पसंत असतांही गोखल्यांनीं एकटी राजकीय सुधारणेची चळवळच हातीं धरली; पण श्रमविभाग करून निरनिराळीं कामें हातीं घेणाऱ्या कार्यकर्त्यांचें ध्येय व मार्ग

एकच असावेत या हेतूनें त्यांनीं 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' काढली. या संस्थेच्या उद्देशपत्रिकेंत Politics must be spiritualised हें सूत्रवाक्य त्यांनीं लिहून ठेवलें. हें गोखल्यांचें फारच महत्त्वाचें असें एक ध्येय होतें. "खऱ्या धर्मश्रद्ध माणसाच्या अंगीं जी उत्कटता, सत्यनिष्ठा, पवित्रपणा, व आपण करीत आहों तें कार्य खरोखरच उपकारक आहे अशी वसत असणारी भावना हीं असतात तींच राजकारणविषयक कार्य करणाऱ्या माणसाच्या अंगीं असणें जरूर आहे असा याचा अर्थ" होय. (ज्ञानप्रकाश, तारीख १५ जून सन १९२४) कार्यकर्त्या माणसांना सुद्धां श्रमविभाग लागू आहे, मग विद्यार्थ्यांविषयीं बोलावयासच नको. विद्यार्थी व राजकारण यांचा संबंध कसा असावा याविषयींचे गोखल्यांचे विचार फारच मार्मिक आहेत. जबाबदारी मुळींच नसल्यामुळें राजकारणांत विद्यार्थ्यांना पडावेसें वाटतें, पण म्युनिसिपालिटीच्या कारभारांत—म्हणजे जेथें जबाबदारी अंगावर आली आहे तेथें— विद्यार्थी लक्ष्य घालीत नाहींत अशी सकारण उपपत्ति सांगून विद्यार्थीदशेंत राजकारणाचें व राजकीय गोष्टींचें विद्यार्थ्यांना चांगलें शिक्षण देण्यांत यावें, व हें शिक्षण घेऊन बाहेर पडल्याशिवाय विद्यार्थ्यांनीं राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेऊं नये असें गोखल्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. प्रत्यक्ष राजकीय चळवळींत सक्रिय भाग घेणें हें विद्यार्थ्यांना फारच धोक्याचें असल्यामुळें त्यांनीं हें केव्हांहि करूं नये. यानंतर गोखल्यांनीं विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेण्याचा उपदेश करणाऱ्या जहाल पक्षाचा जोरानें निषेध केला आहे. जहालांच्या चळवळीनें विद्यार्थीवर्गाचें सर्वांत अधिक नुकसान झालें आहे असें त्यांनीं स्पष्टपणानें दाखवून दिलें. हे व अशाच प्रकारचे इतर सुंदर विचार गोखल्यांनीं ता० ९ ऑक्टोबर १९०९ रोजीं मुंबईच्या 'स्टूडंट्स ब्रदरहुड' पुढें व्याख्यान देतांना प्रकट केले.

अल्पसंख्याकांच्या योग्य हक्कांचें रक्षण करण्यास गोखले नेहमीं तयार असत. पण १९०९ सालीं मुसलमानांनीं वाजवीहून अधिक जागा कायदे-कौन्सिलांत आपणांस असाव्यात असा आग्रह धरला, त्या वेळीं गोखल्यांनीं

त्यांना विरोधच केला (Speeches: 995-1001) धार्मिक व सामाजिक बाबतींत हिंदुमुसलमानांनीं एकमेकांना दुखवूं नये असें त्यांचें स्पष्ट मत होतें, व म्हणून गणेशोत्सवासारखे उत्सव त्यांना मनांतून पसंत नसत. सामाजिक सुधारणेचीं सर्व अंगें उपांगें त्यांना पूर्णपणें मान्य होतीं हें वर एकदोनदां सांगितलेंच आहे; पण अस्पृश्योद्धार व स्त्रीशिक्षण हीं त्यांना फारच महत्त्वाचीं वाटत होतीं. प्रो. कर्वे यांच्या कार्याला त्यांचा पूर्ण पाठिंबा होता, व त्यांनीं अडल्यावेळीं प्रो. कर्व्यांना सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या शिलकेंतून पांच हजार रुपये दिले होते. (आत्मवृत्त पृ० ४०७) 'हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षणा' वर त्यांनीं इंग्लंडांत वाचलेल्या निबंधाचा उल्लेख मागें चवथ्या प्रकरणांत आलाच आहे. शिक्षणप्रसाराचें त्यांना किती महत्त्व वाटत होतें हें त्यांच्या सक्तीच्या शिक्षणाच्या बिलानेंच दिसून आलें. शिक्षणाचें कार्य त्यांना इतकें प्रिय होतें कीं, आणखी दोन वर्षांनीं कायदेकौन्सिलाची मुदत संपल्यावर गोखले पुनः निवडणुकीस उभे न राहातां एखाद्या शिक्षणाच्या कार्याला वाहून घेणार आहेत असें ऐकतों म्हणून १९१० सालीं चिरोल साहेबांनीं लिहिलें होतें. (Indian Unrest: page 203)

गोखले आपल्या धार्मिक मतांविषयीं फारसें बोलत नसत. पूर्ववयांत ते अज्ञेयवादी होते असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं; पण पुढें पुढें या मतांत थोडथोडा फरक झाला होता. पण या मतांतराची मजल प्रत्यक्ष एखादा धर्मपंथ स्वीकारण्यापर्यंत कधींच गेल्याचें ऐकिवांत नाहीं. मरण्यापूर्वीं कांहीं दिवस ते थिऑसॉफिस्टांच्या गोटांत दाखल होण्याच्या बेतांत आले होते, पण प्रत्यक्ष थिऑसॉफीचा स्वीकार त्यांनीं शेवटपर्यंत केला नव्हता असें डॉ. परांजपे खात्रीनें सांगतात. पण गोखले १८९८ पासून १९०७ पर्यंत थिऑसॉफिकल सोसायटीचे सभासद होते अशी माहिती उपलब्ध झाली आहे. (फर्ग्युसन कॉलेज मॅगेझिन, सप्टेंबर १९१५). जन्मतःच ते सात्त्विक प्रवृत्तीचे होते, व देश हाच त्यांचा देव होता.

जपानबद्दल त्यांना यामुळें व इतर कारणांमुळें फार आदर असे व जपानला जाण्याचा त्यांचा फार हेतु होता.

इंग्लंडांतलें काम चांगलें होण्यास सरकारी मान्यतेची जरूरी असल्यामुळें गोखल्यांनीं १९०४ सालीं सी. आय. ई. हा किताब स्वीकारला. पुढें त्यांची मान्यता जगभर झाली. तेव्हां के. सी. आय. ई. या किताबाची त्यांनीं सहजच उपेक्षा केली. हा लोकोत्तर असा स्वार्थत्यागच होता. गोखले शेवटपर्यंत भारत-सेवक गोखलेच राहिले.

प्रतिपक्षीयांशीं गोखले केव्हांच अनुदारपणानें वागले नाहींत. वडील प्रतिपक्षीयांबद्दल ते नेहमीं आदरानेंच बोलत. त्यांचें आत्मसंयमन, उमदेपणा, करारीपणा हीं सर्वच विलक्षण होतीं. राजनीतिशास्त्राचें व अर्थशास्त्राचें अगाधज्ञान, कार्यावर पूर्ण विश्वास, देशहिताची अतोनात तळमळ या गुणांमुळें ते सरकारचे अत्युत्तम टीकाकार ठरले. त्यांची टीका सरकारलाही अमान्य करतां येत नसे. मि० एच. डब्ल्यू. नेव्हिन्सन यांनीं आपल्या The New Spirit in India या पुस्तकांत गोखल्यांचें फारच सुंदर व बहारीचें वर्णन दिलें आहे. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचें वर्णन करून मग नेव्हिन्सन साहेबांनीं त्यांना देण्यांत आलेल्या मेजवानीचें वर्णन केलें आहे. ते दिवाळीचे दिवस होते. हें वर्णन देत असतांना जागोजागीं त्यांनीं गोखल्यांबद्दल प्रशंसापर उद्गार काढले आहेत. त्यांच्या मतें गोखले हे Plain living and high thinking या तत्त्वाचें मूर्तिमंत उदाहरणच होत. खऱ्या ब्राह्मणाप्रमाणें गोखल्यानीं आपलें आयुष्य दारिद्र्य व ज्ञान यांना वाहिलें आहे असे उद्गार नेव्हिन्सन साहेबांनीं काढले आहेत ! हे उद्गार खरे नाहींत असें कोण म्हणेल ?

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कादंबरीकार व पुणें म्युनिसिपॅलिटीचे माजी अध्यक्ष कै. हरी नारायण आपटे यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ पुणें म्युनिसिपॅलिटींत नुकताच झाला. त्या वेळीं भाषण करितांना अध्यक्ष न० चिं० केळकर यांनीं हरीभाऊ आपटे व गोपाळराव गोखले या उभयतां स्नेह्यांची व म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षांची एक गोष्ट सांगितली. या गोष्टींत

गोखल्यांनींच स्वत: आपलें ध्येय सांगितलें आहे. गोपाळराव व हरीभाऊ हे एकदां बोलत बसले असतां कोणाला काय व्हावेंसें वाटतें असा प्रश्न निघाला. हरिभाऊ म्हणाले ' माझी महत्त्वाकांक्षा उत्तम कादंबरीकार होण्याची आहे; ' गोपाळराव म्हणाले, ' माझी महत्त्वाकांक्षा हिंदुस्थानाचा मुख्य प्रधान होण्याची आहे ! ' ( ज्ञानप्रकाश, ता० २९ जून १९२४. )

दुर्दैवानें देशाची स्थिति अद्यापि अशीच आहे कीं, गोखल्यांची महत्त्वाकांक्षा जागच्या जागींच जिरून जावी. ही स्थिति सुधारण्यासाठींच गोखल्यांनीं एकसारखा कंठशोष केला— पण त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. हिंदी मनुष्य हिंदुस्थानचा मुख्य प्रधान ज्या दिवशीं होईल तो सुदिन !

---

### प्रकरण ९ वें.

## कामगिरीचें स्वरूप व महत्त्व.

मुंबई इलाख्याची कुंडली ज्योतिषी कशीही मांडोत, राजकारणांत मुंबई इलाख्यानें पहिला नंबर मिळविला आहे यांत कांहींच शंका नाहीं. इतर प्रांतांत राजकीय चळवळ झाली नाहीं किंवा होत नाहीं असा भाग नाहीं; पण राजकारणांतील खरें कर्तृत्व मुंबई इलाख्याच्याच वांट्यास आलें आहे. पार्लमेंटाचे सभासद मुंबईचेच दादाभाई झाले, सामाजिक परिषद मुंबई-च्याच रानड्यांनीं स्थापन केली, कॉंग्रेस मुंबईच्याच फेरोजशहांनीं आपल्या मुठींत ठेवून वाटेल तशी खेळविली, नेमस्त पक्षाची स्थापना व जोपासना मुंबईच्याच गोखल्यांनीं केली, जहाल पक्षाची स्थापना व जोपासना मुंबई-च्याच टिळकांनीं केली, व आजही असहकारितेची नवीन चळवळ सुरू करण्याचें श्रेय मुंबईच्याच गांधींकडे आहे. हिंदुस्थानाच्या इतिहासांत दादाभाई नौरोजी, रानडे, मेथा, गोखले, टिळक व गांधी या नांवांना जी मान्यता प्राप्त होईल ती इतर नांवांना प्राप्त होणें शक्य नाहीं.

गोखल्यांच्या कामगिरीचे दोन ठळक भाग पडतात. १८८७ ते १९०० पर्यंतचा एक भाग व १९०१ ते १९१४ पर्यंतचा दुसरा भाग. पहिल्या भागांत गोखल्यांनीं पुढील कामगिरीची उत्तम पूर्वतयारी केली. रानड्यांसारख्या गुरूच्या देखरेखीखालीं राजकारण व अर्थशास्त्र यांचा मार्मिक अभ्यास करून त्यांनीं अनेक बारीक सारीक कामें चांगल्या रीतीनें पार पाडलीं. वेल्बी कमिशनपुढील साक्षीनें त्यांची पुढारी होण्याची लायकी सर्व हिंदी राष्ट्राला पटली व येथें त्यांच्या कामागिरिचा पूर्वार्ध संपला. उत्तरार्धाला वरिष्ठ कौन्सिलांतील निवडणुकीनें आरंभ झाला व त्या उत्तरार्धाचा शेवट गोखल्यांच्या मृत्यूनेंच झाला. कर्मधर्मसंयोगानें रानड्यांचा मृत्यु या उत्तरार्धाच्या आरंभींच घडून आल्यामुळें गोखल्यांवरील जबाबदारी वाढली. गोखल्यांनीं ही जबाबदारी ओळखून आपलें कर्तव्य चोखपणानें बजावलें.

ही गोखल्यांची कामगिरी कोणत्या स्वरूपाची होती असा प्रश्न येथें सहजच उपस्थित होतो. याचें एक उत्तर असें देतां येईल कीं, गोखल्यांच्या कामगिरिला शिष्टाईचें स्वरूप होतें. जन्मभर गोखल्यांनीं हिंदी प्रजेच्या वतीनें इंग्रज सरकारापाशीं शिष्टाई केली. वेळोवेळीं विलायतेला जाऊन त्यांनीं शिष्टाई केली याबद्दल वादच नाहीं, पण हिंदुस्थानांत असतांनाही त्यांनीं शिष्टाईच केली. हिंदुस्थान स्वयंशासित असतें तर गोखले मुख्य प्रधान झाले असते, किंवा परराष्ट्रीय प्रधानहि उत्तम झाले असते. दक्षिण आफ्रिकेंत त्यांनीं हिंदी राष्ट्राची वकिली केलीच कीं नाहीं ? प्रजेचीं गाऱ्हाणीं मुद्देसूद रीतीनें व गोडपणानें पुराव्यानिशीं सरकारपुढें मांडण्याचें काम गोखल्यांनीं कायदे-कौन्सिलांत जन्मभर केलें. हिंदुस्थानचें राज्ययंत्रच कांहीं चमत्कारिक असल्यामुळें त्यांची वकिली बरीचशी फुकट गेली हा कांहीं त्यांचा दोष नव्हे; किंबहुना आपली वकिली फुकट जाणार हें स्पष्ट दिसत असतांही त्यांनीं ती करण्याचें सोडून दिलें नाहीं यांतच त्यांचा खरा मोठेपणा आहे.

सरकाराकडे वकिली करणाऱ्याचें तोंड सरकाराकडेच असल्यास त्यांत नवल कसलें ? गोखले जनतेचे वकील खरे; पण जनतेकडे पाठ करूनच त्यांना ही वकिली करावी लागली हीहि गोष्ट खोटी नाहीं. बहुजन-

समाजांत गोखले प्रिय नव्हते याचें खरें कारण हें होय. यांत दोष गोखल्यांचाहि नाहीं, आणि जनतेचाहि नाहीं; गोखल्यांच्या विरुद्ध गैर-समज पसरविण्यांत धन्यता मानणाऱ्या प्रतिपक्षीयांचा दोष आहे. बिचाऱ्या जनतेनें तरी काय करावें ? गोखले नेहमींच जर तिच्याकडे पाठ करून व सरकारकडे तोंड करून बसलेले, तर तिला तरी हे आपलेच हितकर्ते आहेत अशी खात्री कशी पटावी ? गोखले जनतेकडे पाठ करून बसत हें सिद्ध करण्यास फार लांब जावयास नको. देशी भाषांतून गोखल्यांनीं किती भाषणें केलीं व लेख लिहिले? सुधारकाचे संपादक म्हणूनही गोखले इंग्रजींतच लिहीत असत. त्यांच्या भाषणांच्या १२०० पृष्ठांच्या पुस्तकांत सात पृष्ठांचें सारें एक मराठी व्याख्यान (मराठी व्याख्यानाचें इंग्रजी रूपांतर) आहे! जनतेंत न मिसळण्याचा हा दोष गोखल्यांच्या अनुयायांत अजून आहे हें गतवर्षींच्या कौन्सिलनिवडणुकीच्या निकालावरून सहज दिसून येईल.

गोखल्यांना कोणत्याही प्रकारचा कमीपणा देण्याचा येथें आमचा हेतु नाहीं, किंवा तसा हेतु असणें शक्यही नाहीं. देशहितासाठीं निरनिराळ्या चळवळी निरनिराळ्या लोकांनीं करणें जसें श्रमविभागाच्या दृष्टीनें सयुक्तिक ठरतें, तसेंच राजकारणांतही सोयीप्रमाणें श्रमविभाग होणें सयुक्तिक आहे. लोकमतजागृति एकानें करावी, व दुसऱ्यानें तिचा फायदा घेऊन लोकांची बाजू सरकारापुढें मांडावी असा कार्यभेद एकाच राजकारणाच्या कार्य-क्षेत्रांत सहज होऊं शकतो—किंबहुना तसा तो होणें हेंच फायद्याचें आहे. गोखल्यांच्या कामगिरीचें स्वरूप दुसऱ्या प्रकारचें आहे, पहिल्या प्रकारचें नाहीं एवढेंच दाखविण्याचा येथें हेतु आहे. कौन्सिलांत जाऊन लोककार्य करणें हें कौन्सिलाबाहेर राहून लोकजागृति करण्याइतकेंच-किंबहुना थोडेंसें अधिकच अवघड आहे हें कोणासही पटेल.

सरकारापुढें लोकांची बाजू मांडण्यासाठींच गोखल्यांचा अवतार होता असें म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांनीं जी पूर्व तयारी केली ती याच कार्यासाठीं केली. राज्यकर्त्यांची भाषा करतलामलकवत् करण्यासाठीं त्यांनीं जंग जंग पछाडले. आटोकाट श्रम करून शेवटीं

त्यांनीं त्या भाषेंत पूर्ण प्रावीण्य संपादन केलें. भाषेची अडचण दूर झाल्यानेंच केवळ भागत नव्हतें. राजकीय प्रश्नांचें सांगोपांग ज्ञान या कार्यासाठीं अवश्य हवें होतें, म्हणून त्यांनीं रानडयांजवळ राहून जिवापाड परिश्रम करून हें ज्ञान संपादन केलें. गोखल्यांच्या कामगिरीचें स्वरूप कसें होतें या प्रश्नाचें दुसरें उत्तर असें देतां येईल कीं तें आंकडेमय होतें! गोखल्यांची टीका लेचीपेची नव्हती, तिला टाकलेलें पाऊल मागें घेण्याची संवय नव्हती. मोघम विधानें गोखले कधींच करीत नसत, त्यांचीं विधानें नेहमीं अमोघ असत. ब्रिटिश साम्राज्याच्या सामर्थ्याचें अभेद्य कवच नोकरशाहीच्या अंगावर असल्यामुळें तिचा बचाव होई ही गोष्ट वेगळी; येथें सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं, गोखल्यांचें शरसंधान नेहमीं अचूक होत असे! या गोष्टीची साक्ष अनेक इंग्रजी अधिकाऱ्यांनीं दिलेली आहे.

पंथप्रवर्तक या नात्यानेंही गोखल्यांची कामगिरी फार मोठी आहे. एक राजकीय तत्त्वज्ञान असणारा पक्ष दृढमूल करूनच गोखले थांबले नाहींत, तर या पक्षाचा विस्तार करून देशसेवा करण्यासाठीं त्यांनीं एक नमुनेदार संस्थाही स्थापन केली. ‘ मी ’ या आपल्या अत्यंत उदात्त कादंबरीच्या प्रस्तावनेंत हरिभाऊ आपटे यांनीं ‘ सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी ’ चा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. या सोसायटीची रचना गोखल्यांनीं फारच कौशल्यानें केली आहे. श्रद्धा, श्रमविभाग, सहकार्य, शिक्षण, शिस्त व स्वार्थत्याग या गुणांचा समुच्चयानें देशकार्यासाठीं जास्तींत जास्त कसा विनियोग करतां येईल हें गोखल्यांनीं या संस्थेच्या द्वारें फारच उत्तम प्रकारें दाखवून दिलें आहे. संघशक्तीचा उपयोग इतका मार्मिकपणें करून घेतलेला इतरत्र क्वचितच पहावयास मिळेल. दुर्दैवानें या सोसायटीकडे अधिक लक्ष्य देण्यास गोखल्यांस फुरसद झाली नाहीं; नाहींतर त्यांनीं या संस्थेची आणखीही सुधारणा करून दाखविली असती.

गोखल्यांच्या या सर्वच कामगिरीचें महत्त्व अबाधित आहे. गोखल्यांचीं भाषणें ह्मणजे अर्थशास्त्र व राजनीतिशास्त्र यांवरील एक प्रमाण ग्रंथच आहे.

सोन्याच्या नाण्यांप्रमाणें या भाषणांची किंमत केव्हांही कमी होणारी नाहीं. आज तर गोखल्यांच्या कामगिरीचें विशेषच महत्त्व वाटण्याजोगी परिस्थिति उत्पन्न झाली आहे. देशभक्ति किंवा देशसेवा या गोष्टी करण्यास कांहीं पात्रता लागते, श्रम लागतात, तयारी लागते, ही गोष्ट कोणाला खरीही वाटेनाशी झाली आहे. कामगिरी चिरस्थायी होण्यास ती भरींव असावी लागते, नाहींतर वाऱ्यानें येऊन वावटळीवर जाण्यास विलंब लागत नाहीं. गोखल्यांनीं टांकीचे घाव सोसले होते, त्यांनीं लोखंडाचे चणे खाल्ले होते, तेव्हांच ते देव झाले आणि ब्रह्मपदीं नाचले. स्वार्थत्यागाच्या बाता मारणें वेगळें, व खरा स्वार्थत्याग वेगळा. भारत-सेवक गोखल्यांचें खरें नाणें होतें. त्यांची भरींव कामगिरी होती. पाण्यावर हलकें तरंगतें; पण काळाची गोष्ट तशी नाहीं. काळाच्या प्रवाहांत हलकेंसलकें विनाश पावून भरींवच तेवढें उरतें. गोखल्यांच्या कामगिरीचें महत्त्व केव्हांही कमी होणार नाहीं, ही निश्चित गोष्ट होय.

३०५९

## प्रकरण १० वें.

# नामदार गोखले व इतर पुढारी.

सार्वजनिक कामांत पडणाऱ्या माणसाचा इतर अनेक माणसांशीं संबंध येतो. कोणी साहाय्यक म्हणून, तर कोणी विरोधक म्हणून अनेक लोक प्रत्येक कार्यांत पुढें येतात. अशा लोकांशीं वागतांना माणसाच्या आवडी-नावडी, त्याच्या स्वभावांतील खांचाखोंचा वगैरेंचा बोध फार चांगला होऊं शकतो. नामदार गोखल्यांच्या चरित्रलेखकाला त्यांच्याशीं समकालीन असणाऱ्या कांहीं व्यक्तींचा येथें निर्देश केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. जगाचा इतिहास म्हणजे जगांतील मोठ्या माणसांचीं चरित्रें होत. हा सिद्धांत सर्व जगाच्या मानानें जितका खरा ठरेल, तितकाच तो एखाद्या

देशाच्या मानानें खरा ठरला पाहिजे. हिंदुस्थानांत होऊन गेलेल्या मोठ्या माणसांत गोखल्यांची गणना निःसंशय होते. पण इतर कित्येकांनींही गोखल्यांनीं ज्या वेळीं देशसेवा केली, त्याच वेळीं देशसेवा करून राष्ट्राचा इतिहास बनविण्यास थोडीफार मदत केली आहे. अशांपैकीं कांहींशीं गोखले हे केवळ समकालीनत्व आणि समव्यवसायित्व यांनींच जखडले गेले आहेत असें नाहीं, तर यांहून अधिक जिव्हाळ्याच्या नात्यांनीं ते बांधले गेले आहेत. गोखल्यांच्या चरित्राचें रहस्य कळण्यास या पुढाऱ्यांचा येथें निर्देश करणें अवश्य आहे, पण यांपैकीं प्रत्येकाशीं गोखल्यांची तुलना करावी लागणार असल्यानें हें काम अत्यंत नाजूक आणि जोखमीचें आहे. राजकारणाचा दीर्घ अभ्यास, आणि मनुष्यस्वभावाचें मार्मिक ज्ञान हीं असल्याशिवाय अशा कामाला प्रवृत्त होणें हें साहसच होय. पण साहस असलें तरी आतां तें टळत नाहीं हें खास !

या प्रकरणांत गोपाळराव आगरकर, माधवराव रानडे, फेरोजशहा मेथा, मोहनदास गांधी, आणि बळवंतराव टिळक या पांच पुढाऱ्यांचें आणि गोखल्यांचें नातें काय होतें, हें विवेचनपूर्वक दाखविण्याचा विचार आहे. या व्यक्तींपैकीं फक्त गांधी आज हयात आहेत. या व्यक्तींपैकीं प्रत्येकाशीं प्रथम गोखल्यांचा संबंध कसा आला, पुढें त्याला कोणतें स्वरूप येत गेलें, गोखल्यांना त्या व्यक्तीविषयीं व उलट त्या व्यक्तीला गोखल्यांविषयीं काय वाटत होतें, आणि गोखल्यांच्या व त्या त्या व्यक्तीच्या कामगिरीचा राष्ट्रावर परिणाम काय झाला हें शक्य तितक्या थोडक्यांत, आणि स्वतःवरची जबाबदारी पूर्णपणें ओळखून दाखविण्याचा विचार आहे. तेव्हां क्रमाक्रमानें प्रत्येकाचा विचार करूं.

## गोखले आणि आगरकर.

गोखले आणि आगरकर यांचा प्रत्यक्ष संबंध १८८५ ते १८९५ पर्यंत होता. आगरकरांना डोंगरीच्या तुरुंगांत जावें लागलें त्यावेळीं त्यांच्या मदतीसाठीं गोखल्यांनीं नाटकांत भूमिका घेऊन त्यांच्याविषयींचा आपला आदर व्यक्त केला होता. पण हा आदर एकट्या आगरकरांबद्दल नसून त्यांतला

बराचसा भाग टिळकांकडे जात होता. १८८२ सालीं गोखल्यानीं जाहीर सभेंतलें आपलें पहिलें भाषण केलें, ही आळतेकरांची माहिती खरी असली, तर आदराचें मान अधिक होतें असेंच अनुमान निघतें. पण हा दोघां-विषयींचा आदर एकट्या आगरकरांकडे केव्हां वळला, हें पाहूं लागलें असतां १८८६ सालाची आठवण होते. आगरकरांचा स्वार्थत्यागी, सात्त्विक, आणि प्रेमळ स्वभाव पाहून गोखल्यांना आगरकरांविषयीं आपले-पणा वाटूं लागावा हें स्वाभाविकच आहे. आगरकरांचा व गोखल्यांचा सहवास वाढूं लागल्यावर एकाच्या समाजसुधारणेच्या तळमळीची, प्रेमळ-पणाची व सात्त्विकपणाची छाप दुसऱ्यावर, व दुसऱ्याच्या तरतरीतपणाची अल्लडपणाची व उत्साहाची छाप पहिल्यावर एकदमच पडूं लागावी, यांत नवल कांहींच नाहीं. गोखल्यांना आगरकर पितृतुल्य वाटत, तर आगरकरांना गोखले पुत्रापेक्षांही प्रिय असत. गोखल्यांच्या मनाची कोंवळी लता आपल्याला पाहिजे तशी वांकवितां येईल हें या प्रेमळ माळ्यानें पाहिलें व त्याप्रमाणें त्याला अनुभवही आला. गोखल्यांचें मन आरशासारखें स्वच्छ असून आपल्या उदात्त कल्पना पेलण्याइतकें सामर्थ्यवानही आहे हें कळल्यावर आगरकरांनीं त्यांना गुरूपदेश दिला. आगरकर हे गोखल्यांचे सुरुवातीचे गुरु, असें 'विविधज्ञान विस्तारां'त कै० रा० ब० विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं म्हटलें आहे. आणि या स्वार्थत्यागी गुरूनें जेव्हां गोखल्यांचा दांडगा उत्साह आणि राजकारणाकडील कल पाहिला, तेव्हां आपण होऊन दुसऱ्या अधिक सामर्थ्यवान् गुरूची व गोखल्यांची गांठ घालून दिली. रानड्यांकडे गोखल्यांची शिफारस आधीं आगरकरांनीं केली! डेक्कन एज्युकेशन सोसायटींत व 'सुधारक' कचेरींत गोखल्यांनीं व आगर-करांनीं एकत्र काम केलें, त्याची हकीकत दुसरीकडे दिलेली आहेच. सामाजिक सुधारणेंत गोखल्यांनीं प्रत्यक्ष भाग कां घेतला नाहीं याचेंही कारण दुसरीकडे दिलेलेंच आहे. येथें इतकेंच सांगावयाचें कीं रानड्यांच्या अगोदर आगरकरच गोखल्यांचे गुरु होते, आणि शेवटपर्यंत गोखल्यांना आगरकरांविषयीं अत्यंत आदर व प्रेम वाटे. कै० महाजनींनीं या बाबतींत

दिलेली एक गोष्ट सांगून हा भाग पुरा करूं. " आपलें कितीही दारिद्र्य असलें तरी आपल्या प्रेतसंस्काराबद्दल आपल्या मित्रांवर खर्च पडूं नये म्हणून त्यांनीं ( आगरकरांनीं ) आपल्या पेटींत कांहीं रुपयांची एक पुरचुंडी बांधून ठेविली होती, व तीवर एक चिठ्ठी मारिली होती, कीं ' माझ्या प्रेतदहनार्थ ! ' मरणोत्तर त्यांच्या जिनगीची व्यवस्था करितांना गोपाळराव गोखल्यांना जेव्हां ही पुरचुंडी दिसली, तेव्हां ते मला म्हणाले ' मला रडूंच कोसळलें ! ' " ( मनोरंजन– आगरकर अंक : पृष्ठ २९ ) या गोष्टीवरून गुरूची योग्यता आणि शिष्याचें प्रेम हीं दोनही फारच चांगलीं व्यक्त होतात, एवढेंच म्हटलें म्हणजे पुरें !

## गोखले आणि रानडे.

मुंबईच्या कायदे कौन्सिलांत निवडणूक झाल्यावर सन १९०० च्या जानेवारीमध्यें हिराबागेंत जाहीरसभा भरून गोखल्यांचा सत्कार करण्यांत आला. त्यावेळीं सर डॉ. भांडारकर व गंगारामभाऊ म्हस्के यांनीं गोखल्यांची स्तुति केली. गोखले आपल्या भाषणांत हजर असलेल्या माधवराव रानड्यांना उद्देशून म्हणाले " न्या० मू० रानडे यांनीं मला हाताशीं धरलें, व त्यांच्या पायाशीं बसून शिकण्याची संधि मला मिळाली, म्हणूनच आज मला ही स्थिति प्राप्त झाली आहे. " ( न० र० फाटककृत रानडे चरित्रः पृष्ठ ५१४ ). गोखल्यांचे खरे गुरु रानडेच होते. रानड्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांची गोखल्यांना प्रत्येक बाबतींत मदत होत असे. रानड्यांनीं खरोखरच गोखल्यांना हाताशीं धरून पुढें आणलें. आगरकरांनीं रानड्यांना गोखल्यांची ओळख करून दिली, रानडे व गोपाळराव गोखल्यांचे वडील हे एकाच शाळेंत शिकत होते, माफी प्रकरणामुळें आलेली नाउमेद दूर करून गोखल्यांना पुनः पुढें रानड्यांनींच केलें, हिंदुस्थानांतच कामाचे डोंगर पडले आहेत ते कोणी उलथेपालथे करायचे असें विचारून रानड्यांनींच गोखल्यांना इंग्लंडांत कायमचें राहाण्यापासून परावृत्त केलें वगैरे गोष्टी प्रसंगानुसार मागें सांगितल्याच आहेत. रानड्यांच्या व गोखल्यांच्या संबंधाविषयीं येथें थोडेंसें सामान्य विवेचनच करावयाचें आहे. रानडे हे शिष्यां-

कडून कसून काम करून घेत असत. सांगितलेलें काम सांगितलेल्या वेळीं झालें नाहीं तर तें त्यांना खपत नसे. आजारीपणाची सबबही त्यांना चालत नसे. यामुळें निरनिराळीं ' मेमोरियल्स ' लिहितांना गोखल्यांना रात्र रात्र खपावें लागे! दीर्घोद्योगाची संवय गोखल्यांना पूर्वीं होतीच ती रानड्यांच्या सहवासामुळें विशेष बळावली. गोखल्यांची गुरुभक्तिही अलौकिक होती. वेल्बी कमिशनपुढील साक्षीनें सर्व हिंदुस्थान त्यांच्यावर खूष झालें. पण रानडे काय म्हणतात इकडे गोखल्यांचें लक्ष्य लागलें होतें. खुद्द रानड्यांच्याच शब्दांत गोखल्याचें ह्मणणें देतों– "Mr. Gokhale writes to me 'if you find time to go through the statement and feel satisfied, I shall have received the only reward I care'." ( रानडेचंरित्र, पृ. ५१३ ) ता. १६–२–१८९० रोजीं जुन्नराहून रानड्यांनीं कै० ग० व्यं० जोशी यांना पत्र लिहिलें, त्यांत ते गोखल्यांविषयीं ह्मणतात— "During the last six months that he has been working with me, I have formed a very high opinion of his great powers and his readiness to do his best under all circumstances. He is essentially an honest—intellectually as much as morally—student, and, I am sure, you will find in him a worthy collabourer." ( रानडे चारित्र पृ. ५१२-१३ ) रानड्यांनीं गोखल्यांविषयीं जाहीरपणें फारसे गुणग्रहणपर उद्गार काढले नसल्यामुळें या खासगी उद्गारांची किंमत फारच मोठी आहे. उलट, गोखल्यांनींही आपल्या गुरूच्या लौकिकाला साजेसें स्मारक पुणें शहरीं सिद्ध करून आपली गुरुभक्ति व औचित्यबुद्धि प्रकट केली ( प्रकरण ६ पहा. ) गोखल्यांच्या मनांत रानड्यांचें वाङ्मय स्मारक करण्याचें फार होतें. मोर्ले यांच्या ' बर्क ' च्या चरित्राचा नमुना पुढें ठेवून रानड्यांचें चरित्र लिहिण्याची गोखल्यांची इच्छा होती, पण इतर कार्यांमुळें हें इंग्रजी चरित्र लिहून झालें नाहीं. रानड्यांचें चरित्र मराठींतही अद्यापि व्हावें तसें झालें नाहीं असें मोठ्या

खेदानें ह्मणावें लागतें. गोखल्यांच्या स्वतःच्या चरित्राचीही तीच गत आहे. पण कै० श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांच्या ‘ आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी ’ या नितांतसुंदर पुस्तकाला गोखल्यांनीं एक प्रस्तावना लिहिली आहे. गोखल्यांचे मराठी लेख त्यांच्या मराठी भाषणांइतकेच दुर्मिळ असल्यामुळें या सुंदर व अपूर्व प्रस्तावनेंतून पुढील उतारा घेतल्यावांचून राहावत नाहीं. “ रावसाहेब रानडे हे एकोणिसाव्या शतकाचीं शेवटचीं तीस वर्षें प्रथम महाराष्ट्रांतील व पुढें सर्व हिंदुस्थानांतील राष्ट्रोन्नतीच्या नानाविध चळवळींचे केवळ आधारस्तंभच नव्हेत तर आद्यप्रवर्तक होते, ही गोष्ट आतां कोणास नव्यानें सांगितली पाहिजे असें नाहीं. त्यांची विशाल, व्यापक व तेजस्वी बुद्धि, अगाध ज्ञान, प्रचंड व्यासंग व अलौकिक आकर्षण-शक्ति हीं सर्व त्यांनीं एकनिष्ठपणें देशसेवेस वाहिलीं होतीं. ही आपली आर्यभूमि सर्वांगसुंदर कशानें होईल; सामाजिक, राजकीय, धार्मिक, नैतिक, औद्योगिक, शिक्षणविषयक या सर्व बाबतींत हिचें पाऊल पुढें कसें पडेल; इष्ट प्रकारची प्रगति घडून येण्यास अवश्य असणारे गुण आपल्या समाजांतील स्त्रीपुरुषांचे अंगीं कसे येतील, या गोष्टींशिवाय दुसरा विचार त्यांचे मनास रात्रंदिवस माहीत नव्हता. अशी उज्वल देशभक्ति व देशोन्नती-साठीं चाललेल्या प्रयत्नांवर एवढी दृढ श्रद्धा, कोठल्याही देशांत कां होईना, क्वचितच आढळून येते ” (आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी पृ. ९).

बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें रानडे हे गोखल्यांपेक्षां अनेक पटींनीं श्रेष्ठ होते यांत शंकाच नाहीं. पण सरकारी नोकरीच्या पाशांत गोखले सांपडले नसल्यानें त्यांना रानड्यांपेक्षां फारच अधिक कामगिरी करतां आली. रानडे पडद्याआड सूत्रचालकाचें काम करीत हें एक, आणि त्यांचा व्याप फारच अमर्यादित होता हें दुसरें—यामुळें त्यांनीं सुरू केलेल्या बऱ्याच चळवळी व संस्था कालांतरानें जीवन्मृत झाल्या. उलट गोखल्यांनीं स्वतःस एकाच कामाला—राजकारणाला—प्रत्यक्ष वाहून घेतल्यामुळें त्यांना किती तरी भरींव कामगिरी मागें ठेवून जातां आलें. संस्थांकडे पाहिलें तरी रानड्यांनीं स्थापन केलेल्या डेक्कन सभेपेक्षां गोखल्यांनीं स्थापन केलेल्या ‘ सर्व्हंट्स ऑफ

इंडिया सोसायटी ' ची कामगिरी अधिक भरींव आहे. स्वभावाच्या दृष्टीनें पाहिलें तरी रानडे--गोखल्यांत बराच मजेदार फरक दृष्टीस पडतो. गोखले आणि रानडे हे दोघेही सात्त्विक खरे; पण रानड्यांत जी धार्मिकपणाची व भाविकपणाची लकेर हरघडीं दिसून येते, ती गोखल्यांत दिसून येत नाहीं. ' सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ' ही जी स्थितप्रज्ञतेची वृत्ति रानड्यांच्या अंगीं बाणली होती, ती गोखल्यांच्याजवळ स्वतःपुरती नव्हती. स्वतःपुरती या शब्दाचा येथें थोडा खुलासा केला पाहिजे. सार्वजनिक आयुष्यक्रमांत सरकारकडून होणारी निराशा गोखले स्थितप्रज्ञाप्रमाणेंच सोशीत असत हें पांचव्या प्रकरणाच्या शेवटीं त्यांच्याच भाषणांतील उतारा देऊन आम्हीं सिद्ध केलें आहे. पण व्यक्ती या दृष्टीनें खासगी किंबहुना सार्वजनिक आयुष्यक्रमांतही ते स्थितप्रज्ञ नव्हते. सुखानें आनंद होणें व दुःखानें दुःख होणें या गोष्टी त्यांच्याजवळ फारच होत्या. विरुद्ध पक्षानें केलेल्या टीकेनें रानड्यांची समता ढळत नसे, पण गोखल्यांवर टीकांचा फारच वाईट परिणाम होई. रानड्यांना कोणी कठोर अंतःकरणाचे म्हणणार नाहीं, पण गोखले मात्र कोंवळ्या अंतःकरणाचे या अर्थानें निःसंशय होते. रानडे इहलोकाबरोबरच परलोकाचीही काळजी करीत, गोखल्यांनीं कधीं परलोकाची काळजी केलेली दिसत नाहीं. देशहिताची तळमळ दोघांचीही अनन्यसाधारण होती. 'गुरूसे शिष्य सवाई' या न्यायानें सरकारी नोकरी न स्वीकारण्यांत, व श्रमविभागाचें तत्त्व मान्य करून व अमलांत आणून स्वतःला फक्त राजकारणाला वाहून घेण्यांत गोखल्यांनीं खरोखरीच रानड्यांपेक्षां एक पुढची पायरी गांठली. पण रानड्यांच्या गुरूपदेशामुळेंच गोखल्यांना ही प्रगति करतां आली हें केव्हांही विसरून चालणार नाहीं. रानड्यांच्या उपदेशाच्या अभावीं गोखल्यांचें चरित्र कदाचित् अगदीं निराळ्याच प्रकारचें झालें असतें, नाहीं कोणी म्हणावें?

## गोखले अणि फेरोझशहा मेथा.

रानडयांच्या मृत्यूनंतर गोखले शेवटपर्यंत फेरोझशहांना फारच मानीत असत. १८९० च्या कॉंग्रेसपासूनच फेरोझशहांचें गोखल्यांविषयीं फार चांगलें मत झालें होतें, व तें शेवटपर्यंत कायम राहिलें. गोखले व मेथा हे एकाच पक्षाचे असूनही त्यांचा मतभेद बरेच वेळां झाला. मागें वेळोवेळीं प्रसंगानुसार हे मतभेद आम्हीं नमूद करून ठेवलेच आहेत. येथें आणखीहि एकदोन उदाहरणें सहज देतां येतील. १९०१ सालीं लॅंड रेव्हिन्यू बिलाच्या वेळीं फेरोझशहा व गोखले हे कायदेकौन्सिलांतून उठून गेले हें पांचव्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. पण ही उठून जाण्याची योजना गोखल्यांना पसंत नव्हती व त्याप्रमाणें त्यांनीं फेरोझशहांना कळविलेंही होतें. फेरोझशहांना हें मुळींच पसंत पडलें नाहीं, व 'तुम्हांला वाटेल तसें वागण्यास तुम्ही पूर्ण मुखत्यार आहां' अशी तार त्यांनीं रागारागानें गोखल्यांना पाठविली. या तारेचें उत्तर फेरोझशहांच्या चरित्रकारांच्या शब्दांतच सांगणें बरें— " He ( Mr. Gokhale ) did not wish his conduct to be regarded in the light of a revolt against Pherozeshah's authority, which he deemed it not merely a duty but a privilege loyally to support ". ( page 432. ) आपल्याला कौन्सिलांतून उठून जाणें पसंत नाहीं हें कळवितांनाच गोखल्यांनीं असे उद्गार काढले होते कीं, "He (Mr. Gokhale) would rather be in the wrong with him (Pherozeshah) than be in the right by himself." ( page 931. ) गोखल्यांनीं प्रेस ॲक्टाला संमति दिली ही गोष्टही फेरोझशहांना फार नापसंत पडली. कायदे कौन्सिलच्या हिंदी सभासदांनीं प्रेस ॲक्टाला संमति देण्यांत फारच मोठी चूक केली, असें फेरोझशहांचें स्पष्ट व ठाम मत होतें. ( page 467. )

या मतभेदांवरून गोखले व मेथा यांच्या स्वभावांतील फरक स्पष्टपणें कळून येतो. फेरोझशहा व गोखले यांचा जेथें जेथें मतभेद झाला,

तेथें तेथें अखेर फेरोझशहाच खरे ठरले. उदाहरणार्थ प्रेसॲक्ट व १९१४ सालचें तडजोड प्रकरण पहा. प्रेस ॲक्टाला संमति देऊन आपण चुकलों असें गोखल्यांना पुढें कळून आलें व त्यांना त्या बाबतींत लॉर्ड सिडनहॅम साहेबाची मुलाखत घ्यावी लागली. तडजोड प्रकरणांतहि गोखल्यांना आपली चूक कळून येण्यास फारसा वेळ लागला नाहीं. मुत्सद्देगिरींत गोखल्यांपेक्षां फेरोझशहा केव्हांही श्रेष्ठ ठरतात. गोखल्यांचा सरळपणा त्यांना या बाबतींत नेहमीं नडत असे. दुसरी एक गोष्ट या दोघांच्याविषयीं दिसून येते ती ही कीं, गोखले हे जात्याच नेमस्त होते. फेरोझशहांची जात खात्रीनें टणक होती. १९०१ सालीं दोघेही कौन्सिलांतून उठून आले हें खरें; पण गोखल्यांना प्रत्यक्ष उठून जाण्यापूर्वीं खुलासादाखल ४।५ वाक्यें उच्चारल्याशिवाय राहवलें नाहीं! गोष्टी क्षुल्लकच असतात, पण त्यावरूनच मनुष्याचा खरा स्वभाव कळून येतो. प्रेस ॲक्टाविषयींचें फेरोझशहांचे धोरणही गोखल्यांना ‘ जहाल ’ च वाटलें असावें असें मोदी लिहितात ! ( page 567–68. ) पण हें जहालच धोरण खरें होतें. हें पुढें गोखल्यांनाही कबूल करावेंच लागलें.

गोखल्यांचा आणखी एक विशेष हा कीं, ते पुढारीपणाच्या शिखरावर पोंचले तरीही अनुयायी होते. फेरोझशहांचें याच्या उलट दिसून येतें. ते पुढारी होण्याकरितांच जन्मास आले होते. वस्तुतः कॉंग्रेस काढली ह्यूम साहेबांनीं, तिच्यांत प्रमुख भाग घेतला सुरेन्द्रनाथ बानर्जींनीं; पण तिचीं सूत्रें पहावींत तर फेरोझशहांच्या हातांत! फेरोझशहा हे एक अरेराव सुलतान आहेत अशी तक्रार जहालांनीं केल्यास त्यांत कांहींच नाहीं; पण खरी मौज हीच कीं, १९०३ च्या कॉंग्रेसचे अध्यक्ष लाल मोहन घोस यांनींही आपल्या अध्यक्षाच्या भाषणांत ती तक्रार केली ! ( page 441: P. M. Mehta ) गोखले स्वतः पुढारी होते, तरीही ते फेरोझशहांनाच आपले पुढारी मानीत. इतर कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी फेरोझशहा व गोखले हे तुल्यबलच ठरतात. प्रत्यक्ष कार्य करण्याच्या बाबतींत

गोखले हे केव्हांही श्रेष्ठ आहेत ही गोष्टही कोणास नाकबूल करतां येणार नाहीं.

फेरोझशहांच्या आधीं गोखले वारले. त्यांच्या निधनाबद्दल दुःखप्रदर्शनाची जी सभा ता. ५ मार्च १९१५ रोजीं भरली होती, तिच्यांत फेरोझशहांचें फारच हृदयस्पर्शी भाषण झालें. गोखल्यांनीं मरणापूर्वी जी सुधारणांची योजना तयार केली होती म्हणून मागें सांगितलें आहे ( प्रकरण ७ पहा ), ती तयार करतांना गोखल्यांना मेथांची फारच मदत झाली होती. राज्ययंत्राची रचना जर्मन, ऑस्ट्रियन, किंवा अमेरिकन रचनेप्रमाणें असावी असें गोखल्यांचें मत होतें, तर ब्रिटिश राज्यपद्धतीचा नमुना आपण पसंत करावा असें मेथांचें मत होतें. ( page 637. ) पण गोखल्यांच्या मृत्यूनें हें सर्व प्रकरण जागच्या जागींच राहिलें.

मतभेद होते तरीही उभयतांच्या स्नेहभावांत केव्हांही अंतर पडलें नाहीं, ही गोष्ट विशेष सांगण्यासारखी आहे. दोघांच्या स्वभावांत फरक असला, तरी कार्यपद्धति एकच असल्यामुळें व गोखले हे स्वतः जसे Hero होते, तसेच Hero-worshipper ही असल्यामुळें एकमेकांबद्दल एकमेकांचा गैरसमज असा केंव्हांच झाला नाहीं. गैरसमज न झाल्यामुळें स्नेहभाव कायम राहिला इतकेंच नव्हे तर वृद्धिंगतही झाला.

## गोखले आणि टिळक

या दोन व्यक्तींच्या परस्परसंबंधांविषयीं लिहिणें फार धोक्याचें व अवघड आहे. गोखले वारल्यास दहा वर्षें होत आलीं व टिळक दिवंगत झाल्यासही चार वर्षें होऊन गेलीं, तरीही या दोघांच्या हयातींत उठलेले वादाच्या धुळीचे लोट जमिनीवर बसण्याला व आरपार स्वच्छ दिसूं लागण्याला इतकीं वर्षें सतत स्रवलेलें विस्मृतीचें दहिंवर पुरें झालेलें दिसत नाहीं. याला पुरावा हाच कीं, गतवर्षी ‘ टिळक जीवनरहस्य ’ लिहून ज्ञानप्रकाशकारांनीं टिळकांच्या अवगुणांची पुनः उजळणी केली, व तिला उत्तर म्हणून ता. २९ जुलै १९२४ च्या केसरींत टिळकांच्या चरित्रलेखकांनीं गोखल्यांच्या

दोषांचें व उणीवांचें फुकट प्रदर्शन मांडलें ! अशा रीतीनें हा वाद अगदीं आज तारखेपर्यंत पूर्वी इतक्याच जोरानें चालूं आहे. तेव्हां या वादांत फार खोल न शिरतां एकादा नवीन मुद्दा सांगून पुढें जाऊं.

गोखले व टिळक यांच्यांत जितका विरोध होता, तितकाच सारखेपणाही होता. गोखले व टिळक या दोघांनींही आपल्या सार्वजनिक आयुष्यक्रमाला आरंभ शिक्षणदानानें केला. दोघेही नामांकित प्रोफेसर होते. टिळकांनीं जेजुईट तत्त्व डे० ए० सोसायटींत पाळलें जात नाहीं म्हणून ती सोडली, तर जेजुईट तत्त्वाच्या पायावर गोखल्यांनीं ‘ सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी ’ उभारली. टिळक हे उत्तम संपादक होते, तर गोखल्यांनींही आरंभीं संपादकगिरी थोडीशी तरी केलीच. दोघेही कायदेकौन्सिलें, म्युनिसिपालिटी, युनिव्हर्सिटी वगैरेंचे सभासद होते. टिळकांपेक्षां गोखल्यांनीं या संस्थांतून निःसंशय अधिक कामगिरी केली. दोघांचाही भर राजकारणावर होता. गोखले नेमस्त होते तर टिळक जहाल होते, ही गोष्ट वेगळी; पण दोघांनींही राजकारणालाच स्वतःला वाहून घेतलें होतें हें महत्त्वाचें तत्त्व आहे. टिळक व गोखले हे सामाजिक बाबतींत व्यक्तिशः पुरोगामी; पण टिळक हे समाजाला सोडण्यास नाखूष व म्हणून सुधारकांच्या विरुद्ध, तर गोखले हे श्रमविभाग म्हणून तटस्थ व उदासीन. एकाच देशहितासाठीं गोखल्यांचें तोंड सरकारकडे वळलेलें, तर टिळकांचें तोंड जनतेकडे वळलेलें. एकावर सरकारचा रोष, तर दुसऱ्यावर जनतेची नाखुषी.

स्वभावभेद मात्र दोघांत फारच होता. टिळकांची व फेरोझशहांची जात एक असें म्हणण्यास फारसा प्रत्यवाय दिसत नाहीं. मग गोखल्यांचें व फेरोझशहांचें जसें पटलें, तसें गोखल्यांचें व टिळकांचें कां पटलें नाहीं ? यावर उत्तर हें कीं, टिळकांचें व फेरोझशहांचें ज्या कारणांकरितां पटलें नाहीं, त्याच कारणांकरितां टिळकांचें व गोखल्यांचेंही पटलें नाहीं. स्वभाव भिन्न असले तरी मतें एक असलीं म्हणजे पटण्यास फारशी अडचण पडत नाहीं. पण मतें भिन्न असून स्वभाव एकसारखे असले तरीही त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. गोखले–टिळकांमधला काय, किंवा मेथा-टिळकांमधला

काय, मतभेद कोणत्या स्वरूपाचा होता असें जर पाहिलें तर तो ध्येयविषयक नसून मार्गविषयक होता असें दिसून येईल. ' हिंदीराष्ट्राच्या आकांक्षांना कोणत्याही मर्यादा घालण्यास मी तयार नाहीं ' असे उद्गार गोखल्यांनीं काढल्यावर टिळक तरी याच्या पलीकडचें कोणतें ध्येय शोधून काढणार होते ? तात्पर्याची गोष्ट हीच कीं, हा मतभेद मार्गविषयक होता.

ही गोष्ट नीट लक्ष्यांत ठेवली, म्हणजे टिळक-गोखल्यांचा परस्परसंबंध कोणत्या स्वरूपाचा होता, याबद्दल गैरसमज होणार नाहीं. या दोन व्यक्तींच्या हयातींत त्यांच्या त्यांच्यांत जे वादप्रसंग झाले ते बहुतेक या मार्गासंबंधानें झाल्याचें सहज दिसून येईल. एकमेकांनीं एकमेकांवर टीका केल्या, त्या एकमेकांच्या मार्गांवर केल्या, कार्यांवर फारशा केल्या नाहींत. गोखल्यांनीं केलेलें कार्य टिळकांना केव्हांही मान्यच होतें असें सप्रमाण दाखवून देतां येईल. परस्परविरुद्ध दिशेनें पृथ्वीप्रदक्षिणा करावयास निघालेलीं दोन माणसें पृथ्वीच्या गोलपणामुळें जशी समोरासमोर यावीं, तसेंच टिळक व गोखले यांच्या कार्याचें आहे. दोघांचे मार्ग भिन्न खरे; पण ध्येय एकच असल्यामुळें त्यांच्या कामगिऱ्या एकमेकींना पूरक व पोषक अशा होत्या. याचा पुरावा हाच कीं, टिळकांनी गोखल्यांच्या कौन्सिलांतील कामगिरीचा सर्वत्र गौरवच केला आहे. या बाबतींत खुद्द टिळकांच्या लेखांतील बरींच उदाहरणेंही देतां येतात. ता. ६-२-१९०० च्या केसरींत सँढर्स्ट साहेबांच्या प्लेगव्यवस्थेवर टीका करतांना टिळकांनीं गोखल्यांची बाजू घेतली आहे. ता. १६-७-१९०१ च्या केसरींत गोखल्यांविषयीं पुढील मजकूर आढळतो " ना. गोखले व छत्रे यांनीं आपल्या मिनिटांत जो बिलाविरुद्ध मजकूर लिहिला आहे तो पूर्वींप्रमाणें अर्धवट नसून पक्का निश्चयाचा आहे आणि लोकांची बाजू अशा रीतीनें योग्य मार्गानें सरकारापुढें नेल्याबद्दल त्यांचे लोकांनीं आभार मानले पाहिजेत. " ता. २७-८-१९०१ च्या केसरींत उठून आलेल्या नामदारांचें टिळकांनीं मनःपूर्वक अभिनंदन केलेलें आहे. ता. १-४-१९०२ च्या केसरींत गोख-

ल्यांच्या त्यावर्षीच्या बजेटावरील भाषणाचा आधार घेऊनच विषयप्रतिपादन करण्यांत आलें आहे.

टिळक व गोखले यांचीं मतें जुळण्याचेहि प्रसंग कांहीं थोडेथोडके आले नाहींत. १९०४ सालीं इंडियन युनिव्हर्सिटीज् अॅक्ट कायदे कौन्सिलापुढें पास होण्यासाठीं आला असतां सरकारला विरोध करण्याच्या बाबतींत टिळकांचा गोखल्यांना पाठिंबा होताच; पण यावेळीं गोखले व टिळक या दोघांनाही डॉ. भांडारकरांना विरोध करावा लागला ही गोष्ट अवश्य लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. (Gokhale's Speeches: page 250;) (केसरी, ता० १९-४-१९०४) यापेक्षांही टिळक व गोखले याचें अधिक महत्त्वाचें व मौजेचें मतसाम्य आम्हांस दाखवितां येईल. १९०५ सालीं कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून गोखल्यांनीं जें भाषण केलें त्यांत कर्झन साहेबांच्या कारकीर्दीबद्दल ते म्हणतात " 'For a parallel to such an administration, we must, I think, go back to the times of Aurangazeb in the history of our own country.' (Speeches: p. 680.) आतां टिळक केसरींत काय म्हणतात तें पाहूं. " लार्ड कर्झन यांच्या कारकीर्दीच्या तोडीस जुना दाखला घ्यावयाचा असल्यास तो पुष्कळ अंशीं औरंगजेबाचा घेतल्यास चालेल. " येथें सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, टिळकांच्या लेखाची तारीख २९ आगस्ट १९०५ ही आहे! मग आतां टिळक व गोखले यांच्यांत फरक राहिला कोठें? टिळक व गोखले यांचीं मतें व ध्येयें हीं फारशीं भिन्न नव्हतीं. मतभेद मार्गाविषयीं, साधनाविषयीं होता. याविषयींचा आणखीही खात्रीलायक पुरावा आम्हांस देतां येण्यासारखा आहे. हा पुरावा गोखल्यांविषयीं फारच उत्तम मत असणाऱ्या चिरोल साहेबांच्या लेखांतलाच आहे. चिरोल साहेबांना गोखल्यांचा हा 'जहाल' पणा पसंत न पडून ते टिळकांच्या चळवळीबद्दल लिहितांना म्हणतात— " His (Tilak's) opportunity did not come till ten years later when he pulled the strings at the two successive sessions held in 1905 at Benares

and in 1906 at Calcutta. It was then that the Congress passed from mere negative antagonism into almost direct defiance of Government. It must have been a proud moment for Tilak when the very man who had often fought so courageously against his inflammatory methods and reactionary tendencies in the Deccan, Mr. Gokhale, played into his hands, and from the presidential chair at Benares got up to commend the Boycott as a political weapon used for a definite political purpose." ( Indian Unrest : page 159 )

गोखल्यांची कामगिरी, योग्यता, व स्वार्थत्याग यांची चांगलीच जाणीव टिळकांना होती. गोखल्यांच्या मृत्यूनंतर टिळकांनीं ओंकारेश्वरावर केलेलें भाषण अजून लोक विसरले नाहींत. टिळकांनी केसरींत गोखल्यांचा मृत्यु-लेख लिहिला, त्याला ' मुहूर्तं ज्वलितं श्रेयः, न च धूमायितं चिरम् ' हें अवतरण दिलें होतें. प्रांतिक परिषदेंत गोखल्यांच्या मृत्यूबद्दल दुःखप्रदर्शक ठराव मांडतांना टिळक म्हणाले:— " People should not judge of his relations with Mr. Gokhale by what appeared on the out side. No man could better know than he did Mr. Gokhale's qualities of head and heart— his zeal in the country's cause, his sincerity and singlemindedness, his determination to take to the end the task he might take in hand." ( Tilak's speeches page 303. ) गोखले व टिळक या दोन लोकोत्तर पुरुषांच्या हयातींत त्यांचे जे वादप्रसंग झाले त्यांची हकीकत आम्हीं मागें दिलीच आहे. त्यांच्या पश्चात् त्यांच्या परस्पर-संबंधाचा जर कांहीं विचार केला, तर त्यापासून त्यांच्या कामगिऱ्या परस्परपूरक होत्या असाच सिद्धांत निघेल, असें वाटतें.

## गोखले आणि गांधी.

गोखले जसे रानड्यांचे शिष्य, तसे गांधी हे गोखल्यांचे शिष्य. तीन वर्षांपूर्वी असहकारितेची चळवळ ऐन जोमांत असतां एका निनांवी लेख-कानें गांधींना असा सरळ सवाल केला कीं, " टिळकांचेंच कार्य करीत

असतां आपण गोखल्यांचेच शिष्य आहों असें मिथ्या भासवून तुम्ही लोकांची फसवणूक कां करतां ? " या निनांवी पत्राला गांधींनीं तारीख १३ जुलै १९२१ च्या Young India मध्यें A confession of faith असा अग्रलेख लिहून उत्तर दिलें. या उत्तरांत गांधी म्हणतात.—

"...I had many heroes, but no king. It was different with Gokhale, I cannot say why. I met him at his quarters on the college ground. It was like meeting an old friend, or better still, a mother after a long separation. His gentle face put me at ease in a moment. His minute inquiries about myself and my doings in South Africa at once enshrined him in my heart. And as I parted from him, I said to myself 'you are my man.' And from that moment, Gokhale never lost sight of me. In 1901, on my second return from South Africa, we came closer still. He simply 'took me in hand,' and began to fashion me. He was concerned about how I spoke, dressed, walked, and ate. My mother was not more solicitous about me than Gokhale. There was, so far as I am aware, no reserve between us. It was really a case of love at first sight, and it stood the severest strain in 1913. He seemed to me all I wanted as a political worker—pure as crystal, gentle as a lamb, brave as a lion, and chivalrous to a fault. It does not matter to me that he may not have been any of these things. It was enough for me that I could discover no fault in him to cavil at. He was and remains for me the most perfect man on the political field. Not, therefore, that we had no differences. We differed even in 1901 in our views on social customs e. g. widow remarriage. We discovered differences in our estimate of Western civilization. He frankly differed from me in my extreme views on non-violence. But these differences mattered

neither to him nor to me. Nothing could put asunder. It were blasphemous to conjecture what would have happened if he were alive to-day. I know that I would have been working under him. I have made this confession, because the anonymous letter hurt me, when it accused me of imposture about my political discipleship. Had I been remiss in my acknowledgment to him who is now dumb? I thought, I must declare my faithfulness to Gokhale, especially when I seemed to be living in a camp which the Indian world calls opposite." हा लांब पण सुंदर उतारा दिल्यावर गोखले व गांधी यांच्यासंबंधींचें विशेष लिहिण्यासारखें कांहीं रहातच नाहीं. गांधी हिंदुस्थानांत कायमचे रहिवासी होण्याच्या उद्देशानें आफ्रिकेंतून निघाले, तेव्हां गोखले विलायतेंत आजारी होते. ही बातमी कळतांच गांधी विलायतेला जाऊन गोखल्यांस भेटले. गोखल्यांच्या मनांत गांधींनीं 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी'चे सभासद व्हावें असें फार होतें. पण हा योग हिंदुस्थानच्या दुर्दैवानें जुळून आला नाहीं. गांधींचें 'हिंद स्वराज्य' हें पुस्तक आतां चोहोंकडे चांगलेंच गाजलें आहे. या पुस्तकांतील विचारसरणी गोखल्यांना बरेच ठिकाणीं चुकीची व अपरिपक्व वाटली, म्हणून त्यांनीं गांधींना निदान एक वर्षपर्यंत सार्वजनिक चळवळींत प्रत्यक्ष भाग न घेतां हिंदुस्थानच्या परिस्थितीचें सूक्ष्म अध्ययन करण्यांत तो काळ घालविण्याचा उपदेश केला होता. गांधींनीं हा उपदेश मोठ्या भक्तीनें पाळला. आपल्या गुरूच्या स्मारकफंडासाठीं गांधीजींनीं बरीच खटपट केली होती. (अवंतिकाबाईकृत गांधीचरित्र पृष्ठें ६०-६२).

गोखले आज हयात असते तर काय झालें असतें या प्रश्नाचें एक उत्तर वर गांधीजींनींच दिलें आहे. याप्रमाणें खरोखरीच जर गोष्टी घडत्या, तर गेल्या चार वर्षांत जो एकच गोंधळ उडून राजकारणाची हानि झाली, ती झाली नसती. पण या प्रश्नाला दुसरीही बाजू आहे. गांधींचें मत-स्वातंत्र्य इतकें जाज्वल्य आहे कीं, त्यांत या गुरुशिष्यसंबंधाची आहुति

सुद्धां कदाचित् पडली असती. आज ना० शास्त्र्यांचें व गांधींचें कितपत पटत आहे तितकेंच गोखल्यांचें व त्यांचें पटलें असतें. दुसरा एक विचार येथें सुचतो तो असा, कीं आज जर गोखले असते तर त्यांना हिंदुस्थानचा मुख्य प्रधान होण्याची आपली दुधाची हौस दिवाणगिरीच्या ताकावरच भागवून घ्यावी लागली असती ! प्रांतिक स्वराज्याची मागणी मरणाच्या अगोदर करून ठेवलेल्या योजनेंत गोखल्यांनीं करून ठेवली होती; तर आजमित्तीला मॉंटेग्यु-चेल्मसफर्ड सुधारणांची जुजबी सुधारणा करण्याच्या इराद्यानें नेमलेल्या मुडिमन कमिटीपुढें मध्यप्रांताचे माजी दिवाण, व गोखल्यांच्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे एक सभासद, म्हणजे गोखल्यांचे एक शिष्य रावबहादुर केळकर हे तीच मागणी करीत आहेत. अशा गोष्टी डोळ्यांपुढें उभ्या राहिल्या म्हणजे गोखले आज नाहींत तेंच बरें, असें वाटावयास लागतें. त्यांच्या देशहिताविषयीं तळमळणाऱ्या कोंवळ्या अंतःकरणाला ही अक्षम्य मंदगति पाहवली नसती.

हें प्रकरण व हें पुस्तक पूर्ण झालें. गांधींचा उतारा देण्यांत एक हेतु असा आहे कीं, निरनिराळ्या लोकांनीं गोखल्यांविषयीं जे प्रशंसापर उद्गार काढले त्यांचें सारसर्वस्व वरील उताऱ्यांत सांपडेल. चरित्रनायकाविषयीं लोकमत काय आहे हें दर्शविण्याचें काम चरित्रलेखकाला करावें लागतें, व तें वर दिलेल्या गांधींच्या उताऱ्यानें चांगलें होईल असें आम्हांस वाटतें.

---

## परिशिष्ट १ लें.

# निबंधाला आधारभूत होणाऱ्या ग्रंथांची यादी.

आधारभूत ग्रंथांचें वर्गीकरण निरानिराळ्या दृष्टींनीं निरनिराळें करितां येईल. भाषेच्या दृष्टीनें इंग्रजी ग्रंथ व मराठी ग्रंथ असें वर्गीकरण होतें. परंतु निबंधांत कोणत्या ठिकाणीं कोणत्या ग्रंथांचा उपयोग झाला, या गोष्टीवरून

पडणारे विभाग हे अधिक महत्त्वाचे होत. असे विभाग दोनचार तरी सहज पडतील. ( १ ) चरित्रनायकाचीं पूर्वीं प्रसिद्ध झालेलीं चरित्रें–यांत प्रो. पटवर्धन, डॉ. परांजपे, ग० र० अभ्यंकर, गो० वि० आपटे वगैरेंच्या ग्रंथांचा समावेश होतो. Indian Nation Builders सारख्या पुस्तकांचा समावेशही याच विभागांत केला पाहिजे. ( २ ) चरित्रनायकानें केलेलीं भाषणें व लेख–यांत १९२० सालीं प्रसिद्ध झालेल्या Speeches of Gokhale या पुस्तकाचा मुख्यत्वेंकरून समावेश होतो. हें पुस्तक म्हणजे गोखल्यांच्या सर्व भाषणांचें भांडारच आहे. Public Life in India हें व्याख्यान याही पुस्तकांत प्रसिद्ध झालेलें नाहीं, म्हणून त्याचाहि समावेश या विभागांत होतो. (३) समकालीन व्यक्तींचीं चरित्रें–यांत रानडे, टिळक, आगरकर, फेरोजशहा मेथा, गांधी, कर्वे वगैरेंच्या चरित्रांचा समावेश होतो. (४) चर्चात्मक ग्रंथ–यांत मोर्ले, चिरोल, काळे, आंबेकर, वगैरेंच्या ग्रंथांचा समावेश होतो. (५) संस्थांचे इतिहास–यांत कॉंग्रेसच्या इतिहासांचा, डे० ए० सोसायटीच्या रिपोर्टांचा व इतर पुस्तकांचा समावेश होतो. (६) सामान्य–उरलेल्या सर्व आधारभूत ग्रंथांचा यांत समावेश होतो. गोखल्यांचें विस्तृत व विवेचनपूर्वक लिहिलेलें चरित्र इंग्रजी किंवा मराठी यांपैकीं कोणत्याही भाषेंत नाहीं. यामुळें सामग्रीची जुळवाजुळव करणें फारच अवघड होऊन बसलें. पण मिळालेल्या सर्व साधनांचा या निबंधांत शक्य तितका उपयोग करून घेतला आहे, व याबद्दल लेखक या सर्व ग्रंथकारांचा आभारी आहे. या सर्व ग्रंथांची तपशीलवार यादी खालीं जोडीत आहें.


## I English Books.

| | Name of the Book | Name of the author or publisher. |
|---|---|---|
| 1 | Speeches of Gokhale | G. A. Natesan & Co. Madras. |
| 2 | Gopal Krishna Gokhale | R. P. Paranjpye |

| | | |
|---|---|---|
| 3 | The Indian Nation Builders Part I | Ganesh & Co. Madras |
| 4 | G. K. Gokhale ( 4 as. ) | G. A. Natesan & Co. Madras |
| 5 | Public Life in India | G. K. Gokhale |
| 6 | Gokhale and Economic Reforms | Prof. V. G. Kale |
| 7 | The Life of Lok. Tilak | D. V. Athalye |
| 8 | B. G. Tilak—His Writings and Speeches | Ganesh & Co. Madras |
| 9 | Sir Pherozeshah Mehta (2 vols.) | H. P. Mody |
| 10 | Indian National Evolution | Amvika Charan Muzamdar |
| 11 | How India Wrought for Freedom | Annie Besant |
| 12 | Indian Unrest | Sir Valentine Chirol |
| 13 | The New Spirit in India | H. W. Nevinson |
| 14 | Administrative Problems of British India ( 1910 ) | Joseph Chailley |
| 15 | Recollections ( II Volume ) | John Viscount Morley |

16 Report of the Excise Committee of the Bombay Govt. 1922-23

17 Reports of the Deccan Education Society for 1914-1915

18 Prophets, Priests, and Kings—A. G. Gardiner

19 Brief Account of the Servants of India Society ( 1917-23 )

## २ मराठी ग्रंथ.

| ग्रंथाचें नांव. | लेखकाचें किंवा प्रकाशकाचें नांव. |
|---|---|
| १ गोपाळ कृष्ण गोखले ... ... | ग. र. अभ्यंकर. |
| २ मासिक मनोरं.—वसंत अंक १९१५. | वा. ब. पटवर्धन. |
| ३ मासिक मनोरंजन— जुलै १९१५. | |

| ग्रंथाचें नांव. | लेखकाचें किंवा प्रकाशकाचें नांव |
|---|---|
| ४ मासिक मनोरंजन— आगरकर अंक १९१६. | |
| ५ महाराष्ट्राचे पंचप्राण ... ... | वि. वि. करमरकर. |
| ६ गोखले, व गोखले रास्ते घ. इ.... | गो. वि. आपटे. |
| ७ लो. टिळकांचें चरित्र ( पूर्वार्ध ). | न. चिं. केळकर. |
| ८ लो. टिळक यांचीं गेलीं आठ वर्षें. | आ. वि. कुळकर्णी. |
| ९ टिळक— जीवनरहस्य... ... | बा. मा. आंबेकर ( ज्ञानप्रकाश ). |
| १० न्यायमूर्ति म. गो. रानडे ... | न. र. फाटक. |
| ११ आमच्या आयु. कांहीं आठवणी. | रमाबाई रानडे. |
| १२ महात्मा गांधी ... ... ... | सौ. अवंतिकाबाई गोखले. |
| १३ आत्मवृत्त ... ... ... | प्रो. धोंडो केशव कर्वे. |
| १४ विलायतचीं बातमीपत्रें ... | न. चिं. केळकर. |

### ३ वर्तमानपत्रें.

( १ ) केसरी, ( २ ) ज्ञानप्रकाश व ( ३ ) Young India.

REFBK-0003051

मराठी ग्रंथ ... दा. क्र. 30... 